

कथासंग्रह

# गरुडझेप

लेखक
ॲड. यशवंत बाबुराव कदम
([illegible])

# गरुडझेप

## कथासंग्रह

ॲड. यशवंत बाबुराव कदम,
नमनेश्वर

कोमल
प्रकाशन

**गरुडझेप / कथासंग्रह**
Garudzep / Kathasangrah
पहिली आवृत्ती : १ मे २०२३

ISBN No. : ?

**लेखक :**
© अॅड. यशवंत बाबुराव कदम
बी-११०१, एकता मेडोज, सिद्धार्थ नगर,
बोरीवली (पूर्व), मुंबई ४०० ०६६.
भ्रमणध्वनी : ९८९२०४६८६८/९६१९३६०६६१

**प्रकाशक :**
१) कोमल प्रकाशन
 ३०२, कृष्ण श्रद्धा, पांचाळनगर,
 नालासोपारा (प.), जि. ठाणे.
 मोबाईल : ९१३७६ ६५९६८/९९८७७ ७६८९९
२) ई-साहित्य प्रतिष्ठान

**मुखपृष्ठ :**
नरेश ठाकूर
मोबाईल : ९८२०३८०२९९

**अक्षर जुळणी :**
चैतन्य आर्टस्, दादर, मुंबई ४०० ०२८.
मोबाईल : ९२२३४७८४८९

**मुद्रक**
----

**मूल्य**
रु. १६०/-

'गरुडझेप' या माझ्या कथासंग्रहातील कथांमध्ये वाचकांना काही प्रसंग, नावे, काही सत्य घटना आढळून आल्यास, माझ्या कथेतील वास्तव चित्रण, व्यक्तिदर्शन आणि घटना प्रसंग यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही, असेल तर तो केवळ योगायोग समजावा... अॅड. यशवंत बाबुराव कदम

# गरुडझेप

**(कथासंग्रह)**

हे पुस्तक ई साहित्य प्रतिष्ठानच्या वाचकांना ई स्वरुपात विनामूल्य उपलब्ध करून दिल्याबद्दल टीम ई साहित्य प्रतिष्ठान

लेखक- **ॲड. श्री यशवंत बाबुराव कदम**

आणि प्रकाशक- **कोमल प्रकाशन**

यांचे मनःपुर्वक आभारी आहे.

या पुस्तकावरील प्रतिक्रिया आपण ॲड. श्री. यशवंत बाबुराव कदम यांना **ybkadam14@gmail.com** या ई मेल पत्त्यावर किंवा **9892046868** या phone क्रमांकावर कळवाव्या ही विनंती.

धन्यवाद

सुनीळ सामंत
टीम ई साहित्य
esahity@gmail.com
www.esahity.com
Whatsapp: 99877 37237
(Whatsappवर विनामूल्य ई पुस्तके मिळवण्यासाठी
आपले नाव व गाव कळवा)

# अल्प–परिचय

**ॲड.यशवंत बाबुराव कदम**

बी.ए., एल एल बी. ॲडव्होकेट हायकोर्ट, मुंबई

**जन्मतारीख** : १४ ऑगस्ट १९४८

**मूळगांव** : मु. पो. टेरव, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी

**प्राथमिक शिक्षण** : ज्ञानेश्वर विद्यालय, वडाळा, मुंबई

**महाविद्यालयीन शिक्षण** : रुईया महाविद्यालय, मुंबई
न्यू लॉ कॉलेज, माटुंगा, मुंबई

**नोकरी** : आयकर खाते (मुंबई) येथून वरीष्ठ अधिकारी म्हणून निवृत्त
सध्या – मुंबई उच्च न्यायालयात वकिली

***

खालील साहित्य संस्थांशी स्थापनेपासून सहभाग
काव्यमंच, मुंबई
कोकण मराठी साहित्य परिषद
मराठा मंदिर साहित्य संघ, मुंबई
लोटिस्मा, चिपळूण आणि अनेक सामाजिक संस्था

***

**प्रकाशित साहित्य** :

१. सद्गुरू दत्तात्रय शिंदे महाराजांचे जीवन परिचय १९७५
२. फुलोरा प्रातिनिधिक काव्यसंग्रह २००८
३. जीवनगाणे (काव्यसंग्रह) ५ जून २०१०
४. अंतरंगत (काव्यसंग्रह) २८ फेब्रुवारी २०१०
५. घे भरारी प्रातिनिधिक काव्यसंग्रह २०११
६. जय दुर्गे (आरती संग्रह) २०११
७. भक्तिरंग (काव्यसंग्रह) २०१२
८. बोलविता धनी वेगळाची (काव्यसंग्रह) ११ जानेवारी २०१३
९. तांडव (चरित्र) ११ जानेवारी २०१३
१०. जय दुर्गे (आरती संग्रह) चौथी आवृती
११. श्री कुस्वामीनी आई भवानी वाघजाई देवस्थान, श्री क्षेत्र टेरव मंदिराचा समग्र इतिहास, ८ मे २०१३

१२.बोलके झाड (कथासंग्रह) मार्च २०१६
१३.महामानव... (प्रातिनिधिक कविता संग्रह) मार्च २०१६
१४.दसपटीच्या श्रीरामवरदायिनीचा इतिहास (संपादित एप्रिल २०१६)
१५.आकाशाचे पंख (कथा संग्रह) १८ फेब्रुवारी २०१७
१६.अंतरीचा दीप (अभंगगाथा) १२ एप्रिल २०१८
१७.गडगीचा डोह (कथासंग्रह) २० मे २०१८
१८.देव माणूस (व्यक्तिचित्र) मे २०१८
१९.लोहितचे मानसपुत्र : संत शंकरदेव यांचे चरित्र (मार्च २०१९)
२०.हरिपाठ चिंतन (मार्च २०१९)
२१.वळणावळणाची वाट (कादंबरी) १६ डिसेंबर २०२२
२२.मावळतीच्या सावल्या (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२३.गरुडझेप (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२४.ऊनपावसाचा खेळ (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२५.लंडनचा किनारा (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२
२६.आडवळणाची वाट (कथासंग्रह) १६ डिसेंबर २०२२

**आगामी पुस्तके** :
- ◆ चांदण्याचा पाऊस (ललित लेख)
- ◆ मावळतीच्या साक्षीने (कविता संग्रह)
- ◆ शब्द स्फोट (हिंदी काव्यसंग्रह)
- ◆ क्षितीजा पलीकडच्या प्रवासात (मराठी काव्यसंग्रह)
- ◆ आध्यात्मिकतेचा अन्वयार्थ – एक अभ्यास (ज्ञानदेव आणि तुकाराम)

**पुरस्कार** : 'जीवन गौरव पुरस्कार' – वंदना प्रकाशन उल्लेखनीय साहित्यिक कार्याबद्दल. लोटिसमाचा कविवर्य द्वारकादास शेंडे कथा पुरस्कार २०१८ बोलके झाड या कथा संग्रहाला. गो. नि. दांडेकर यांच्या नावाचा कथेला तृतीय पुरस्कार २०१८ कोकण मराठी साहित्य परिषदेचा 'गडगीचा डोह' या कथा संग्रहाला विशेष पुरस्कार, २०१८.

# अर्पण पत्रिका

**''गरुडझेप''** हा माझा कथासंग्रह
इतिहासाचे गाढे अभ्यासक
आदरणीय डॉ.जयसिंगराव पवार
त्यांना अर्पण करीत आहे...

**– ॲड. यशवंत बाबुराव कदम**
**नमनेश्वर**

# माझे मनोगत

**"गरुड झेप"** हा माझा पाचवा कथा संग्रह. यापूर्वी बोलके झाड, आकाशाचे पंख, गडगीचा डोह आणि आता गरुडझेप कथा संग्रह. याच कथासंग्रहाबरोबर ऊन पावसाचा खेळ, लंडनचा किनारा आणि आडवळणाची वाट आणि मावळतीच्या सावल्या हे ही कथासंग्रह प्रकाशित होत आहेत.

गेल्या दोन अडीच वर्षाचा कोरोनाचा काळ जीवघेणा, प्रचंड मानसिक तणावाचा, लॉकडाऊनची शिक्षा भोगण्यात गेला. माणसे किड्या-मुंग्यासारखी मरत होती, प्रत्येकाला भिती वाटत होती. आपल्याला लागण तर होणार नाही ना, या भितीने प्रत्येकजण घराच्या चार भिंतीत स्वत:ला आणि आपल्या चिल्या-पिल्यांना डांबून ठेवीत होता, लॉकडाउनच्या शिक्षेमुळे. पंधरा-वीस दिवसाचे हॉस्पिटलचे वास्तव्य, मग पुन्हा चौदा दिवस कॉरंटाईन प्रकरण, जीव घायकुतीला आला होता. उद्याचा भरोसा नव्हता, त्यामुळे मनावर, शरीरावर प्रचंड दडपण होते. सोबत होती ती टि.व्हीची. रस्त्यावर शुकशुकाट, शाळा महाविद्यालये शिवाय सरकारी, निम-सरकारी, खाजगी कार्यालये बंद, रस्त्यावर बस, गाड्यांना टाळी, त्यात कंपन्यांनी घरी काम करण्याची म्हणजे 'वर्क फ्रॉम होम' चा जॉब. याचा नव्याने शोध लावला, नी डांबले आपल्या कर्मचाऱ्यांना लॅपटॉप पुढे बेड्या घालून. पंधरा पंधरा तास काम करीत ते बिचारे बेजार झाले होते. आणि मे महिन्यात गावात आलेले चाकरमानी अडकले दोन दोन महिने कोकणात. शिक्षा झाल्यासारखे.

पण मी मात्र सुखी प्राणी. काम काही नाही. डोक्याला खार नाही. कोकणातल्या आमच्या घरी चिपळूणला. शहरी भागापेक्षा माझ्या टेरव गावातील डोंगरी वातावरण अल्हादकारक तसे स्वच्छ हवा, डोंगराळ भाग म्हणून पण वेळ कसा जावा. अनेक कामे तशीच पडून पुस्तकांचे डीटीपी होत नव्हते. म्हणजे तालुक्याच्या ठिकाणी व्यवस्था नसल्याने पार बट्याबोळ झाला होता लिहित्या हातांचा. मी त्यावर उपाय शोधला. मला समजायला लागल्यापासून साठ वर्षाच्या काळात दिले मनातल्या पारंब्यांना सोडून, शोधायला लागलो हरवलेले क्षण जीवनातले, मनाला गंतवून ठेवणारे, काळजाला सलणारे गुलाबी क्षण, प्रसंग, चेहरे वाचीत माझ्या सभोवतालचे, भूत काळातले, वर्तमान काळातले, पडताळीत घटनांचे कंगोरे आणि प्रेम, सुख-दु:ख यांच्या पायघड्या.

याच काळात शंभरपेक्षा अधिक कथा आणि मध्ये मध्ये कविता, ललित लेख व एक कादंबरी लिहिली गेले. आणि याचे आता काय करायचे या चिंतेने ग्रासलो

उपाय शोधीत. वाढते वय आजाराचे फटकारे यामुळे हे कसे पार पडेल , डीटीपी प्रकाशनाचे काम हि चिंता दिवस रात्र सतावीत होती, आता मुंबई गाठल्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

आता पुर्वी सारख्या हजार, पाचशे प्रति काढण्याचे दिवस भूतकाळात जमा झालेत. शंभर दोनशे प्रति काढायच्या, शासन वाचनालयांना पाठविण्यासाठी आणि ई–बुकचा मार्ग शोधायचा. शिवाय खर्च परवडणे कठीण, ही सारी प्रक्रिया आता कठीण झाली आहे. प्रकाशकही त्याकडे साहित्य सेवेच्या दृष्टीने पहात नाहीत. पैसे कमावणे तेही तुमच्या खिशाला खार लावून असा प्रकार होऊन बसला आहे. शिवाय वाचकही कमी झाले आहेत ही एक चिंतेची बाब आहे.

सरकार खूप गप्पा मारते 'मराठी अभिजात भाषेबद्दल', पण त्यात आत्मीयता नाही, केंद्रिय स्थरावर अभिजात भाषेचा दर्जा मराठीला मिळावा असे राज्य आणि केंद्रिय स्थरावर कोणालाही वाटत नाही. मग कशी उर्जितावस्था येणारे मराठीला? ती माझी मराठी बोली 'बिचारी' होऊन गेली आहे. आणि हातात कटोरा घेऊन सरकार दरबारी खेपा घालीत आहे.

आज आमची पिढी ज्यांना आदर्श म्हणून मानते ती जुनी पिढी ही पडद्या आत जाताना दिसते आहे. नव्या उमेदिचे लेखक घडणे कठीण झाले आहे. जीवन इतके गतिमान झाले आहे की साहित्य वाचनाला वेळ मिळत नाही. त्यात नवी पिढी इंग्रजाळलेली आहे. ग्रामीण भागातही मराठी पाय रोवून आहे म्हणताना, तिकडे ही इंग्रजीचे लोण शेवाळासारखे पसरत आहे. पण हे मराठी भाषेच्या समृद्धीचे स्वप्न अधुरे राहू नये असे मला वाटते. नव्हे आमच्या पिढीतील लेखकांचेही तेच मत आहे. त्यासाठी प्रयत्नशील असायला हवे.

मला मात्र कोकणातले वातावरण आवडते. तिथली हिरवळ, आंब्या–फणसाच्या झाडांची सोबत. स्वच्छ हवा–पाणी आणि कमालीची शांतता मला मानवली. पण उताराला लागलेले वय लपवता येत नाही. ही सगळी निर्मिती आपल्या गमनापूर्वी मार्गी लागावी अशी एकच इच्छा आहे. आता तसे लिखाण कमी झालेय, पण थांबले नाही. पण मन मात्र हिरवेगार आहे. आपली भ्रमंती ढेचाळते आहे, तेव्हा सहाजिकच याला मर्यादा येणार आणि आशाळभूतपणे कोणाच्या तरी आधाराचा शोध सुरू होतो. मला तसे सशक्त हात माझे मित्र कोकण मराठी साहित्य परिषदेच्या विद्यमान अध्यक्षा नमीता कीर, कमलाकर राऊत आणि शिवाजी गावडे यांचे लाभले आणि माझ्या भगिनी नंदा साळवी, या त्रिकुटाचे उपकार मोठे. हे सारे प्रकाशन मार्गी लावण्यासाठीचे. मी सदैव त्यांच्या ऋणात राहिन.

मी कोकण मराठी साहित्य परिषदेचा एक संस्थापक सदस्य. हे झाड ज्या साहित्यिकांनी, साहित्य प्रेमींनी लावले आणि आज त्याचा जो वटवृक्ष झालेला दिसतो त्यात आमचे ऋषीतुल्य पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, डॉ.पांडूरंग भानुशाली, डॉ.सरोजीनी वैद्य, पंढरीनाथ रेडकर, रेखा नार्वेकर, डॉ.सुरेश जोशी, प्रकाश देशपांडे, अरुण नेरुरकर, नमिता कीर, डॉ.सुनील सावंत आणि चिपळूण मधले नव्या दमाचे अनेक लेखक, डॉ.रेखा देशपांडे, अरुण इंगवले, प्रा.बर्वे मॅडम, शिवाय माझे गुरू कवि सूर्यकांत मालुसरे, कवियीत्री सरोजीनी बिनीवाले, अशोक नायगांवकर, प्रा.अशोक बागवे, अरुण म्हात्रे  आणि माझ्या सहवासात आलेले माझ्या शालेय जीवनापासूनचे सर्व शिक्षक, महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग यांचे मला सहाय्य, प्रोत्साहन ही या कामी फलदायी झाले. याशिवाय कोमसापचे नव्या दमाचे पत्रकार, कवि, लेखक यांचे सतत प्रोत्साहन लाभले आहे.

आता या कथा संग्रहांचे आणि एका कादंबरीचे ई–बुक करावे असे मनात घाटत आहे. जेणेकरून या कथा–कादंबरीला सर्व क्षेत्रातील वाचक लाभतील. ते काम ई–साहित्य प्रतिष्ठानचे माझे मित्र आदरणीय श्री.सुनील सामंत पार पाडीत आहेत.

या कथासंग्रहास प्रस्तावना लाभेली आहे त्या ज्येष्ठ साहित्यिका **नमिता कीर** आणि कोकण मराठी साहित्य परिषदेच्या विद्यमान अध्यक्षा, मी त्यांचा ऋणी आहे. या पुस्तकाचे मुखपृष्ठ बनविणारे चैतन्य आर्टस्, दादरचे आर्टिस्ट नरेश ठाकूर यांचाही मी आभारी आहे.

या पुस्तकाचे प्रकाशन कोमल प्रकाशन, या प्रकाशन संस्थेमार्फत होत आहे त्यांचाही मी आभारी आहे.

या कथा संग्रहातील कथांबद्दल मी काय बोलू. हा अक्षरांचा खेळ माझा पांडुरंगच जाणे, तोच बोलविता धनी आणि लिहिणाराही तोच. माझ्या ह्या कथा संग्रहातील कथांचा माझ्या रसिक वाचकांनी आस्वाद घ्यावा अशी आशा बाळवून थांबतो.

**– ॲड.यशवंत बाबुराव कदम**

**नमनेश्वर**

# प्रस्तावना

अॅड.यशवंत कदम यांचा ''**गरुड झेप**'' हा पाचवा कथासंग्रह प्रकाशित होतोय. लिखाणाच्या बाबतीत विलक्षण झपाटलेलं असं हे व्यक्तिमत्व! आजवर त्यांनी कविता, ललितलेखन, कथालेखन, चरित्रलेखन आणि संशोधनात्मक लिखाण या साहित्यप्रकारात विपुल लेखन केलय. निवृत्तीनंतर त्यांच्या या लेखनाला अधिक बहर आलाय. ''गरुड झेप'' या कथासंग्रहात एकूण चौदा कथांचा समावेश केलेला आहे. भोवताली घडणाऱ्या घटना, प्रसंग यातून लेखकाला आपलं 'कथाबीज' गवसतं, अॅड.कदमांच्या कथा वाचतांना आपल्याला त्यांच्या भोवतालच्या वातावरणातून त्यांनी उचललेली ही 'बीजं' सहजपणे जाणवतात. पारंपरिक मूल्यव्यवस्था, श्रध्दाभाव, स्वप्नरंजन, मध्यमवर्गीय जुना साचा या रूळावरून जाणाऱ्या कथा या संग्रहात एकत्रित करण्यात आल्या आहेत. कथा वाचनीय आहेत. कथेचं म्हणून जे एक तंत्र असतं ते लेखकाला चांगलं अवगत आहे; म्हणून कथा वाचतांना वाचकांची उत्कठंता शेवटपर्यंत टिकून ठेवण्याचं सामर्थ्य त्यांच्या कथेला लाभलेलं आहे. ''लिहणं'' ही अॅड.कदमांच्या मनाचा स्थाईभाव आहे. कधी मुंबई तर कधी चिपळूणमधील टेरव गावातील त्यांचं टुमदार घर हा त्यांचा प्रवास सतत चालू असतो. त्यामुळे नागरी आणि ग्रामीण जीवनातील स्पंदने ते आपल्या लिखाणात सहजपणे टिपू शकतात. मनाची संवेदनशीलता आणि तीव्र निरिक्षणशक्ती यामुळे त्यांच्यातला 'लेखक' हा सदैव जागाच असतो.

लेखन ही एकलव्यी कला आहे असं म्हणतात. एकलव्याने द्रोणाचार्यांकडून प्रत्यक्ष धर्नुविद्येचे शिक्षण कधीच घेतले नाही पण एकलव्याचे एकाग्र चित्ताने द्रोणाचार्यांची शैली आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. लेखनाचं तसच आहे. आपला हात धरून कोणीही लेखनाची मुळाक्षरं आपल्याकडून गिरवून घेत नसतो. पूर्वीच्या लेखकांनी लिहलेल्या उत्तमोत्तम पुस्तकांचं वाचन व प्रत्यक्ष जीवनाचा उत्कटतेने घेतलेला अनुभव हेच लेखनातले गुरू असतात. अॅड.कदमांचे वाचन अफाट आहे. लोकसंग्रह अमाप आहे आणि मांजर जसं उघड्या दिसणार्या खिडकीत सहजपणे डोकावतं तस जगण्याच्या प्रत्येक क्षणाकडे कुतुहलाने पाहण्याची दृष्टी त्यांच्याजवळ आहे. या संग्रहातील अनेक कथा या वास्तवतेच्या पायावर उभ्या आहेत. संघर्ष करीत कर्तृत्वाची उंची

गाठणारा "**गरूडझेप**" या कथेचा नायक प्रत्यक्षात असा असू शकतो. जिद्द, मेहनत, प्रज्ञाशक्ती, प्रयत्नवाद यांचा विजय ही कथा दर्शवते. त्यामुळे ही कथा प्रेरक, मनाची पकड घेणारी आहे. तीव्र, चकित करणाऱ्या प्रतिभाशक्तीचा प्रत्यय या संग्रहातील काही कथांतून येतो. "दिलवाले" ही कथा श्वानप्रेमावर आधारित आहे. उच्च जातीच्या श्वानांध्ये योगायोगाने अचानक निर्माण झालेला आत्मबंध, प्रेमबंध काहीसा वेगळा वाटतो.

जवळजवळ सर्वच कथांधून सरळसोट जीवनाची रेष ठळक होताना दिसते. लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा, स्वभाव वैशिष्ट्याचा परिणाम त्यांच्या लेखनावर निश्चितपणे पडत असावा कारण संग्रहातील कुठल्याही कथेमध्ये वेडेवाकडे, विकृत किंवा अंगावर येणारे असे काही घडत नाही. लेखकाचा पिंड मूळात साधा सरळ असावा. त्यामुळे जीवनाची एकच उजळ बाजू ते कथांमधून हाताळताना दिसतात. 'अडथळ्यांची शर्यत', 'हुरहुर' यासारख्या कथांधून प्रेयसी काही काळ आयुष्यातून दूर होणे आणि नायकाला हवी म्हणून ती परत येणे, नायकाची होऊन बसणे या प्रकटाची पुनरावृत्ती झाली असली तरी या कथा वाचकांच्या मनात अस्वस्थता मात्र निर्माण करतात.

"खळखटृयाक" या कथेत संप, त्यामुळे होणारी कामगारांची कोडी, दुर्दशा, स्वार्थी राजकारण यांचे संदर्भ असल्याने कथा प्रभावी झाली आहे. या कथेत व्यवस्था कशी भ्रष्ट आहे, विकृत आहे याचे केलेले वर्णन प्रत्ययकारी झालेले आहे. कोकणातील जीवनाचा नवा पोत मात्र फार वेगळा आहे. "धूशान" कथेतील तेढ, राजकारण, डावपेच वाचायला कोकणातील वाचकांना नक्कीच आवडेल. "पुर्नभेट" कथेत सैनिकाच्या जीवनाची धारदार बाजू, कैदी असतानाच्या यातना, छळ यांचे वर्णन थोडे भेदकपणे झाले असते तर कथा अधिक दमदार होऊ शकली असती.

'सगुण-निर्गुण' या कथेचा भक्ती आणि अध्यात्माला झालेला स्पर्श लेखकाच्या दृष्टीने खूप प्रामाणिक आहे. मूळातच लेखकाचे चिंतनशील म्हणून जे व्यक्तिमत्व आहे ते या कथेतून अप्रत्यक्षपणे जाणवते ते महत्त्वाचे आहे. वाचकाच्या मनातील संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न 'सगुण-निर्गुण' कथेत आहे. आपल्या वयोवृध्द वडिलांच्या देखभालीसाठी अमेरिकेतून भारतात परतणार्या सुपुत्राची गोष्ट ''त्याग'' या कथेत लेखकाने मांडली आहे. ती परदेशबाह्य मुलांच्या जबाबदारीच्या संदर्भात महत्त्वाची वाटते. 'विस्मृतीच्या वाटेवरून' या

कथेतील समस्या अनेक ज्येष्ठांनी उतारवयात अनुभवली असेल त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना ही कथा काहीशी आपलीच वाटेल. जुन्या आठवणींच्या लेखनातून, आत्मकथनातून मिळालेला विरंगुळा या कथेमधील शंकररावांना विस्मृतीच्या दुखण्यातून काहीसे बरे करतो हा शेवट वेगळा आणि सुखद आहे त्यामुळे वाचकालाही समाधान मिळते.

''आसवांचा डोंगर'' या कथेत मुलांच्या कृतज्ञतेमुळे वडिलांना आलेले एकाकीपण लेखकाने रेखाटले आहे. एका लेखकाला वाङ्:मयीन सन्मानाच्या बरोबरीने मिळालेले कुटूंबातील दाहक अनुभव, घरातच दुःख सहन करत त्याचा झालेला अंत हा विषय तसा करूण आणि वास्तवाला धरून आहे. यातील ''जगणे ओसाड वाळवंटाचे झाले''ह्या अचूक शब्दप्रयोगांनी विषयाची भेदकता स्पष्ट होते.

जगण्याच्या प्रवासात ॲड.यशवंत कदम यांनी जे अनुभवले, त्यांना जे भावले, जाणवले ते त्यांनी कथारूपात मांडले त्यात सुप्त आत्मसमाधानही असावे. लेखकाची भाषाशैली सोपी आहे. आपल्या कथांधून वाचकाला खिळवून ठेवण्याचे, अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य ॲड.यशवंत कदम यांच्या लेखणीत निश्चित आहे. एकाग्रता आणि उत्कटता हा त्यांच्या कथेचा खास गुणधर्म! बदलत्या परिस्थितीत वाचकांची अभिरूची व अपेक्षा लक्षात घेऊन त्याप्रमाणे 'कथा' लिहण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

**– नमिता कीर**

# अनुक्रमणिका


१. गरुडझेप

२. अडथळ्याची शर्यंत

३. पायगुण

४. दिलवाले

५. धूमशान

६. प्रेम आणि भोग

७. विस्मृतीच्या वाटेवर

८. पुनर्रभेट

९. आसवांचा डोंगर

१०. सगुण-निर्गुण

११. त्याग

१२. खळ्खट्याक

१३. हुरहुर

१४. पोस्त

# गरुड झेप

मुलगा हुशार पण काय झाले, कोण जाणे पहिल्या वर्गात पास होणारा पण पन्नास टक्क्यात आला अकरावीत आणि सदाशिवाचे डोळेच फिरले. खूप मोठया आशा, आकांक्षाची स्वप्ने बापाने पाहिली होती. पण पोराने दिवे लावले. खोदून, खोदून विचारले का? तर तोंड बंद काय करणार ? शेवटी रात्रभर तळमळत राहिला. सदाशिव ने सकाळी त्याला खडसावलं.

''बोल ! काय झाले होते चांगले मार्क्स आणायला. तू फर्स्ट क्लास मध्ये पास होशील. मी माझ्या सायबाला सांगून ठेवले होते. ते बँकेत लावणार होते. आता काय सांगणार त्यांना विचारले तर?.. सदाशिव

नानु काहीच बोलायला तयार नव्हता. मुसू मुसू रडून त्याने डोळे लाल केले.

''अरे! बोलना?''

पण एक नाही, दोन नाही बापाचे डोकेच फिरले होते. त्यादिवशी तो कामावर गेलाच नाही.. आणि दूसऱ्या दिवशी.. पोराला घराच्या बाहेरचा रस्ता दाखवला.

''तू आणि तूझे नशीब! बाहेर पडायचे आणि नोकरी मिळाली तर घरी यायचे! मी एक दमडा देणार नाही..!''

''बाबा!'' नानु.

''मी शोधेन नोकरी पण घरातून हाकलून देऊ नका !'' नानु.

''माझ्या निर्णयात काडीचाही बदल नाही. तू निघायचे म्हणजे निघायचे. काही कर दगड फोड, काहीही कर ! पण नोकरी नाहीतर, तोंड दाखवायच नाही. काय?'' सदाशिव.

नानु मोठ्या संकटात पडला होता. काय करावे हे त्याला समजत नव्हते. तो खोलीच्या एका कोपऱ्यात बसला होता तेथेच बसून होता. विनवित होता बापाला पण बाप काही त्याच्याकडे बघायला तयार नव्हता.

''अहो! बाबा! सगळी मुले कॉलेज मध्ये गेलेयत ॲडमिशन घ्यायला. मी एकटाच तेवढा घरी आहे. मला कॉलेज मध्ये घाला. सहा महिन्याची तरी फि भरा. मी पुढची भरेन, कॉलेज करीन, नोकरी शोधीन पण आता मला घरातून बाहेर काढू नका ! मी कोठे जाऊ?'' नानु.

''जहनूम्मधे !.. निघायचे म्हणजे निघायचे मी चाललोय ड्युटीवर! आता

तु आणि तुझे नशीब नोकरी मिळाल्या शिवाय घरात प्रवेश नाही !'' सदाशिव.

बाप निघून गेला तसा, नानु उठला, आपले डबडबलेले डोळे त्याने मोरीत जाऊन धुतले. कडाडून भूक लागली होती. तो दिवस रिझल्टचा होता आणि नानुने सकाळी चहा पण घेतला नव्हता. त्याने चहा केला. दोन बटर त्यात टाकले आणि उठला. काय करावे? कोठे जावे ? काय काम करायचे ? आजवर कसलेच काम केले नव्हते. डोक दुखायला लागले होते त्याचे. नानुने अंघोळ केली. देवाच्या फोटो समोर उभा राहिला...

''देवा! मी काय करावे? काही सुचत नाही? कुठे जाऊ नोकरी मागायला? ना ओळखी, ना पाळखी. आता संध्याकाळी बाप येईल. आकांड-तांडव करील. मला कोणी वाली नाही. घरात ना आई. मी आज एकटा पडलोय रे ! आता तूच माझा बाप आणि तूच माझी आई ! काय करायचे ते कर ! हात जोडले तुझ्यापुढे ! मी एक घोडचूक केली. त्या पोरीच्या प्रेमात पडलो नी माझा क्लास गेला. बापाला कसे सांगावे ! त्यांचा व माझा तरी काय दोष ! आता तूच माझा वाली! सांगशील तिकडे जाईन... नापास झालो असतो तरी यात काही बदल झाला नसता... नॉनमॅट्रिकचा शिक्का कपाळावर बसला असता. तू मला पास केलेस दोन टक्क्यांनी क्लास चुकला. माझे सगळे भवितव्य अंधारी झाले आहे रे! काही तरी मार्ग काढ ! '' नानु.

तो देवासमोर उभा राहून आपली कैफीयत सांगत होता. आणि देव ऐकत असावा. डोळात अश्रूनी डाह केला होता. त्याने देवासमोर बसकण मारली. शाळेत बरेच काही शिकला होता. टाटा, बिर्लानी येताना 'लोटा' आणला आणि आता बनले करोडपती ! काय केले असेल त्यानी ?'' आणि त्याने डोळे पूसले. उठला पँट घातली शाळेच्या ड्रेसची, दूसरी नव्हतीच, शाळेत सेंडॉपला पँट दिली होती डॉमनीकने. तो झोपायला यायचा त्यांच्या खोलीत ते शिडे म्हणून डॉमनीकची सोय झाली होती. तेवढी एकच ओळख त्याच्या उपयोगाची होती.

नानूने खूप विचार केला. आपण कंबर कसून उभे राहिले पाहिजे. आता दिसेल त्या मार्गाने जायचे. हिम्मत पकडायची. आपला हात जगन्नाथ. मिळेल ते काम करायचे आपले नशीब आता आपल्या हातात आहे. आपला दूसरा कोणी वाली नाही ! बस् आता मागे राहायचे नाही. आपल्याला टायपिंग येते बऱ्यापैकी. तो जॉब नाही कोणी दिला तर... तर खडी फोडायची ही तयारी ठेवायची. मन घट्ट करून तो घरातून बाहेर पडला.

बाप पोलीसमध्ये तोही हत्यारी खात्यात, पगार एके पगार. एकदम इमानदार, शांत, करारी, भ्रष्टाचाराचा तिटकारा. खूप संधी आल्या पण याच कारणाने त्याने नाकारल्या. बाकी कुटुंब कोकणात. मुंबईला ते दोघेच. हाताने जेवण करायचे. बस नानुला हे सगळे जमले होते. भारत-पाकीस्तान अशा चपात्या करायच्या आणि भोलेनाथच्या हॉटेलातली उसळ बस हेच जेवण. बाप घरी असे तेव्हा सुग्रास जेवण, येरव्ही जे जमेल ते. ठीक चालले होते. शाळा चालू होती तोवर, पण पान उलटली. दिवे लागले परिक्षेचे, नी नव्या अध्यायला आता सुरुवात झाली होती. गेल्या महिन्यातच त्याला १८ पूर्ण झाले नी तो बाप्या झाला असा समज बापाचा. आता तोही नानुने स्वीकारला होता. आपला हात जगन्नाथ हा साक्षात्कार नानुला झाला बापाच्या झाडा झडतीतून आसा एका दिवसात नानू खरंच शहाणा झाला होता.

त्या दिवशी तो संध्याकाळी डॉमनीकला भेटला. त्यानी सारी कैफीयत त्याच्या समोर ठेवली आणि तोही विचारात पडला येवढासा हा पोरगा शिकलेला याला काय काम द्यायचे? तो त्याचे नशीब गॅरेजमधें आजमावीत होता, तोही निराधार. मावशीच्या आसऱ्याला आलेला. दिवसभर गॅरजमध्ये राबराब राबयचे आणि रात्री दोन घास खाऊन मड्यासारखे अंग टाकून द्यायचे. मी जे करतो ते याला नाही झेपायचे, गाड्या घासायच्या म्हणजे जूना कलर घासून काढायचा, आतला पत्रा दिसेपर्यंत. हात दुखायचे त्याचे हे नानुला जमेल काय? आणि हा म्हणतो नोकरी करून शिकायचे नाईट कॉलेजात, कसे जमणार. कोण असा मालक भेटणार याला याच्या बाजूने उभा रहाणारा ?

"बरं! अस कर उद्या सकाळी ७ वाजता माझ्याबरोबर यायच माझ्या कंपनीत. मेट्रो मोटार कंपनी. लकडी बंदरला आहे. चालत जायचे १/२ तास लागतो. कंपनी ८ वाजता उघडते. बघू या काय काम मिळते काय? तेथे मोटरच्या... गाड्या बनतात, हेल्पर म्हणून, वेंल्डर किंवा फिटरच्या हाताखाली जमेल का विच्यारतो मी ! उद्या तयार रहायचे!" डॉमनीक.

"हो ! हो ! मी येतो तुझ्या बरोबर. मिळेल ते काम करीन, पुढे शिकेन. सगळे काही करीन ! माझी तयारी आहे. तेवढे कामाचे बघ!" नानु.

आणि त्या रात्री नानुने सांगीतले " मी डॉमनीक बरोबर त्याच्या कंपनीत जातो आहे. मिळेल ते काम करीन. पण माझे कॉलेजचे सहा महिन्याच्या फि चे पैसे तेवढे द्या ! पुढे जबाबदारी माझी !" नानु.

पोरगा एका रात्रीत येवढा शहाणा होईल असे सदाशिवला वाटले नव्हते. त्याने त्याला बाहेरचा रस्ता दाखवायचे ठरविले आणि त्याच्या पंखात हवा भरली. त्याने आज त्याचा (नानुचा) चेहरा मोहरा पार बदलला होता. कामावर जाणार या उत्साहाने मनाने गरूड झेप घेतली होती. त्या रात्री त्याला झोप निट लागली नव्हती. डाव्या कुशीवरून उजव्या कुशीवर नी परत डाव्या. सारखा तो तळमळत होता. डोळ्याला डोळा लागेना लवकर उठायचे या भितीने.

नानु डॉमनीक बरोबर निघाला. १/२ तासाच्या पायपीटीनंतर ते दोघे कांपनीच्या गेटवर गेले. नानुचा पास त्याने काढला नी मॅनेजर समोर आणून उभा केला.

''शेठ ! हा पोरगा माझा शेजारी. ११वी झालाय. कामासाठी आलाय. काहीही काम करीन म्हणतो. त्याला काम द्याल कां ?'' डॉमनीक.

''अकरावी शिकलाय ? हा काय इथे काम करणार ? दोन दिवसात पळून जाईल ! ठीक तुझा माणूस म्हणून ठेवतो. हेल्पर म्हणून, यास पगार ! काय ?'' मॅनेजर.

'' होय साहेब !'' डॉमनीक

''साहेब पडेल ते काम मी करीन. अगदी झाडूही मारीन पण काम द्या ! माझी काहीही काम करण्याची तयारी आहे ! '' नानु.

''आता दिलेय नां काम ! डॉमनीक याला रामजीच्या हाताखाली हेल्पर म्हणून ठेव. रामजीच्या हाताखाली तयार होईल ! चला निघा !'' मॅनेजर.

''होय ! साहेब !'' डॉमनीक.

नानुला पहिल्या दिवशी इलेक्ट्रीक वेल्डरच्या सोबतीला बिगारी म्हणून नेमले गेले. दिवसभर तो त्याला मदत करीत होता. वजनदार लोखंडी रॉड घेऊन येणे, वेल्डींग होई तोवर ते धरून ठेवणे. हे त्याचे काम. त्यावेळी नानुला त्या गोष्टीचे फारच अप्रुप वाटले. दिवसभर त्या चकचकत्या प्रकाशात पाहून तो संध्याकाळी घरी आला. येतानाच त्याच्या डोळ्यांची जळजळ चालू होती. त्याने डॉमनीकला सांगीतले. तो घाबरला कारण आता रात्री याचे डोळे सुजणार आणि हा सकाळी कामावर कसा जाणार ?

रात्री जेवल्यावर नानु झोपला. सकाळी त्याचे डोळे उघडेनात. बराच वेळा त्याने पाणी मारले डोळ्यावर तेव्हा एकदाचे डोळे उघडले पण ते लालबूंद झाले होते नी डोळ्यातून पाण्याच्या धारा चालु होत्या. नानुने घरगुती उपाय म्हणून

एका पेल्यात हळदीचे पाणी घालून त्यात कपडा घालून डोळ्यावर ठेवला. आग कमी झाली आणि तो डॉमनीक बरोबर कंपनीत पोहोचला. त्याचा वेल्डर त्याचे डोळे बघून हसायला लागला. त्याला माहित होते. त्याच्या बरोबर वेल्डींग मधे मदत करणारा कामगार परत येत नाही आणि हा कसा? मॅनेजरला समजले, तो आला व त्याने त्या नानुची पाठ थोपटली. कारण तो टिकला तो टिकला. म्हणून नव्या येणाऱ्याला वेल्डरकडे देण्याचा प्रयोग मॅनेजर करीत होता.

काही दिवसात नानुला गॅसचे वेल्डींगही करायला दिले आणि इलेक्ट्रीक ही तो तेथे ३ महिने काम करीत होता. मग त्याचे डिपार्टमेंट बदलावे असे मॅनेजरला वाटले.

" नानु! आता ३ महिने झाले. या कंपनीचा असा रुल आहे की प्रत्येक कामगाराने सगळे काम शिकावे. आणि मग ऑल राऊंडर व्हावे. त्यात कंपनीचाही फायदा होता. कामगार कोणी गेला तर फरक पडत नसे.

त्याला कॉलेजला ॲडमीशन घ्यायचे होते. आता जुलै संपत आला होता. आणि ॲडमीशनची शेवटची तारीख २८ होती. त्याने विचार केला ही तारीख चुकली तर वर्ष वाया जाणार. काहीही करून ही संधी साधायलाच हवी असे वाटले.

त्याने संध्याकाळी वडीलाना सांगितले. त्याना तो कामाला लागला. महिन्याला ७५ रू. पगार आणतो. याचा आनंद होताच. त्यानी दुसऱ्या दिवशी त्यांच्या सोसायटीतून पैसे काढले आणि नानुचे ॲडमिशन झाले. किर्ती कॉलेजला संध्याकाळच्या बॅचला. त्यावर्षी त्या कॉलेजने नोकरी करणाऱ्या मुलांसाठी संध्याकाळच्या कॉलेजचा निर्णय घेतला. त्यात खूप मुलांनी प्रवेश घेतला. पण अडचण होती ती संध्याकाळी सहाचे कॉलेजमध्ये पोहोचणार कसा? पुन: नानुने डॉमनिकला सांगीतले.

"तू काळजी करू नकोस ! मी पहातो , जर आपल्याला आपल्या नोकरीतून कॉलेज बुडवावे लागत असेल तर कॉलेजसाठी ही नोकरी सोडायची, दुसरी धरायची!" डॉमनीक.

"अरे पण कोण देणार ?"

"देणार ! तु धीर धर! तुझा आता अनुभव चांगला आहे. मुळात तु हुशार, मोटारचे सगळे काम तु जाणतोस तेव्हा पाहू ! माझ्यावर सोड !" डॉमनीक.

दुसऱ्या दिवशी त्याने त्या नोकरीचा राजीनामा दिला. आणि दुसऱ्या दिवशी

डॉमनीक बरोबर संध्याकाळी परळच्या एका गॅरेजमधे आला.

"तात्या शेठ ! नमस्कार!" डॉमनीक.

"वा! वा! डॉमनीक शेट... नमस्कार! आज दर्शन कसे?" तात्या.

"कामासाठी"! डॉमनीक.

"कुणाला तुम्हाला! की या मुलाला"?

"दोघांनाही !"

"वां ! आमचे नशीब फळफळले ! अरे माझा पेंटर केरळला गेला तो परतलाच नाही. १०/१२ गाड्यांची पेंटींग बाकी आहे ! तेव्हा उद्यापासून यायचे! आणि हा मुलगा ?" तात्या.

"तो वेल्डर आहे, फिटर आहे !" डॉमनीक.

"वा ! मग त्यालाही ठेऊन घेऊ !" तात्या.

"पण त्याची एक अडचण आहे !" डॉमनीक.

"काय?" तात्या.

"याला पाच वाजता सोडायचे. येथूनच तो त्याच्या कॉलेजला जाईल!" डॉमनीक.

"काही हरकत नही ! पण रविवारी यावे लागेल "! तात्या.

"चालेल!" डॉमनीक.

आणि कॉलेज आणि नोकरी सुरू झाली. ३०० रू. पगार दर महिना आणि पाच वाजताची सुट्टी नानुच्या पथ्यावर पडली. कॉलेज सुरू झाले.

सहा महिना नंतरची फि नानुने भरली. आणि आपले कामही चालू ठेवले. सगळे शिक्षण इंग्रजीत. पण पूर्वीचे मराठी तेव्हा थोडे कठीण जाई, वेळ मिळत नव्हता. कॉलेजमधून येई तो ९ वाजायचे. जेवण असेल तर जेवणे नाहीतर काहीतरी करणे वा गप्प झोपणे. काम आणि अभ्यास याचे समीकरण काही जमत नव्हते. येवढ्यात एक नामी संधी चालून आली. तो गेली अनेक वर्षे पूर्वीच्या प्रजा समाजवादी पार्टीशी संबधीत होता त्यामुळे त्यावेळी 'अपना बाजार' या संस्थेच्या कार्यालयात कारकूनाची जागा होती त्यासाठी वाय. एस्. गाडे, राम महाडीक हे ओळखत असल्याने नोकरी मिळाली अकाउंटस् डीपार्टमेंटला. वेळ ही मिळे व मग पहिल्या वर्षाच्या परिक्षेत पास. दुसऱ्या वर्षाचे ॲडमीशन झाले (Inter चे) नानु खूश होता. आपली गाडी बिना अडथळा पुढे जात आहे. मग तीही परिक्षा झाली पण तत् पूर्वी इम्प्लॉयमेंट एक्सचेंजमधून कॉल

सुरू झाले. डि.पी.टी., नेवी, इन्कम टॅक्स, इ. वरून व नोकरीची नवी संधी आली नेवीला ....... म्हणून मग इन्कम टॅक्सला तो लागला. आता गाडी स्थिर होती. पण अभ्यास नीट होईना आणि नवीन असल्याने रजाही मिळेना. मग काय केटी दोन विषयात.

नानुला खूप वाईट वाटले. त्याच्या बरोबरीची सगळी मुले पास. मग तो ऑक्टोबरला बसला नी पास झाला. अर्थात पास क्लास विषय सोडून.. पण गाडी पुढे ढकलली गेली. तो नापास झाल्याचे समजले पण बाबा म्हणाले...

''तु अभ्यास केला ना. इंटरचा मग पास काय नी नापास काय ? फरक पडत नाही पुढे पास होशील !'' बाबा.

नानुला बरे वाटले हे ऐकून पण वर्ष वाया गेले याचे त्याला खूप वाईट वाटले. मग ऑक्टोबरच्या परिक्षे नंतर रिझल्टपर्यंत नोकरीत तो स्थिर झाला.

आता संध्याकाळचे कॉलेज जमेना, मग चौकशीअंती समजले की रुईया कॉलेज, बी.ए.साठी सकाळच्या वेळेला घेणार आहेत. ह्या पर्वणीचा फायदा घेण्यासाठी नानुने रुईयात ॲडमीशन घेतले, नी शिक्षण पुढे चालू राहिले. आपली गाडी ढकलत का होईना पुढे जात आहे यातचं त्याला आनंद वाटत होता. आपल्या कर्तुत्वाच्या अनेक वाटा आहेत. आता हे शिक्षण पदवीचे संपले की आपण निर्णय घ्यायचा आहे याची तो वाट पहात होता.

आपल्या आयुष्याचा उपयोग भव्य दिव्य कर्तुत्वाने उजळायचे, देशाचे, पुढच्या पिढीचे भवितव्य घडवायचे यासाठी त्याच्या मनामधे चाललेली खळबळ अधिकच अस्वस्थ होत होती. तो ज्या खात्यात काम करीत होता, तेथे पावला पावलावर भ्रष्टाचाराची कुरणे होती. आपण या दलदलीत फसायचे नाही. आणि म्हणून शक्यतो दूर रहायचे यासाठी तो स्वतःला अलिप्त ठेवित होता. आणि एक दिवस त्याने निर्णय घेतला की ही नोकरी सोडायची. त्यासाठी तो संधी शोधीत होता.

मधल्या काळात त्याने कायद्याची डिग्रीही मिळवली. पण आता प्रॅक्टीस करणे तितकेसे सोपे नव्हते, आणि या क्षेत्रात त्याला करियर करायचेच नव्हते. तो हुशार होता आणि तशी संधी त्याला चालून आली.

आर.बी.आय. ने एक स्पर्धा घेतली होती निबंधाची, विषय होता ''भारतीय अर्थशास्त्राच्या देशाच्या उत्कर्षासाठीच्या संधी''. नानुचा अभ्यास, कायद्याचे सखोल ज्ञान व अर्थ खात्यातला अनुभव, तेथील प्रत्येक जणाचे निरीक्षण यामुळे

त्याने तो निबंध लिहीण्याचे ठरवले. आणि त्याने तो निबंध एक महिन्याची रजा घेऊन लिहीला.

भारत देश हा मुलत: कृषीप्रधान देश आणि म्हणून आपली प्रगती कृषी क्षेत्रातली प्रगतीशी जोडून, त्या क्षेत्रात अमुलाग्र बदल कसा करता येऊ शकतो याचा सखोल अभ्यासपूर्ण असा तो लेख होता. तो निबंध त्याने सादर केला. या निबंधात कारखानदारी, लघु व मोठा व्यवसाय याचाही आढावा घेतला गेला. देशाचे अर्थकारण, त्यासाठीच्या उपलब्ध संधी व इतर सोर्सेस याचाही आढावा त्या निबंधात घेतला गेला.

शिवाय या देशातील बँकीग, इन्सुरन्स, आयात-निर्यात आणि भारतातील कारखानदारी याचा अभ्यास पूर्ण आढावा त्याने घेतला आणि तो निबंध आर.बी.आय.ला पाठवून दिला, या स्पर्धेत अनेक नामवंत प्राध्यापक, अर्थतज्ञ, अभ्यासक यांचेही निबंध आले होते. यासाठी परीक्षक म्हणून आर.बी.आय. चे गर्व्हनर, अर्थमंत्री, काही खात्याचे मंत्री शिवाय अंबानी यानाही निमंत्रीत करण्यात आले. व या सगळ्या निबंधावर एक विस्तृत चर्चा सत्र आयोजीत करण्यात आले होते.

यासाठी सगळ्या स्पधर्कांना आर.बी.आय.ने निमंत्रीत केले होते. व प्रत्येकाला आपले विचार पंधरा मिनिटात मांडण्याची संधी देण्यात आली होती.

पहिल्या दिवशी चर्चासत्राचे उद्घाटन माननीय राष्ट्रपती यांच्या शुभ हस्ते केले गेले व निबंधाच्या लेखकांचा यथोचित सत्कार करण्यात आला होता.

नानु देसाई या चर्चा सत्रात इन्कम टॅक्समधला एक निरीक्षक म्हणून, सामान्य, व्यक्ती होता. त्यात इतर दिग्गजांचा समावेश होता. यात नानुला मोठा अभिमान वाटला व त्याच्या खात्यालाही. दिल्लीला आय.टी.च्या चेअरमननी त्याचा सत्कार केला बोलावून. त्यानंतर पाच दिवस हे सत्र चालू होते.

हजारो निबंधातून पंचवीस निबंधाची निवड करण्यात आली होती. आणि या निबंधामध्ये जो विचार पुढे येईल त्या नुसार देशाचे अर्थमंत्री बजेट सादर करणार होते शिवाय स्पर्धकांनी व्यक्त केलेल्या विचारांवर दिग्गज अर्थतज्ञांचे विचारही व्यक्त होणार होते.

नानु देसाई यांचे भाषण दुसऱ्या दिवशी सकाळी होते. नानु पूर्ण तयारीने आणि आत्मविश्वासाने दिल्लीला आला होता. आपण एक सामान्य निरीक्षक आहे हे तो विसरला. यापूर्वीही नानुचे अनेक नियतकालीके, वर्तमान पत्रे यामधे

देशातल्या व जागतिक घडामोडीवर अनेक प्रकट विचार विद्वान लोकानी प्रशंसले होते. आणि या परिषदेत त्याचा व्यासपिठावर व समोर महान व्यक्ती हजर होत्या. त्याचे विचार ऐकण्यासाठी.

प्रथम त्याने सर्वांना आदरपूर्वक नमन केले. महात्मा गांधी, आंबेडकर याना अभिवादन केले व आपल्या भाषणाला सुरूवात केली. अत्यंत नम्रपणे.

आज मी आपल्यापुढे भारत देशाच्या अर्थव्यवस्थेवर अधिक तर बोलणार आहे. माझ्या निबंधात मी देशाच्या सर्व क्षेत्राच्या संबधी लिहीले आहे आणि तो निबंध आपल्या सारख्या विद्वान अभ्यासकानी वाचला आहे. तेव्हा आता त्या विषयांव्यतिरिक्त मी वेगळ्या क्षेत्रावर माझी मते व्यक्त करणार आहे.

मी एक सामान्य अर्थखात्यातला निरीक्षक आहे. माझ्या पुढे काही मोठ मोठ्या पदव्या नाहीत. पण अभ्यासामध्ये मला जे जाणवले कि ज्यामुळे माझ्या भारत मातेला वृद्धींगत अवस्था येऊन या देशाचा भाग्योदय कसा होऊ शकतो या बाबत बोलणार आहे.

समोरच्या श्रोत्यांनी टाळ्याच्या कडकडात नानुचे स्वागत केले. स्टेजवरच्या दिग्गज नेत्यानीही त्याच्या विचाराची दिशा जाणवली व ते सावरुन बसले.

आपली राज्य घटना ही लोकशाही पद्धतीची असून सगळ्या देशांच्या घटनेचे नवनीत आहे. मी डॉ.बाबासाहेबांना अभिवादन करतो. त्या घटनेत सामान्य माणसापासून श्रीमंतापर्यंत सर्वांना समान हक्काची देणगी लाभली आहे. पण तरीही देशात विषमता आहे. यावर जर मात करायची असेल तर आपल्याला आपल्या देशाच्या आजवरच्या अर्थासंबंधीच्या पद्धतीत अमुलाग्र बदल करणे गरजेचे आहे. कृषी क्षेत्रापासून मोठ्या कारखानदारीला सोबत घेऊन आपण आपले धोरण आखणे जरूरी आहे. आज बँकींग, इन्स्युरन्सं, सर्व्हिसेस इंडस्ट्रीज, हॉटेल क्षेत्र, सॉफ्टवेअर इंडस्ट्रीज, या आपआपल्या परिने आकाशाला स्पर्श करीत आहेत. पण मला जाणवते आहे की या सर्व क्षेत्रामधे जो संपर्क होणे जरुरी आहे ते आज झालेले दिसत नाही. या सर्व क्षेत्रांची जोडणी करून, मिळणारा नफा योग्य पद्धतीने नियोजन करून जर वापरला तर देशाची अर्थिक उन्नती होऊ शकते.

खरे तर यावर टाळ्यांचा कडकडाट झाला व सर्वांनी नानुच्या विचारांना उचलून धरले. अनेक मिनिटे हा टाळ्यांचा कडकडात थांबला नव्हता, नव्हे स्टेजवरील दिग्गजही यात सामील झाले होते. खरेतर १५ मिनिटांची वेळ १/२

तास होऊन गेला पण कोणीच त्याचे भाषण थांबविण्याची सुचना करीत नव्हता. उलट आर.बी.आय.च्या चेअरमननी उभे राहून...

''मि. नानु देसाई ! आपण आपले विचार आपल्या भाषणात अधिक स्पष्ट करावे ''असे सांगितले. त्यांच्या बोलण्याचा आदरपूर्वक स्वीकार करून नानुने आपले भाषण सुरु ठेवले.

धन्यवाद ! आपण देशाला जगाच्या पटलावर जर प्रभावीपणे आणायचे असेल तर आपण आपली इंडस्ट्री, स्मॉल स्केल इंडस्ट्री व मोठे कारखाने यामधे एक साखळी निर्माण करावी. देशात होणारा आयात कमी करून त्याचेच येथे जर आपण निर्मिती केली तर त्या वस्तुंचा निर्यात वाढेल. ही क्षेत्रे प्रगत झालीच पाहिजेत. आपण पाहतो जे देश आज स्वत: निर्मिती न करता आयातीवर जास्त भर देत आहेत ते गुलामीचे लक्षण आहे! क्षमा करा, पण हे सत्य आहे. आज रूपयाची किंमत दिवसें दिवस कमी होत आहे हे ही जागतिक बड्या राष्ट्रांचे एक षडयंत्र आहे. हे कां आमच्या ध्यानात येत नाही ? याचा अनेक वेळा प्रश्न पडतो. शस्त्रास्त्राची निर्मिती करुन त्याचा निर्यात करा. त्यासाठी त्या क्षेत्रात संशोधनाची एक साखळीच निर्माण करा ज्यामधून सर्वच क्षेत्रात आपण प्रगती करू. साध्या पीनसाठीही आपण कोणा दुसऱ्या देशावर विसंबून रहाता आपल्या देशातच याची निर्मिती केली पाहिजे.

माझ्या देशाच्या अर्थव्यवस्थेची घडी बसवण्यासाठी आपण आज आपल्यात असलेल्या करआकारणीचा नीट अभ्यास करावा. लोकांवर बोजा न टाकता देशाच्या तिजोरीत कसे पैसे येतील हे पहावे. सर्व क्षेत्रात सामावून घेणारे कराची पद्धत असावी. असे मला वाटते. त्यामुळे भ्रष्टाचार समूळ संपेल.

तो बोलत असताना सगळे ऑडीटोरीयम शांत होते. तो बोलत असताना अनेकजण त्यांचे विचार आपल्या लॅपटॉपवर टाईप करीत होते. प्रत्येकजण कान टवकारून एक एक शब्द कानानी पिऊन घेत होते.

आपण म्हणतो आपला देश किसानांचा देश आहे. पण त्या क्षेत्रातही संशोधनाचा अभाव आहे. आपण आपले अन्नधान्य व इतर पोषक गोष्टींचा निर्यात वाढवायला हवा.

सहाजिकच आपल्या मालाला चांगले बाजार मिळेल व रूपयाची व्हॉल्युही वाढेल. आपण, म्हणजे भारत देशाने डॉलरचा भाव ठरवायला हवा असे नाही वाटत आपणाला ? टाळ्यांचा कडकडाट झाला. सारे सभागृह उभे राहीले. त्यांनी

नानु देसाई याच्या विचारांचे स्वागत केले.

गेले दोन अडीज तास नानु देसाई यांचे विचार ऐकून सारेजण तृप्त झाले होते.

''आपणास माझे विचार आवडले असतील तर त्याची योग्य रितीने अंमलबजावणी करा. सर्व क्षेत्रे सक्षम आणि वेगवान करा. बँकांतील पै नी पैसा यांचा वापर व्हावा. आणि मुख्य म्हणजे देशात गरीबीचे पूर्ण उच्चाटन करा. त्यांना काम द्या, कामकरून घेऊन योग्य दाम द्या. म्हणजे सर्व देश सुखी होईल आणि येथे सोन्याचा धूर निघेल. असे मला वाटते.

जाता-जाता मला एक गोष्ट आपण सर्व भारत वर्षाच्या शिलेदारांना सांगायची आहे. या देशाचे भवितव्य आपल्या हातात आहे. आपण भारत भरच्या सर्वच क्षेत्रातली दिग्गज आहात मला आशा आहे आपल्या खांद्यावर भारताची अर्थसंस्था सुदृढ होईल आणि आपला देश जगात अव्वल होईल.

''धन्यवाद!''

टाळ्यांच्या कडकडात देसाईच्या भाषणाचे स्वगत झाले. दुपारच्या लंचची वेळही टळून गेली होती. येवढ्यात नानु आपले भाषण संपवून स्टेज खाली उतरणार तेव्हा... अर्थमंत्र्यांनी त्याना थांबवले. मि.देसाई तुमची जागा खाली नाही. मि.देसाई तुम्ही या खुर्चीत बसा. तुमच्या सारख्या तरूणांच्या हातातच भारत वर्षाचे भवितव्य आहे. तेव्हा या खुर्चीत बसा !'' अर्थमंत्री.

''नाही सर ! मी तुमच्या सांगण्याचा आदर करतो! मी एक सामान्य गृहस्थ आहे. माझ्या देशाच्या प्रगतीसाठी मी सदैव आपला आहे ! धन्यवाद !''

स्टेजवरची खुर्ची आदरपूर्वक नकार करून नानु खाली उतरला खरा पण खाली बसलेल्या सभाग्रहातील सर्वच क्षेत्रातील दिग्गजानी उभे राहून त्याला अभिवादन केले.

आणि नानु तिसऱ्या रांगेतल्या आपल्या खुर्चीत जाऊन बसला. गेला २।। तास तो बोलत होता आणि संपूर्ण सभागृह नम्रपणे कान देऊन ऐकत होते.

त्या नंतर पंतप्रधानांचे भाषण झाले.

त्यांनी प्रथम श्री. नानु देसाई यांचे अभिनंदन करून त्यांच्या सर्वच विचारांचे स्वगत केले व देशाच्या अर्थकरणात सक्रिय होण्याची विनंती केली.

''प्रथम मी त्याना प्रधानमंत्र्यांच्या कार्यालयामध्ये डेप्युटी डायरेक्टर म्हणून नेमणूक करीत आहे ती संधी त्यानी स्वीकारावी. शिवाय त्यांना सेंट्रल बोर्ड डायरेक्टर ऑफ टॅक्सेसवर सन्माननीय सदस्य म्हणूनही नेमित आहे त्याचाही

त्यांनी स्वीकार करावा...

सभागृहाने टाळ्याच्या गजरात नानु देसाई यांचे अभिनंदन केले.

कार्यक्रम संपला लंच झाला. सर्वजण त्याचे अभिनंदन करीत होते. आणि अत्यंत नम्रपणे देसाई ते स्वीकारीत होता.

देसाई महाराष्ट्राच्या रेस्टारंटवर आला. त्यानी आपल्या बॅगा, पूस्तके बांधली आणि निघणार येवढ्यात रिसेप्शनचा फोन आला.

हे सगळे अगदी स्वप्नवत वाटत होते नानुला. कधी अपेक्षाच नव्हती केली. पण मनात इतके दिवस अर्थशास्त्राचा अभ्यास व सखोल निरीक्षण हे कोठे तरी कामाला यावे असे त्याला वाटत होते. आज त्याचे चीज झाले. त्याने मांडलेले विचार सर्वांनी स्वीकारले आणि आता भारताची महासत्ता होण्याचा मार्ग मोकळा झाला असे नानुला वाटत होते. आजच्या कार्यक्रमात दिग्गजानी त्याच्या मताचा आदर केला हेच आपले मोठे यश असे नानु मानत होता. त्याने डोळे मिटले आणि आजचा सगळा प्रकार, त्याची सादर करण्याची हातोटी, भाषेवरील प्रभुत्व, आणि विशेष म्हणजे आदरयुक्त बोलणे दिग्गजांसमोर हे सारेच नानुला स्वप्नवत वाटत होते. त्याने डोळे मिटले. आणि सगळा प्रकार डोळ्यासमोर आणला. त्याने ते श्रेय आपले वडील, गुरुजन, मुख्यत्वे प्रा.शाहुराजा. यांना अर्पण केले. हे सारे श्रेय त्याच्या आजवरच्या अभ्यासाला, चिकाटीचे होते तरी तो ते स्वत:चे यश म्हणून मानीत नव्हता.

त्याला माहीत होते. त्याची अभ्यासातली वाटचाल, नंतरच्या अडचणी, उल्कावरचे आपले एकतर्फी प्रेम. आणि त्यातून निर्माण झालेला बखेडा. सारे त्याला आठवले. तो थोडा अस्वस्थ झाला. पण त्याने तो विषय झटकण्याचा प्रयत्न केला, पण डोळ्यासमोरुन दूर करता येईना. शेवटी ते पहिले प्रेम होते. ते जीवनाच्या शेवटच्या क्षणापर्यंत त्याला स्फूर्ती देत राहिली. आणि त्या स्फूर्तीमुळेच हे आजचे यश त्याला लाभले होते.

जे अशक्य होते त्याच्या मागे पळून काय मिळणार होते. मध्ये बराच काळ निघून गेला. पण त्या स्फूर्तीनी त्याला चिकाटीची दिक्षा दिली होती. आपण जरी गरीबीतून आलो होतो, बालपणानंतरचा काळ संघर्षमय झाला होता तरी त्या सगळ्याचे श्रेय त्याने उल्काला दिले होते. ति पुढे कोठे गेली, तिचे काय झाले याचा शोध नानुने घेतला नाही, उलट तिला केंद्रस्थानी मानून आपण गरूडझेप घ्यावी याच इराद्याने त्याचा अभ्यास चालू होता. आता तो मात्र थोडा भावनावश

झाला होता. ती जरी कोठेही असेल तरी ती त्याच्या जवळ आहे. याचा साक्षात्कार त्याच्या संघर्षमय जीवनात नानुला येत होता. गेली १० वर्षे तो सातत्याने भारताच्या आर्थिक धोरणाचा अभ्यास करीत होता. त्यातले यश, अपयश, अर्थमंत्र्यांनी सादर केलेले बजेट, या सगळ्या विश्लेषणातून त्याला जे वाटले, पटले ते त्याने न भिता, आपण कोण आहोत हे विसरून आजच्या परिषदेत मांडला. अगदी निरपेक्षीत पणे. त्याने परमेश्वराचे, आई–वडीलांचे आशिर्वादाचे हे फळ आहे हे तो मनोमन मानीत होता. त्याच्या वडीलांनी जर त्या वेळी बाहेरचा रस्ता दाखवला नसता तर ? तर त्याच्या जीवनाला आताची झळळी आली नसती, हे हि तो जाणून होता. या सगळ्याचा परिपाक म्हणून आजचे यश होते हे नानुने मानले आणि सर्वांना मनोमन धन्यवाद दिले.

येवढ्यात सर! आपल्यासाठी पंतप्रधानांनी गाडी पाठवली आहे. प्रथम तुम्ही त्यांच्या कार्यालयामधे जाऊन पदग्रहण करा. आपली रहाण्याची व्यवस्था इल्झो बंगल्यात करण्यात आली आहे. तेव्हा सगळ्या सामानासह खाली या !

नानु देसाईच्या डोळ्यात पाणी उभे राहीले, आपण ही अपेक्षा कधीही केली नव्हती ५०% नी पास झालेल्या नानुला आपले अश्रू आवरता आले नाहीत...

त्याने वडीलांना फोन करून ही बातमी सांगीतली... त्यानीही त्याचे अभिनंदन केले.

दुपारचे ३।। वाजले होते आणि फोन आला, तो थोडा गडबडलाच, हे सारे अपेक्षित नव्हतेच. त्याचे दोन्ही पाय जमीनीवरच होते. त्याने या कार्यक्रमासाठी शिवलेला कोट घातला. आता तेथे जाणेच आहे. आणि हा सन्मान स्वीकारावाच लागणार होता. पण हे वज्र पेलणे त्याला शक्य होते हे ही त्याने मनोमन स्वीकारले होते. आणि तो खाली आला. रिसिप्शनला भेटला. तिने दोन लखोटे नानुच्या हातात दिले. उघडले आणि समोरच्या खुर्चीत बसून वाचले.

खरोखरच पंतप्रधानानी त्याची नेमणूक डेप्यूटी सेक्रेटरी आणि आर्थिक सल्लागार) म्हणून केली होती. दुसऱ्या पत्रात अर्थमंत्र्यांनी नानुची नेमणूक स्पेशियल ॲडव्हायझर टू द सेंट्रल बोर्ड ऑफ डायरेक्टर या पदावर केली होती.

त्याच्या समोर पंतप्रधान कार्यालयाची एक संधी आणि गाडीचा डायव्हर उभा होता.

''सर तुम्हाला न्यायला मी आलो आहे. आपण चलावे. पंतप्रधान आपली वाट पहात आहेत!'' अधिकारी.

ते निघाले १५ मिनिटाचा रस्ता होता. गाडी वेगाने चालली होती.

नानुने त्या अधिकारी महिलेला पाहिले, आणि तो चक्रावलाच. त्याच्या पुढे चेहरा येत होता तो उल्कचा. पण तीच नक्की असेल कां? कसे शक्य आहे? तीच्याबद्दल आपण येवढ्या १५/१६ वर्षात काहीच ऐकले नव्हते. नव्हे त्याचा शोध घेण्याचे त्याने टाळले. ती असेलही पण ही वेळ ती नव्हती.

गाडी पंतप्रधान कार्यालयाच्या पोंचमध्ये आली, तीने झटपट उतरून नानुच्या बाजूचा दरवाजा उघडला व तो उतरताच ती पुढे निघाली. आणि नानु मागून पंतप्रधानाच्या केबीनसमोर येताच...

''कृपया थांबा थोडे.''

अशी ती म्हणाली आणि पंतप्रधानाना भेटून बाहेर आली आत या म्हणत ती प्रथम आत गेली आणि नानु मागून.

आत येताच नानुने पंतप्रधानला अभिवादन करीत नमस्कार केला. आणि पंतप्रधान ही आपली खुर्ची सोडून उठले बाहेर आले.

''मि. देसाई प्लीज सीट.'' पंतप्रधान

''ओके सर.'' नानु

म्हणत नानुने पंतप्रधान आपल्या खुर्चीत बसल्यावर स्थान ग्रहण केले. त्यांनी त्या बाईना सांगून कार्यालयातील मधल्या सर्व वरिष्ठांना बोलाविले. ते सगळे एका बाजूला उभे होते.

''ऑफीसर! ही इज मि.देसाई, इज अपॉन्ट ॲज डेप्युटी सेक्रेटरी इन आवर ऑफीस ॲन्ड यू ऑल शूड वर्क ॲज ही डायरेक्ट पी.एम. ओके.''

मग सर्व आफीसरर्सनी नानुला नमस्कार केला. नानुने उभा राहून तो स्वीकारला.

मग बराच वेळ त्या दोघांमधे चर्चा झाली. जवळ जवळ १/२ तास. त्यानी एक फाईल नानु पुढे ठेवली त्यात अनेक प्रॉब्लेमची नोंद होती आणि सरकारला त्यावर निष्णात मत हवे होते. एका निस्वार्थी व्यक्ती कडून. त्यानी एक पुष्पगुच्छ नानुला दिला. त्याने तो आदरपूर्वक स्वीकारला. तोवर ती महिला अधिकारी उभी होती. ''मॅडम याना त्यांची केबीन दाखवा. आणि त्याना कोणत्याही अडचणी येणार नाही याची काळजी घ्या. आज पासून तुम्ही मि.देसाई यांच्या पी.ए. आहात हे ध्यानात ठेवा. तशी ऑर्डर मी काढतो !''

'' हो सर!'' ती अधिकारी.

नानुला त्या मॅडमनी आपल्या कॅबीनमध्ये सोडले. आणि फटफट सबोर्डीनेट स्टाफना ऑर्डर सोडल्या. तत् पूर्वी तीने त्या कॅबीनमध्ये सगळी व्यवस्था स्वतः केली. पंतप्रधानाकडून येताना तिने त्यानी दिलेली फाईल नानुच्या समोर आणून ठेवली तेव्हा ५ वाजले होते.

नानुने ती फाईल उघडली आणि त्या फाईलमधल्या पंतप्रधानाच्या सुचना वाचल्या. तोवर ६ वाजले होते. ऑफीसची वेळ ६ पर्यंतची आहे हे नानु जाणत होता. पण ती फाईल पूर्णपणे वाचून होत नाही तोवर निघण्याचा विचार त्याने बाजूला ठेवला पंतप्रधान ही रात्री ९/१० वाजेपर्यंत बसतात हे तो जाणून होता.

''मॅडम ! तुमची वेळ झाली असेल तर आपण जाऊ शकता !''

''नाही सर! इथला सिरस्था आहे की जोवर तुमचे बॉस निघत नाहीत तोवर तुम्ही जायचे नाही. दूसऱ्या दिवसाच्या सुचनानंतरच ऑफीस सोडायचे तेव्हा जोवर आपण आहात तोवर मी आहे. आपण मला इंटरकॉमवर सूचना द्या!'' उल्का.

नऊ वाजता पंतप्रधान निघाले त्यांनी देसाई यांच्या कॅबीनमध्ये डोकावले.

''आय वॉज......... ओके.'' पंतप्रधान.

सव्वा नऊ वाजता आपण निघावे यासाठी नानुने इंटरकॉमवरून उल्काला मी निघत आहे असे सांगितले.

''मॅडम प्लीज कम. धिस फाईल इ अॅन इम्पोरटंट फाईल अॅन्ड स्पेशल! तेव्हा सांभाळून ठेवावी. आणि उद्या मला देणे !'' नानु.

तो बाहेर आला तसा तीही.. आणि त्याच्यासाठी तयार गाडीत बसणार येवढ्यात...

''तुमची जाण्याची व्यवस्था ?''

''मी तुम्हाला सोडेन आणि हिच गाडी घेऊन जाईन !'' उल्का.

ती पूढच्या सिटवर डायव्हर जवळ बसणार येवढ्यात...

''मॅडम प्लीज तुम्ही मागच्या सिटवर बसा ! तुमची जागा ती नव्हे ! प्लीज!'' नानु.

ती प्रथम थोडी घाबरली. असे पूर्वी कधी घडले नव्हते. हे सारे अनपेक्षीत होते तीला....

''तुमचे भाषण चालू असताना मी ते ऐकले. आजवरचा माझा अनुभव वेगळा होता. तुमचा आत्मविश्वास, त्या विषयाचा अभ्यास, करारीपणा सारे

काही अलौकिक होते. तेच तुमचे यश. म्हणून तुम्हाला हा सन्मान मिळाला. येथे अनेक लोक येतात पण पंतप्रधान आपल्या खुर्चीतून उठले हे मी पहिल्यांदाच पाहिले !'' उल्का

''थॅंक्स!'' नानु.

येवढ्यात गाडी महाराष्ट्र सदनात येऊन थांबली.

''सर तुमच्या राहण्याची वेगळी व्यवस्था उद्यापर्यंत होईल मग तुम्ही त्या बंगल्यात शिफ्ट व्हायचे आहे !'' उल्का.

''ओके !''

म्हणत नानु आपल्या रुममध्ये आला. आता तो एकटाच होता. भूक लागली होती. त्याने इंटरकॉमवरून शाकाहारी पदार्थ मागविला (महाराष्ट्रीयन थाळी) आणि फ्रेश होऊन येतो. येवढ्यात जेवण आले. त्याने जेवण घेतले.

रात्री झोपताना त्याच्या डोळ्यासमोर शाळा आणि उल्काचा चेहरा सारखा तरळत होता. तिच असेल कां ? ती, कसे शक्य आहे. ती मुंबईला आता दिल्लीत. पण त्याचे मन सांगत होते तीच असणार पण विचारायचे कसे? ठीक आहे. काळच हे कोडे सोडवील. आणि तो झोपला. झोपताना सकाळपासूनच्या सगळ्या घटना डोळ्यासमोर सरकत होत्या आणि आता उल्कापर्यंत.

सकाळी साडे आठ वाजता गाडी आल्याची सूचना रिसेप्शनने दिली. तो खाली आला. पी.एम.बद्दल त्याला माहिती होते. ते वेळेचे पक्के. नऊ वाजता येतात आणि जाण्याची वेळ नक्की नसते.

नानु पंधरा मिनिटात तयार होऊन खाली आला. आज त्याने सफेद सुट घातला होता. खूपच छान दिसत होता वयाच्या पस्तीशीत. तो आपल्या केबीनमध्ये येणार तो मागून पी.एम. आले तो थांबला, पण पी.एम.नी त्याच्या खांद्यावर हात ठेवीत.

''यंग मॅन'' म्हणत ते पुढे निघून गेले.

आपल्या केबीनमधे नानु आला तोच उल्का कालची फाईल घेऊन आली. तो येण्या अगोदरच काफीचा ट्रे तयार होता. तिने कपात कॉफी ओतली...

''सर कॉफी.''

''तुम्ही घेतली कां ?'' नानु. .

''होय !'' उल्का.

आणि ती निघून गेली. एवढ्यात पंतप्रधानांचा फोन आला.

"मि.देसाई! तुम्हाला गरज पडली तर मला इंटरकॉमवर फोन करा मी कितीही व्यस्त असलो तरी आपल्या जवळ बोलेन !" पंतप्रधान.

"ओके सर!" नानु.

दुसरा दिवस शनिवार होता. खरेतर त्याला मुंबईला जायचे होते. पण पंतप्रधानानी हे तातडीचे काम सोपवल्यावर आज रजा असूनही त्याने शनिवारी ऑफिसला यायचे ठरवले. आणि तो येणार म्हणून उल्कालाही यावे लागले.

"मॅडम आज रजा आहे ! तुमचे घरी काम असेल तर जाऊ शकता वा रजेच्या दिवशी घरीच रहा. मला कामाचे वेड आहे. ते पूर्ण केल्या शिवाय चैन पडत नाही तेव्हा मी आज आणि उद्या रविवारीही ऑफिसला येणार आहे !" नानु.

"ओके सर!" म्हणत ती निघून गेली. आणि संध्याकाळ पर्यंत बसून होती. खरेतर सरकारी नोकर हा चौवीस तास ड्युटीवर असतो.

संध्याकाळी ५ वाजेपर्यंत त्याच्या त्या फाईल वरच्या नोट तयार झाल्या आता उद्या डिक्टेक्ट करून सोमवारी सकाळी पंतप्रधानांना देण्यासाठी तयार ठेवायच्या होत्या. आजही उल्का त्याच्या सोबत होती. नानुला सोडून ती घरी जाणार होती.

"तुम्ही रहाता कोठे येथे दिल्लीत ?"

"मला रहाण्याची जागा ॲलॉट झाली आहे जवळच तेथे मी रहाते !" उल्का.

" आणि सोबत कोण कोण असते ?"

"कोणी नाही ! सर मी एकटीच असते. मी महाराष्ट्राची आय.ए.एस. अधिकारी. मला येथे पंतप्रधानानीच मागून घेतली आहे. दोन महिन्यापूर्वी मी येथे आले आहे !" उल्का.

"बरं ! मग असे करा आपण आज बरोबरच जेवण घेऊ ! ड्रायव्हरलाही जेवायला बोलवा ! चालेल ! " नानु.

"नको सर !"

"कां ?"

"काही नाही !"

"मग उशीरा आपण डिनर घेऊ आणि मग तुम्ही जाऊ शकता!" नानु.

त्या दिवशी जेवण घेऊन उल्का निघून गेली. पण नानुच्या डोळ्यात ती

अधिकच घट्ट होत गेली होती. ती तशीच दिसते. तिचा आवाज ही तसाच आहे, केसाची ठेवण तशीच आहे ! हे त्याच्या मनाने ताडले. म्हणजे तीच असणार ? नक्कीच.

अरे! आपण अजून तिचे नावही विचारले नाही. ती मुंबईतून आली मग..., म्हणजे नक्कीच ती असणार यात शंका नाही. ती येथे अनेक वर्षानी मला भेटते म्हणजे परमेश्वराची काय योजना असावी ?

दुसरा दिवस रविवार. ती सकाळी साडे सहा वाजता महाराष्ट्र भवनात हजर झाली व ती दोघे पंतप्रधान ऑफिसला आली. तेव्हाही पंतप्रधान आपल्या केबीनमधे आहेत हे त्याला समजले.

ऑफीसला येताच नानुने स्टेनोला डिक्टेशन दिले, ते दुपारी दोन वाजता संपले. पंतप्रधानाच्या सगळ्या सूचनांनुसार सखोल विचार करून त्यांचे निरसन केले. दोन दिवसात बजेट येणार होते म्हणून त्यावर चर्चा करण्यासाठी अर्थमंत्री स्वत: आल्या होत्या.

दुपारी चार वाजता ड्राफ्ट तयार झाला. आणि तो वाचून नानूने त्यावर सही केली फिनान्शियल ॲडव्हाझर टू द गर्व्हनमेंट ऑफ इंडिया म्हणून आणि उल्काला बोलावले. ''ड्राफ्ट मी सही केला आहे. हे काम अर्जंट आहे तेव्हा पंतप्रधानाना तो सादर करावा लागणार आहे तुम्ही तसा निरोप पंतप्रधानााना पाठवा !'' नानु.

पंतप्रधानानी ताबडतोब बोलावले त्यावेळी अर्थमंत्री पण तेथेच होते. त्या रिपोर्टसंबंधी प्रथम चर्चा झाली, पंतप्रधानानी समाधान व्यक्त केले. तूम्ही हे काम तातडीने कराल अशी माझी अपेक्षा होतीच.

अर्थमंत्री सोबत असल्याने त्यांनीही तो वाचला व समाधान व्यक्त केले. शिवाय त्यावर अनेक प्रश्न नानुला विचारले. अत्यंत आत्मविश्वासाने नानुने त्याला उत्तरे दिली व आपली बाजू पटवून दिली. तिघांचे एकमत झाले व या रिपोर्ट मधील ९०% गोष्टी आताच्या बजेट मधे घेण्याचे ठरले.

त्यानुसार संध्याकाळी केंद्रीय मंत्री मंडळाची मिटींग झाली आणि बजेट तयार करून झाले.

रात्रीचे १० वाजले होते. तो वर उल्काही थांबून होती.

''मि.देसाई! तुम्ही आज आमच्या बरोबर डिनर घ्या ! वेळ झालीच आहे!'' पंतप्रधान.

''एस सर, इटस् माय प्लेजर !'' नानु.

डीनर संपले. उल्काने जेवण घेतले त्यांच्या बरोबर आणि रात्री पावणे दहाला नानु घरी जायला निघाला. उल्का बरोबर होती. नानुला सोडून ती निघून गेली.

''यांना कोठेतरी पाहिले आहे ! चेहरा ओळखीचा वाटतो आहे. कदाचित ते आमच्या शाळेत तर नसतील ? उल्काने आपल्या डोक्याला खूप ताण देण्याचा प्रयत्न केला. म्हणजे तोच. मग त्याने मला ओळखले असेल काय? असेल तर का विचारले नाही माझे नांव, शाळा, कॉलेज इ. हा प्रश्न तिला आज सतावीत होता. यानी आपल्या कुटुंबाबद्दल मला काहीच सांगितले नाही की लग्न केले नाही ? तिने हा विचार झटकून टाकला. ती रात्री सव्वा दहा वाजता तिच्या कॉर्टरवर पोहचली.

आज नानु खूप थकला होता. पण आपल्यावर सोपविलेल्या जबाबदारीच्या कामाचे चीज झाले या आनंदात तो झोपी गेला.

सकाळी प्रथम त्याने बाबांना फोन केला व सगळा वृत्तांत सांगितला. त्यांनाही आपल्या मुलाचे कौतुक वाटले आणि आनंदही झाला. आणि त्याला कधी भेटतोय असे झाले. मी त्याच्याजवळ निष्ठुरपणे वागलो, त्याला घरातून बाहेर काढला. हे त्याच्या पथ्यावरच पडले. त्याने कष्ट करून स्वतःच्या पायावर उभे राहून नाव कमावले याचे त्याना अप्रूप वाटत होते आणि कौतुकही.

सकाळी नेहमी प्रमाणे तो ऑफिसला आला पंतप्रधान. उल्का सगळे हजर होते. अर्थमंत्री ही पंतप्रधानांच्या कॅबीनमधे बसले होते. आज बजेटचा दिवस होता. अकरा वाजता ते बजेट सादर करणार होत्या.

येवढ्यात उल्काने.....

''सर, हा तुमचा पास ! तुम्हाला आज लोकसभेत बजेटच्या वेळी हजर रहावे असे पंतप्रधानानी सांगितल्याचा निरोप तिने दिला. सर आता १० मि. आहेत आपण निघावे ''. उल्का.

''आणि तुम्ही नाही येणार ?''

''नाही ! आम्ही टीव्ही वर सगळे बजेट सगळे मिळून ऐकणार आहोत, तसा मोठा स्क्रिन बसवला आहे कॉन्फरंन्स रुममधे... ओके ! निघा तुम्ही !'' उल्का

आणि नानु तातडीने लोकसभेच्या गॅलरीत पोहचला. अर्थमंत्रींनी त्याच्या नावाचा उल्लेख आपल्या बजेटच्या भाषणात केला. आणि तो भरून पावला.

तो पुनः ५ वाजता ऑफिसला पोहोचला. दुपारी काहीही खाल्ले नव्हते. त्याने

बेल मारून कॅन्टीन मधून कॉफी व ब्रेड-बटर मागविले. येवढ्यात तो आल्याची बातमी कॉन्फरंन्स रुममधे बसलेल्या उल्काला समजली. ती ताबडतोब आली.

''सर ! आज अर्थमंत्रींने बजेटच्या भाषणात तुमच्या नावांचा उल्लेख केला आणि त्यावेळी पंतप्रधानांनी स्वत: टाळ्या वाजवल्या. आम्ही सर भरून पावलो ! अभिनंदन !'' उल्का.

''इटस् ओके कॉफी घेणार कां ?'' मी दुपारी काहीही खल्ले नाही... तेव्हा कॉफी घेतो आहे. तूम्ही लंच घेतला कां ?

''नाही ! सर.. आता जाऊन घेते !'' उल्का

आणि ती कॅबीनमधून निघून गेली. तिच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तो पहात राहिला, जोवर दरवाजा लागत नाही, तोवर कॉफी प्यायचा थांबला. नानुला १०, लिंक रोडवरचा सुरेश प्रभुंच्या बाजूचा बंगला अॅलॉट झाला होता.

'' सर ! तुमचे झाले असेल तर तुमच्या बंगल्यात जाऊ. काही त्रुटी असतील तर सांगा, त्या मी पुऱ्या करून घेईन'' उल्का.

''हो चला !'' आणि ती दोघे 'यशोधन' या बंगल्यात आले. त्यांनी तो प्रशस्त बंगला पाहिला...

''अरे पण येवढ्या मोठ्या बंगल्याचे मी काय करू, मी एकटा सडा फटींग ! नानु.

''ऐकटे ! आणि फॅमिली ?'' उल्का

''कोणी नाही मी लग्न नाही केले. माझे वडील आहेत तेवढेच!'' नानु.

''म्हणजे ? '' उल्का.

''सर ! हा बंगलाही उद्या तुम्हाला कमी पडेल. शेकडयांनी लोक येतील भेटायला... अंबानी, टाटा ! खरच हा बंगलाही अपूरा पडेल...!'' उल्का.

''ठीक आहे ! आज संध्याकाळीच सगळे सामान शिफ्ट करतो. मुंबईला माझी स्वत:ची लायब्ररी आहे शेकड्याने पुस्तके आहेत तीही येथे घेऊन येतो !'' नानु.

''सर तुम्हाला हवी असलेली सगळी पुस्तके तेथे उपलब्ध करून देऊ. अगदी जगाच्या पाठीवरची सगळी, शिवाय तुम्हाला मदत करायला येथे एक पी.ए., दोन कारकुन, कुक. सारे काही आहे. अगदी वेल फर्निश बंगला मी गेले दोन दिवस स्वत: तेथे वावरले आणि माझ्या चॉईसप्रमाणे साऱ्या गोष्टी केल्या आहेत.

''अरे ! पण केव्हा केले हे सारे ?''

''मी सकाळी ७ वा. येथे येई! सगळ्या सूचना देत होते आणि सारी व्यवस्था केली ! उल्का.

''धन्यवाद ! बाय द वे, तुमचे नांव काय ?''

''उल्का शेजवल !''

''ओके!''

आता उल्काकडे पाहण्याची त्याची हिम्मत होत नव्हती. तो कमालीचा लाजला आणि त्याची अवस्था पाहून उल्काही...

''तुम्हीही आता जेऊन जा !'' नानु.

मग खानसाम्याने तयार केलेली भाकरी, वांग्याचे भरीत दोघांनी घेतले आणि ती निघून गेली.

नानुला मात्र रात्रभर झोप लागली नाही. आपण आयुष्यभर ज्या नावाचा जप करीत आलो तिच अगदी योगायोगाने कशी भेटावी ? तिचेही लग्न झाले नाही. काय परमात्म्याच्या मनात आहे ? गॉड नोज.

त्या रात्री त्याला जराही झोप लागली नाही. त्यात नवी प्रशस्त जागा. बंगल्यात एकटाच. आणि बाहेर वॉचमन. बस भयाण वाटत होते त्या बंगल्यात. पण आता सवय करायला हवी. बाबांना येथे आणे पर्यंत.

दुसऱ्या दिवशी ड्रायव्हरने गाडी साडे आठ वाजताच आणली. तो साडे नऊ वा. ऑफिसला पोहोचला. तेव्हा त्याच्या टेबलावर एक लखोटा होता. त्यात त्याला भेटण्यासाठी सेंट्रल बोर्ड ऑफ टॅक्सेसचे चेअरमन येणार आहेत. त्याचे नाव होते श्री कुरूविल्ला.

नानुला आश्चर्य वाटले. कारण त्याने, ते मुंबईचे कमिशनर असताना त्यांच्या ऑफिसमधे काम केले होते. तो त्याना ओळखत होता. आणि म्हणून त्याने उल्काला बोलावून त्यांच्या स्वागतासाठी सगळी तयारी केली. ते त्यांचे आदर्श होते. विद्वान आणि सच्चा माणूस, कोणाच्या पैशालाही स्पर्श न करणारा, हर हुन्नरी, इमानदार, कष्टाळू.

सव्वा दहा वाजता कुरूविल्ला साहेब आले. ते बोर्डाचे मेंबर झाल्यानंतर नानुची भेट नाही झाली.

''अरे ! मि.देसाई तुम्ही ''! कुरुविल्ला.

''एस सर, मीच, तुम्हालाही पाहून मला आनंद झाला! नानुने एक पुष्पगुच्छ

देऊन त्यांचे स्वागत केले आणि आपल्या खुर्चीतून बाहेर येऊन त्यांच्या चरणस्पर्शासाठी नानु वाकला....

उल्काला आश्चर्य वाटले. कुरुविल्ला यांनीही एक मोठा पुष्पगुच्छ नानुला दिला.

''सर ! खूप आनंद झाला आहे इतक्या वर्षानी तुम्हाला पाहिल्यावर ! नानु.

''तुमचे त्या दिवशीचे कॉन्फरंन्स मधले भाषण अप्रतिम अभ्यासपूर्ण आणि मुद्देसुद, उदाहरणासहित. अगदी सर्वोत्तम, ऐकून मी प्रभावित झालो. मी पहिल्या रांगेत होतो. मला खूप आनंद झाला, मला समजले तुम्ही आमच्या खात्यात मुंबईला आहात !'' कुरुविल्ला. .

''धन्यवाद सर ! हो मी सी.सी.च्या ऑफिसमधे इन्सपेक्टर आहे, सर तुम्ही जेथे होतात तेथे ! नानु.

''आता मी काय बोलू पंतप्रधानानी आणि अर्थमंत्रीनी तुमची नेमणूक सेंट्रल बोर्ड ऑफ टॅक्सेसच्या बोर्डावर विशेष सल्लागार म्हणून केली आहे. तेव्हा आजच्या बोर्डाच्या मिटींगमधे येऊन आपण आम्हाला मार्गदर्शन करावे !'' कुरुविल्ला.

''माय प्लेजर !''

आणि त्यांना सोडण्यासाठी त्याच्या गाडीपर्यंत नानु गेला... उल्काला त्याचे आश्चर्य वाटले. तिला तो प्रकार अनोखा वाटला.

''सर ! त्यांना पोहचवायला त्यांच्या गाडी पर्यंत गेलात ?''

''हो ! एके काळी ते माझे बॉस होते. लाख मोलाचा हुशार आणि प्रेमळ व्यक्तिमत्व म्हणून !'' नानु.

उल्काला नानुच्या स्वभावाचे गणीत काही सोडविता येत नव्हते. हा माणूस येवढा नम्र कसा? जराही अभिमान नाही ! गर्व जराही नाही आपल्या पोस्टचा, ना शिक्षणाचा, योग्यतेचा. हा माणूसच वेगळे रसायन आहे. आणि म्हणून तो उल्कालाही आवडू लागला.

संध्याकाळी पाच वाजता सेंट्रल बोर्ड ऑफ टॅक्सेसच्या बोर्डाची बोर्ड मिटींग होती. साडे चार वाजता उल्काला घेऊनच तो बाहेर पडला जाण्यापूर्वी त्याने पंतप्रधानांना तसे कळवले होते.

तो जेव्हा सेंट्रल बोर्ड ऑफ टॅक्सेसच्या बोर्डाच्या ऑफिसमधे पोहोचला सगळे मेंम्बर्स खाली स्वागताला उभे होते. त्याने येताच सगळ्यांना नमस्कार

केला. आणि बोर्डरुम मधे बसण्याच्या सोयीमधे एक बदल केला. त्याने आपल्या बाजूला कुरुविल्ला साहेबांसाठी एक खुर्ची मांडायला सांगीतली याचे अप्रुप सर्वांनाच वाटले.

मिटींग सुरू झाली. प्रथम त्याचा सत्कार समारंभ आटोपला व कुरुविल्ला साहेबानी नानुची ओळख करुन दिली. ''आज आपला माणूस आपल्या समोर आहे ! त्यांची नेमणूक सेंट्रल बोर्ड ऑफ टॅक्सेसच्या बोर्डाच्या बोर्डावर विशेष सल्लागार म्हणून पंतप्रधानांनी केली आहे. वेळोवेळी ते आपल्याला मार्गदर्शन करतील !'' कुरुविल्ला. आणि त्यानी एक पुष्पगुच्छ त्याना (नानुला) दिला.

''आदरणीय सर ! माझ्या समोर बसलेल्या सगळ्या व्यक्तीमधे ज्यांच्या बरोबर मी काम केले ते सगळे आज बसले आहेत. ''मी येथे कसा ? असा प्रश्ण तुम्हाला पडला असेल पण तरीही मी तुमचाच आहे, या खात्याचा एक भाग आहे हे आज नी उद्या तुम्हाला समजेल, मी आपणां सर्व वरिष्ठांना नमस्कार करतो !'' नानु.

आणि त्यानंतर अर्धा तास अस्खल्लीत इंग्रजीत नानुने या बोर्डाचे महत्व, तुमची आणि माझीही जबाबदारी या सर्वांचा आलेख मांडला...

आपल्या खात्यात 'भ्रष्टाचार' खालपासून वर पर्यंत बोकाळला आहे. मी यातल्या सगळ्या क्लुक्त्या जाणून आहे तेव्हा हे आता थांबले पाहिजे...

कुरुविल्लाकडे पाहून ; तुम्ही स्वत: स्वच्छ हाताचे आहात हे मी जाणून आहे. तुम्ही आपल्या सहिने या सर्व मेंबर्सना आणि सगळ्या चिफ कमिशनर ना पत्र पाठवा कि आजवर जे झाले ते झाले पण यापुढे हे चालणार नाही. ज्या चिफ कमिशनरच्या अंडर असा प्रकार घडेल त्या ऑफिसच्या छोट्या, मोठ्या ऑफिसर कडून त्या चिफ कमिशनरच्या अंडर काम करणारे घरी जातील. हे ध्यानात ठेवा. मी आजच सी.बी.आय.च्या डायरेक्टरना तसे पत्र लिहीले आहे. त्यांचे पुरे नेटवर्क आपल्यावर नजर ठेवणार आहे. हे ध्यानात ठेवा आणि आपणही तशा सूचना सर्व चिफ कमिशनरना देण्यात यावी, मला सहा महिन्यात याचा अहवाल हवा आहे. शिवाय भ्रष्ट ऑफिसरची यादी. हे काम तातडीने आणि जबाबदारीने करावे अशी मी आपणास सूचना देत आहे.

टॅक्स भरणारा मोठा असो वा सामान्य असो त्याच्या मेहनतीवर आपण आहोत हे तुम्ही विसरू नका. त्याना सन्मानान वागवा. कोणालाही फेवर करू नका. ऑडीट आणि अकाऊंट डिपार्टमेंटच्या डायरेक्टरनी आज सकाळी

सगळ्या सूचना दिल्या आहेत.

इमानदार आणि योग्य अधिकाऱ्यांची निवड मला करून द्या. त्यांचा यथोचीत सत्कार करण्यात येईल असे नामचीन अधिकारी हीच आपल्या खात्याची ओळख आहे तेव्हा त्या इभ्रतीला जपा. आपले खाते हे भ्रष्ट लोकांचे आहे. कोणीही आपल्याला विकत घेऊ शकतो ही प्रतिमा बदला. ''आपल्या जरुरी भागवायला आपले खाते सक्षम आहे''.नानु.

चर्चा संपली व बाहेर कुजबुज सुरु झाली सगळ्या मेंबरर्सची. उल्कानेही ऐकली म्हणजे सरानी सगळ्यांची खरडपट्टी काढली असणार यात शंका नाही. आणि दुसऱ्या दिवशी तसा रिपोर्ट नानुने पंतप्रधानाना, अर्थमंत्र्यांना दिला. दोघेही खूश झाले. योग्य माणसाची निवड आपण योग्य कामासाठी केली याचे समाधान त्यांनाही झाले.

परत येताना उल्काने नानुला चावी दिली...

''सर ! काय वाटले या इतर लोकांना भेटून ?'' उल्का.

''नंबर एकचे भ्रष्ट लोक आहेत. म्हणून खात्यापर्यंत ही किड पोहोचली आहे. याला आळा घालण्यासाठी काही उपाय योजना केल्या आहेत. तसे काही महत्वाचे पत्र आल्यास त्या दिवशीच त्यावर उत्तर लिहीले जाईल. मग कितीही वाजोत !'' नानु.

उल्काला वाटले हा माणूस हुशार तर आहेच, पण इमानदार, स्वच्छ हाताचा आहे! तेव्हा पासून तो तिला अधिकच आवडू लागला. पण अजून त्याच्याबद्दल काहीच कळत नव्हते. विचारावे कसे हेही कळत नव्हते.

तेथून ती दोघे बंगल्यावर आले.

''कॉफी घेणार ना ?'' उल्का.

''हो ! खूप थकलोय आज ! तेव्हा कॉफी आणि बिस्कीट हवीत ! तसे खानसाम्याला सांग.''

''नाही सर मी स्वतःच बनवते !'' उल्का.

''ओके गुड !'' नानु.

कॉफी पीता पीता गप्पाना उत आला . आता त्या दोघांमधला परकेपणाचा पडदा दूर झाला होता. ती खूप हुशार आणि दुरदर्शी आहे याची पक्की खात्री गेल्या आठवड्या भराच्या त्यांच्या ऑफीस मधील सहवासातून नानुने जाणले होते.

''सर ! तुम्ही तुमच्या पूर्वायुष्याबद्दल काहीच सांगीतले नाही !'' उल्का.

''आणि तुम्ही तरी कोठे ?'' नानु.

''जाऊ दे ! जुन्या गोष्टी उगाळण्यात काही अर्थ नसतो. त्यातून काही साध्या होत नाही. प्रत्येकाचे कर्मच त्या व्यक्तीला पुढे नेत असते. माझा कर्मावर विश्वास आहे. सद्सद् आणि शुध्द विचारावर आहे. तसाच खात्यावर आहे. आणि तेच मला इथ पर्यंत घेऊन आले आहे. पूर्वायुष्यातल्या गोष्टी आठवून माणूस कधीकधी दु:खी होतो म्हणून मागे गेलेले पान पुन्हा वाचायचे नसते. यावर मी ठाम आहे. तेव्हा सांगून तरी उपयोग काय? जीवनात मी संघर्षाला अधिक महत्व दिले. प्रचंड कष्ट केले आणि जे मिळाले ती माझी कमाई होती. आणि जो मार्ग मिळाला तोच माझ्या यशाचा मार्ग ठरला. आणि त्याच मार्गाने मी पुढे जात आहे. मी माझा भूतकाळ विसरायचे ठरविले आहे ''! नानु.

''तुम्ही म्हणता त्यात तथ्य आहे !'' उल्का.

''म्हणून म्हणतो विसरून जायचा भूतकाळ आणि वर्तमान स्वीकारायचे. आणि भविष्य उज्वल व्हावे यासाठी काम करीत रहायचे. संघर्ष हाच यशाचा मार्ग आहे. आणि ते यश पचवीता यायला हवे. नाहीतर अहंकार निर्माण होतो आणि माणसातला माणूस संपून जातो !'' नानु.

थोडा वेळ उल्का कोठे हरवली हे तिला ही समजले नाही. ती तिच्या मनात ज्याचा विचार करीत होती ते खरेही असेल. आणि नसेलही. तिची अवस्था द्विधा झाली होती पण नानुचे विचार मात्र तिला शतप्रतिशत पटले होते. हे मात्र खरे.

आणि नानुही तसाच विचार करीत होता.

''आता मी निघते !'' .

''ओके ! गाडी घेऊन जा आणि परत पाठवा !

ती निघाली पण जाताना नानुच्या उदात्त विचारांची शिदोरी बरोबरच घेऊन.

पुढच्या आठवड्यात लोकसभा अधिवेशन संपणार होते. म्हणून आपण एकतर मुंबईला जाऊन वडिलाना घेऊन यावे. कारण ते तेथे एकटेच आहेत. आणि गेल्याच महिन्यात त्यानी निवृत्ती घेतली आहे. तेथून आपण गावाला जावे आणि आईलाही आणावे. आणि संपूर्ण कुटुंब दिल्लीतच रहावे. शिवाय मुंबईहून त्याच्या मित्रांचे ऑफिस मधून फोन येत होते. त्यानाही भेटता येईल कालच सकाळी मुंबईचा चिफ कमिशनरचा फोन आला की आपण मुंबईला भेट द्यावी. खरेतर ते त्यांचे ऑफिस होते. तेव्हा त्याने चिफ कमिशनर भुजबळ यांना पुढच्या

आठवड्यात येतो असे कळवले.

तो दिल्लीला आल्यावर दोन महिने होऊन गेले होते. मुंबईच्या कस्टम आणि सेंट्रल एक्सिसच्या कमिशनरांचेही निमंत्रण आले होते. गेल्या दोन महिन्यातल्या सगळ्या गोष्टी वर्तमान पत्रानी, सगळ्या चॅनलनी प्रसिद्धी देऊन नानु देसाई या व्यक्तिमत्वाच्या मोठेपणाची उंची पूर्वीच वाढविली होती. एका आठवड्यात सगळी कामे कशी आटोपायची याचा विचार त्याने उल्का बरोबर बसून केला.

''सर ! तुमची मुंबईची टूर मी ऑफीशियल करून घेते, म्हणजे मलाही तेथे येता येईल. माझे आई वडील मुंबईला आहेत त्यानाही भेटता येईल. मी आज इन्कम टॅक्सच्या चिफ कमिशनर बरोबर बोलले. तसेच एक्साईज आणि कस्टम डिपार्टमेंटमध्येही फोन करून तुमच्या भेटीचा कार्यक्रम ठरवला आहे. तुम्ही रेस्ट हाऊसवर रहायचे आहे. त्याचेही बुकींग केले आहे. तुम्हाला महाराष्ट्राचे अर्थमंत्री, मुख्यमंत्री भेटू इच्छीतात. त्यांचीही वेळ घेतली आहे. ही भेट वानखेडेच्या बोर्ड रुममध्ये आहे. मी सगळा कार्यक्रम तुम्हाला देईन!''... उल्का, म्हणत तिने तो त्याच्या जवळ दिला.

नानुने तिच्या बुद्धीमत्तेची, हजरजबाबी पणाची आणि कार्यक्षमतेची क्षमता जाणली होती. आणि म्हणून ती त्याला अधिकच आवडू लागली होती.

''तु मुंबईला कोणत्या ठिकाणी रहायचीस, जेथे तुझे आई वडील आहेत ?'' नानु.

''सहकार नगरात! वडाळ्याला....'' ती

''सी ब्लॉक, रुम नं.३! '' नानु.

''तुम्हाला कसे माहिती?''उल्का.

''उल्का ! मी तुला ओळखले आहे ! तु माझ्याच शाळेत होतीस १९९० च्या बॅचला!'' नानु

''हो ! खरे आहे !''

येवढे बोलून तिने आपले डोळे झाकून घेतले. आणि तिच्या डोळ्यात अश्रू तरळले. बराच वेळ ती रडत होती. तिचे मन भरून आले होते. आणि अनेक प्रश्न तिला पडले होते. ज्याने आपल्याला प्रेम पत्र पाठवले ते हेच आणि त्यानंतर घरात झालेला राडा. तिला आठवला. आणि वडीलांचे बोल....

''आता तो तुझ्या मार्गातून दूर होईल, असे त्याच्या वडिलांनी कबूल केले आहे... हे वाक्य तिला आठवले.

कोणीतरी आपल्यावर जीवापाड प्रेम करतो आहे, ही भावनाच तिला सुखावली आणि ते नावच तिने आपल्या हृदयावर कोरले ते कायम. तो केव्हातरी जरुर भेटेल या आशेवर तिने लग्नही केले नाही. ती स्वामी समर्थांना नेहमी प्रार्थना करी ती याचसाठी आणि आज सगळे पत्ते खुले झाले होते.

''तुम्हाला सारे आठवतेय ?'' उल्का.

''हो ! तुझे वडील म्हणाले होते. तुमचा मुलगा माझे हृदय तोडायला निघाला आहे त्याला थांबवा!'' नानु

नानुही आता गडबडून गेला होता. तीच ती जिच्यावर आपण जीवापाड प्रेम करीत आहोत, ही अशी भेट होणे, हे सारे स्वप्नवात आहे. विधात्याच्या मनात काय आहे कोण जाणे ?

शनिवारी सकाळच्या विमानाने ती दोघेही मुंबईला आली. इनकम टॅक्स डिपार्टमेंटची गाडी एअरपोर्टवर आली होती. आणि ताजमहल हॉटेलात त्यांच्यासाठी दोन सुटही बुक झाले होते. ही नानु देसाई यांची मुंबई येथे कामानिमित्त होती. त्याच दिवशी नानु आपल्या वडीलाना भेटला. ते नायगावच्या पोलीस कॉटरमध्ये रहात होते. तेथे जाऊन तो त्याना भेटला. व त्याना आईला आणण्यासाठी गावाला पाठविले व तो परतताना उल्काला तिच्या आई-वडीलाकडे सोडून पुन्हा ताजमहलध्ये गेला. उल्का मात्र तिच्या वडीलांकडेच थांबली.

रविवारी नानुला तसे काही काम नव्हते. मुंबईतले त्याचे मित्र, ऑफिसमधील मित्र यांच्यासाठी दुपारी लंचची सोय त्याने केली होती. उल्काला आणायला गाडी पाठवली . ती साडे बारा वाजता ताजमहलमध्ये आपल्या आई वडीलांबरोबर आली. आणि नानुच्या लंच पार्टीत सामील झाले. आपल्या आई वडीलांना तिने नानु देसाई कोण याची जराही कल्पना दिली नाही. संध्याकाळी तिच गाडी त्यांना सोडायला गेली.

दुसरा दिवस सोमवार सकाळी अकरा वाजता इन्कम टॅक्स डिपार्टमेंटमध्ये नानु सर्व कमिशनरांना भेटणार होता. तो ऑफिसमधे येताच त्याचे जंगी स्वागत करण्यात आले. अडीच महिन्यापूर्वी तो ज्या खात्यातील कमीशनरच्या अंडर काम करीत होता ते यु.क्रिशनन मुर्ती याने नानुला त्या मिटींगमधे पाहीले.....

''अहो ! मि. देसाई तुम्ही ?

''यस सर. मीच ''! देसाई

''अभिनंदन ! मला माहिती होते, तुमची योग्यता या ऑफिसमध्ये नाही. अभिनंदन ! यु.क्रिशनन मुर्ती.

कॉन्फरन्स हॉलमध्ये नानुचे जंगी स्वागत झाले. सेंटर बोर्ड ऑफ डायरेक्टर टॅक्सेसच्या चेअरमनती पाठविलेली पत्रे माझ्याच सांगण्यावरुन पाठविले हे आता स्पष्ट झाले. हे जरी आपल्याकडे एक सामान्य इन्स्पेक्टर होते तरी सर्वजण त्याच्यापासून अंतर ठेऊन आदराने वागत होते.

त्याचेळी डायसवर मुंबईचे चिफ कमिशनर भानुशाली होते. त्यानी देसाई यांची ओळख करुन दिली व त्यानंतर नानुने...

''मी तुमच्याच डिपार्टमेंटचा आहे पण मी तुमच्या डिपार्टमेंटमधे जे पाहिले त्याने विटलो होतो. कृपया त्या पत्राची उत्तम अमंलबजावणी करा.

या वर्षीच्या बजेटमधे करासंबंधी मी जी सूचना केली आहे ती भारत सरकारने मान्य केली आहे. आपणही मला चांगल्या सूचना करा त्याचे स्वागत होईल.

येवढे सांगून त्याने त्यांची रजा घेताना ''तुमच्या काही अडचणी असतील तर मला लिहा. पण ती पत्रे थ्रू प्रॉपर चॅनलने यायला हवीत. येवढे मात्र ध्यानात ठेवा. तुमच्या सगळ्या अडचणींचे निराकरण करीन. कारण शेवटी तुम्ही या देशाच्या अर्थकरणाचे आधारस्तंभ अहात. तेव्हा प्रत्येकाने आपले काम देशसेवा या भूमिकेने करा. बस् !'' नानु.

निघताना नानु ज्या ऑफिसमध्ये काम करीत होता त्या ऑफिसला आणि आपल्या कलीगना भेटायला विसरला नाही. तेव्हा सोबत चिफ कमिशनर होते. सर्वांना आनंद झाला.

आणि त्याने सेंट्रल एक्साइज व नंतर कस्टम ऑफीसच्या सभा केल्या व मग ताजमहलला आला. सोबत उल्का होतीच.

संध्याकाळी मुंबईच्या चिफ कमिशनर नी डिनरची सोय केली होती. सगळे चिफ कमिशनर या डिनरला हजर होते. एक साधा इन्स्पेक्टरला हा सन्मान म्हणजे आश्चर्यच होता. ही खरोखर **'गरूड झेपच'** म्हणायला हवी. येथे त्याची हुशारी कोणाला समजली. पण ज्या पद्धतीने देसाई येथे काम करीत त्यावरुन फक्त दास नावाच्या चिफ कमिशनरनी ओळखली होती. ते बोर्डामध्ये आता मेम्बर म्हणून काम करीत होते. स्वच्छ हाताचा माणूस म्हणून मात्र पुर्ण डिपार्टमेंटमधे देसाई ज्ञात होता. त्याची वागण्याची, बोलण्याची पद्दत अगदी वेगळीच होती. वयाच्या

३५ वर्षाच्या अटीमुळे तो आय.ए.स./आय.पी.एस./आय.आर.एस. होऊ शकला नाही येवढे मात्र सर्व जाणत होते.

त्या डिनरला उल्काही हजर होती. नानुने सगळ्या चिफ कमिशरनना तिची ओळख करून दिली ती आय.ए.एस. आहे आणि माझी पी.ए. आहे!

त्यानंतर पेपरमध्ये बातमी आली. चॅनलवरही न्यूज आली. खूप मोठी प्रसिद्धी प्रसार माध्यमानी या नानु देसाई यांच्या व्हिझीटला दिली... आणि.

दुसऱ्या दिवशी एच.डी.एफ.सी.चे चेअरमन, सारस्वत बँकचे चेअरमन, यानी नानुची भेट घेतली. व बँकींग क्षेत्रासंबंधी, लोन, वितरण या बाबतही त्याच्या जवळ चर्चा केली व बजेटची तंतोतंत अमंलबजावनी होईल याची ग्वाही दिली.

संध्याकाळी मुकेश अंबानी यांची भेट होणार होती सहा वाजता. ते वेळेवर आले तेव्हा त्यांच्या जवळच्या चर्चेतून त्यांच्या वडीलांशी झालेल्या भेटीचा वृत्तांत नानु याने सांगितला. रिलायन्स इंडस्ट्री वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती करते आहे ही देशाला अभिमानाची गोष्ट आहे हे नानुने त्याना सांगीतले. सरकार सदैव चांगल्या लोकांच्या मागे आहे. हे ही त्यानी त्याना विशद केले.

शुक्रवारी सकाळची विमान बुक झाली होती. त्यामधे नानु, उल्का व नानुचे आई वडील यांचा समावेश होता. नानुच्या आई वडीलांचा आनंद गगनात मावत नव्हता.

आपल्या मुलाची ही **'गरूड झेप'** वडीलांना अपेक्षीत नव्हती, पण तो हिम्मत बाज आहे. सामान्य मुलासारखा कमकुवत नाही. कष्ट करण्याची तयारी आहे. आणि आपल्या तत्वाशी इमानदार आहे हे त्याना माहीत होते. त्याच्या या आश्चर्यजनक बदलामुळे ते तर भाराऊन गेले होते. आणि त्यानी अभिमानाने आपली पाठ थोपटून घेतली.

नानुने त्यांच्यासाठी वेगळ्या गाडीची व्यवस्था केली होती. व उल्कासाठीही. ती सकाळीच बंगल्यावर हजर होत असे. तीचा स्वभाव नानुच्या आई वडीलांना आवडला आणि तीलाही नानुच्या आई वडीलांचा. जेव्हा जेव्हा ती बंगल्यावर येई. वातावरण फारच उत्साही असे. नानुची आई उल्का येणार म्हणून घावणे व इतर कोकणातले पदार्थ तिच्यासाठी करीत असत. शिवाय नानुच्या डब्याबरोबर उल्कालाही वेगळा डबा देत.

पावसाळी अधीवेशन लोकसभेचे व राज्य सभेचे सुरू झाले त्या मधे यंदाच्या

बजेटवर विक्रमी चर्चा झाली. सरकारने नव्या मार्गाचा केलेला अवलंब व त्याची अंमलबजावणी हे ही एक दिव्य होते. त्याच्या यशस्वीतेवर नानुच्या भवितव्याची सारी मदार होती. सहा महिन्यात जीडीपी पाचवरुन आठवर गेला. सगळ्याच क्षेत्रात उत्तम प्रगती दिसू लागली. हा एक चमत्कार होता. उल्कातर खूश होती. नानुचे अभिनंदन सर्वच क्षेत्रातून होत होते. काळ पुढे पुढे जात होता. पण त्या दोघांमघली कोंडी मात्र अजून फूटली नव्हती.

नानु देसाई यानी 'भारतीय अर्थव्यवस्था व आवाहने' हे पूस्तक लिहीले. त्याचे प्रकाशन स्वत: पंतप्रधानांनी केली व त्या पुस्तकाच्या पाच हजार प्रती हाहा म्हणता खपल्या. त्याना प्रचंड मागणी पाहून प्रकाशनाने त्याच्या दुसरी व नंतर तिसरी आवृत्ती काढली.

जुलैमधे 'पंतप्रधानांचा' यु. एस. दौरा ठरला नानुला त्यांनी यु.एस.ला भारतीय अर्थशास्त्राचे विशेष प्रतिनिधी म्हणून न्यायचे ठरवले. नानुचे दुसरे पुस्तक हे अत्यंत अभ्यासपूर्ण. हे पुस्तक जागतिक अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने वरदान ठरले, त्याने आयात निर्यात पद्धतीत अनेक अमुलाग्र बदल सुचवले ते आशियायी व युरोपीयन आणि अमेरिकेने स्वीकारले. त्यातून देशोदेशांमधे संवादाची भूमिका विशद झाली व नानुचे नांव जागतिक स्थरावर गाजत राहिले.

अमेरिका,लंडनच्या अनेक विद्यापीठांनी देसाई याना निमंत्रण देऊन त्यांचा सन्मान केला. त्यांच्या नव्या संशोधनाला जागतिक व्यापारी उद्दीमला, नवी दिशा मिळावी म्हणून हा सन्मान अर्थात भारताचाही होता. नानु आता नानु देसाई झाले होते.

अनेक वेळा लंडन. अमेरिकेतील विद्यापीठांनी त्याला भाषणाला बोलावीत. त्याला एकट्याला जावे लागे. तो अस्वस्थ होई. आता नानुला सोबत उल्का असावी असे राहून राहून वाटत होते. तिच्यावर आपले जीवापाड प्रेम आहे हे तो जाणत होता. दिल्लीला आल्यावर तिच्या सहवासात एक वेगळाच आनंद त्याच्या अनुभवाला आला. पण ही कोंडी कशी फूटावी ? ती ही त्याच्यावर खूश होती हे नानु जाणून होता. पण घंटा बांधावी कोणी ?

एकदा नानुने हा विषय त्याच्या आई बाबांजवळ काढला. त्यानाही ती पसंत होती. नानुने बाबांना वेगळे घेऊन शाळेतल्या प्रेम प्रकरणाची आठवण करून दिली.

''ती हीच मुलगी ! बाबा !'' नानु

''मग काम झालेच समज !'' बाबा.

त्यानंतर त्याच्या आईने पुढे या प्रकरणात पुढाकार घेतला. आणि उल्काच्या आई वडीलाना मुंबईला बोलव असे ते उल्काला बोलले. हे काय नवे चालले आहे? याचा अंदाज तिला आला नाही पण काहीतरी खास घडते आहे येवढे खरे हे ती नानुच्या आईच्या वागण्यावरून ओळखून होती.

उल्काचे आई वडील त्यांच्याकडे आले. नानुने त्या चौघांची एक काश्मीर टूर अरेंज केली. त्यातून त्यांची एकमेकांशी चांगली मैत्री झाली. फोनवर फोन येत भेटी होत. मग हळूच नानच्या आईने उल्काच्या आईला लग्नाबद्दल विचारले. त्यांच्या शाळेतल्या प्रेमप्रकरणाची आठवण करून दिली. ही साथ परमात्म्याची पूर्व नियोजीत योजना असावी असे उल्काच्या वडीलांना वाटले आणि त्यानी एक दिवस तिच्या जवळ लग्नाचा विषय काढला.

''उल्का ! अग या नोकरीच्या रगाड्यात तू तुझ्या लग्नाचे विसरलीस काय?

''नाही पप्पा! आता पसतीसची झाली. माझे आता त्या विषयावरून मन उडाले आहे !'' उल्का.

''पण जर योग्य स्थळ असेल तर ?''

''पाहुया ! उल्का कोण आहे तो मुलगा ?''

''तुझे देसाई साहेब '' वडील.

आणि हे ऐकताच उल्का लाजली, बेडरुम मध्ये पळाली. आई बाबांनाही हा तिचा होकारच वाटला. सकाळी उल्का जेव्हा नानुकडे आली. वेगळ्याच मुडमधे होती.. घरी येताच तिने नानुच्या आई वडीलांना नमस्कार केला... त्यांनाही त्या गोष्टीचे अप्रुप वाटले.

आज एकाच गाडीने ती दोघे ऑफिसला गेले. येताना प्रत्येकाने आपला लंच आणला होता. आज नानुच्या कॅबीनमध्ये ती सकाळ पासून गेलीच नाही. मग नानुनेच फोन करुन तीला बोलावले.

''लंच घेणार कां! आपण दोघांनी बरोबर घेतला तर चालेल कां ?''

''सध्या नको !''

नानु समजला काय समजायचे ते आणि संध्याकाळी घरी येताना एकाच गाडीने न येता दोघे आपआपल्या गाडीने घरी गेली.

उल्का कमालीची अबोल झाली होती काल पासून. मग आईनेच ही कोंडी फोडली.

''तु तयार आहेस का लग्नाला. तसे प्रपोझल देसाईच्या वडीलानी दिले आहे !'' वडील..

''हो !'' उल्का

आणि ती आईच्या गळ्यात पडली.

लग्नाचे ठरले अत्यंत साध्या पद्धतीने. प्रथम रजिस्टर्ड व मग वैदिक पध्दतीने. त्यानंतर एक रिसेप्शन... बस. नो गाजावाजा.

उल्काला हे सारे मिऱ्याकल वाटत होते आणि नानुलाही. आपण गेली १० वर्षे लग्नाशिवाय राहीलो ते तिच्यासाठीच कां ? आज खूप आनंदात तो होता.

उल्काच तिच्याच ओढीने त्याने ही गरूड झेप घेतली होती येवढे मात्र खरे. अनपेक्षीत पणे नव्हे कष्टपूर्वक.

दोन जीव प्रेमात गुंतून एकत्र आले. आणि शुभमंगल पार पडले.

आणि पंतप्रधानाच्या यु.एस.दौऱ्यावर ती दोघे बरोबर गेली ... हनीमुनला!!!

०-०-०-०

# अडथळ्याची शर्यत

मे महिना सुरु झाला आणि महिनाभर अगोदरच पाऊस सुरू झाला. कोकणात मृग नक्षत्रात राखण देतात. ती तारीख जूनच्या पहिल्या आठवड्यात यायची, पण पाऊस महिनाभर अगोदर सुरु झाला, आणि गेल्या वर्षा सारखाच मे च्या पहिल्या आठवड्यात आला नी ठाण मांडून बसला. सगळेच शेतकरी चिंतेत. आज जाईल, उद्या जाईल, पण तो काही नाव घेईना आणि मुंबईकर त्यांची मुले अडकली कोकणातच. वाड्यात पेंडे भरणे, वाड्याच्या वलाई, फाटी तुकडा खोपीत भरणे, सारेच अडकले, पावसाच्या न जाण्याने. ऑगस्टचा पाऊस, विजांच्या कडकडाटाने लखलखत्या आकाशात अवतरला. खरेतर हा पाऊस असतो ऊन, पावसासारखा, उघड झाप करणारा.

जरा हवा बदल म्हणून कोकणातले मुंबईकर कोकणात येतात. रायवळ, हापूस, आंबे, फणस, करवंदे आणि चिकुचा आस्वाद घ्यायला. त्यात कोरोनाचा शिरकाव. लॉकडाऊनची घोषणा, प्रथम आठवडाभराचा हा लॉकडाऊन, महिना झाला तरी कमी होईना भीतीचे सावट. सगळयांच्या मनावर दडपणासारखे पसरले. शाळा कॉलेज बंद. सैरभैर झाला माणूस. एस.टी., ट्रेन, काय तर प्रायव्हेट गाड्याही बंद त्यात अनेक बंधने, कॉरंटाईनची भीती, साऱ्याने माणसामाणसापासून माणूस दूर जात होता.

पण यात पावसाची सतत रीपरीप, मग अफवांचे प्रचंड पीक मनामनावर आच्छादलेले. गावात त्याचे सावट अधिक जाणवले नाही. पण जाणवले त्याना, जे मुंबईकर गावात आले, ग्रामपंचायतीने त्यानी १४ दिवसांचे कॉरंटाईन केले. आणि गावात येण्याचा सगळा आनंदच मावळला चाकरमान्यांचा.

त्यात अरूणची फायनल इंजिनीअरींगची परीक्षा झाली आणि तोही निवांतपणासाठी गावात आला. पण बांधला गेला. कॉरंटाईनच्या दाव्याला बिचारा पार पिकला हो घराच्या चार भिंतीत. त्याच्या कॅम्पसमध्ये झालेल्या एका लंडनच्या व्हिप्रो कंपनीने त्याला जॉब ऑफर केला आणि ३० जूनला त्याला लंडनमध्ये येण्याचे पत्र हातात पडले. त्याला प्रचंड तणावग्रस्त वातावरणातून जावे लागले. चिपळूण, त्याचे गाव, गावात आला खरा पण, ना फिरलो कोठेही, ना भटकलो आंबराईत, ना वशिष्ठीवर गेलो मासे मारायला. चार वर्षानी तो गावात आला होता. पण कॉरंटाईनचा १४ दिवसाचा काळ संपला

आणि एखादा बैल उधळावा ना दावे सोडल्यावर, तसा उरलेल्या इथल्या ४ दिवसात सगळी हौस मौज भागवायची होती, त्यात पावसाचा जोर वाढलेला. थांबायचे नांव नाही. तरीही अरूणने आपल्या कार्यक्रमाचा आराखडा ठरवला.

प्रथम चिपळूणचे वैभव 'सवतीचा कडा' जो या अकाली पावसात प्रचंड वेगाने वहात होता. डोळे दिपवित होता. हिम्मत होत नव्हती वहात्या झोताखाली कोणाला जायची. पण अरूणने विचार केला आता नाही तर पुढची २/३ वर्षे येणे होणार नाही यू.के.तून, मग तो सुसाट वेगाने घुसला त्या झोताखाली. ममसोक्त न्हाला. अगदी दमे पर्यंत, आणि मग उठून बाहेर येत होता. पाऊस कमी झाला होता. पडणाऱ्या पाण्याचे प्रमाणही कमी झाले होते. म्हणून तीन मुलींचा घोळका त्या पाण्याखाली यायला निघाला. तरूण मुली होत्या त्या. पायाखाली प्रचंड पाणी वाट कुठली हे दिसत नव्हते. आणि अरूणच्या पाया खालचा दगड निसटला आणि त्याचा तोल गेला. त्याने आधारासाठी त्यातला एकीचा हात धरला आणि सावरत तो उठला, उभा राहिला, आणि खाडकन आवाज काढला त्या मुलीने अरूणच्या कानाखाली. क्षणभर भिरभिरला तो. तेवढ्यात त्या पाण्याच्या प्रवाहाखाली निघून गेल्या....

अरूण त्या वाहत्या पाण्यातून बाहेर आला. पावसाचा जोर थोडा कमी झाला होता, त्याच्या बरोबर त्याचा एक गावातला मित्र 'संज्या' त्याचे कपडे सांभाळत होता. अरूणने अंग पुसले व कपडे बदलून रस्त्या पलीकडच्या झाडाखाली उभे राहिले, त्याला ती मुलगी कोण? हे पहायचे होते १/२ तास झाला तरी त्या आल्या नाहीत. अरूणला काळोख होण्या आधी घरी निघायचे होते. आणि येवढ्यात ते त्रिकुट पाण्याच्या झोताखालून बाहेर आले. त्या तिघी रस्त्यावर आल्या तर त्यानी पाहिले ज्याला थप्पड मारली तो मुलगा समोर उभा. त्या थोड्या घाबरल्या असणार, कावऱ्या बावऱ्या दिसत होत्या.

अरूणकडे पुनः न बघताच रस्त्याच्या पलीकडच्या बाजूने त्या चालू लागल्या. अरूणने आपली स्कुटर चालू केली आणि त्यांच्या पाठोपाठ निघाला. त्या थांबल्या.

"तू आमचा पाठलाग करतोस ?"

"नाही तुम्हाला एकदा पहायचे आहे, डोळे भरून"! अरूण.

"कधी पाहिली नव्हती मुलगी ?"

"पाहिल्यात खूप! पण तुझ्यासारख्या नाहीत म्हणून एकदा निरखून पहावे

''! अरूण .

''मग घे बघून ! आणि सोड आमचा रस्ता !'' रमा.

आणि ती अरूणच्या पुढ्यात येऊन त्याच्याकडे पहात राहिली.

''नाव सांगू !''

''सांग !''

''मी डॉ. भडकमकरांची मुलगी ! रमा माझे नांव ! आणि पुन्हा असा भेटू नकोस! जा !'' रमा.

तिच्या त्या रुपवान चेहऱ्याला पाहून अरूण क्षणभर भांबावलाच. पाणीदार डोळे, लांब केस, गोरा रंग, बांधेसुद शरीर यष्टी... क्षणभर आपण काय बोलावे हेच त्याला समजेना.

''बाय द वे ! तुझे नांव ?''

''अरूण बापट ! डॉ. बापट यांचा मुलगा. बापट आळीत राहतो आम्ही'' !'' अरूण

''ओके ! निघा ! पुनः भेटू नका!'' रमा.

अरूण मात्र तेथेच उभा होता. आणि त्या तिघीही तरातरा निघून गेल्या. इतके सुंदर रूप, स्वभावातला कडकपणा, एका मुलीचा हजर जबाबीपणा पाहून तोच शरमला. तिने मारल्याचे दुःख नव्हते. पण इतकी सुंदर मुलगी अशी वागू शकते? याचाच विचार तो करीत होता, मग केव्हातरी त्याचे पाय घराकडे वळले. आठवीत आणि साठवीत तिला डोळ्याच्या पापण्याआड. ती पुनः भेटावी असे क्षणभर वाटले त्याला... पण क्षणभरच आणि नकळत त्याचा हात गालाकडे गेला. पाच बोटे छान नक्षी काढल्यासारखी त्याच्या हाताला जाणवली.

पुनः उद्या आपण या धबधब्या खाली यावे, ती भेटेल आपल्याला म्हणून पण तो मोह त्याने टाळला. पण ते त्रिकुट मात्र धबधब्यावर येऊन गेले. अरूणही राजबिंडा तरुण, गोरा पान होता, ती ही त्याचा विचार करीत होती, आपण खूप वाईट वागलो. त्या मुलाजवळ. म्हणून स्वत:ला दोष देत होती. आपण त्याची माफी मागावी असे तिला राहून राहून वाटत होते. म्हणून तिचे पाय आज धबधब्याकडे वळले होते. ती आता खूपच भाऊक झाली होती. जेव्हा अरूण दिसला नाही.

त्या घटनेनंतर दोनच दिवसांनी अरूण मुंबईला आला आणि पूर्ण तयारी

करून लंडनला पोहचला, सोबत घेऊन रमाने गालावर उमटवलेल्या थप्पडाचे पडसाद. ते हृदयावर खोलवर उमटले होते. का कोण जाणे, पण त्याचे तरूण पण आता लंडनच्या किनाऱ्यावर सारखा रमाचाच विचार करीत होते. हा एक नाजूकसा अपघात होता, पण दोघानाही झाल्या होत्या खोल जखमा.

रमाची काही वेगळी अवस्था नव्हती. तशीच जशी अरुणची झाली होती. रमा १२ वी पास झाली ९२% मार्क मिळवून शिवाय मेडिकलची परीक्षा ही चांगल्या मार्कांने पास झाली, आता मेडिकलला ॲडमिशन मिळाले की तिचेही तारु किनाऱ्याला लागणार होते. तरीही तिच्या मनातल्या अस्वस्थतेने ती अगदी बेजार झाली होती. अरुणला आपण भेटावे, त्याच्याशी बोलावे व एकदाचे सॉरी म्हणावे आणि या प्रकरणाला वेगळे वळण लागावे असे सारखे वाटे तिला.

खरेतर दोघेही एकाच गावातले डॉ.भडकमकर हे नावाजलेले सर्जन आणि डॉ. बापट हे न्युरो सर्जन. दोघे एकाच व्यवसायात एकमेकांना ओळखणारे कौटुंबिक संबंध. पण मुलांचा एकमेकांशी संपर्क नव्हता. अरुणला इंजिनियर व्हायचे होते तर रमाला डॉक्टर. दोघेही डी.बी.टी. महाविद्यालयातले विद्यार्थी. वयातले अंतर पाच-सहा वर्षाचे म्हणून ओळख पाळख नव्हती. एक दिवस रमानेच बाबांजवळ विषय काढला...

''पप्पा ! डॉ. बापट तुमच्या परिचयाचे आहेत कां ?'' रमा.

''हो! आम्ही दोघेही वर्ग मित्र. मुंबईला जे.जे.मधून एम.बी.बी.एस. झालो. त्यानी, मी सर्जरीत एम.एस. केले आणि डॉ.बापटानीही एम.एस. केले प्रॅक्टीसही एकाच वेळी सुरू केली आणि तीही चिपळूणात ! हे तू सारे कां विचारतेस ?'' रमाचे वडील.

''काही नाही ! सहज!'' रमा

''नाही ! काहीतरी कारण असेलच ना ? गेल्या महिन्यात चिपळूणच्या लायन्स क्लबने त्याचा मुलगा अरूणचा सत्कार केला तो इंजिनियअरींगला पहिला आला. मुंबई युनीर्व्हसीटीत म्हणून ''! डॉ. भडकमकर.

''असं होय !''

''अग त्याला एम.एस.साठी लंडनला पाठवतायत, डॉ. बापट. पुढच्या आठवड्यात. तुझ्या आईची आणि सौ.बापटांची फार जुनी मैत्री आहे. दोघीही पुण्याच्या. लग्नही आमची एकाच वेळी झाली. ते कालच मला भेटले आणि सारी हकिकत समजली. आज तो लंडनला जाण्यापूर्वी चिपळूणला येणार आहे.

अरूणला तेथे एका कंपनीने जॉब दिला आहे. ५० लाखाचे पॅकेज त्याला दिले आहे . ऑक्सफर्ड युनिर्व्हरसिटी मध्ये त्याची एम.एस. साठी निवड झाली आहे !'' डॉ.भडकमकर.

''ओके, डॅडी!'' रमा.

गेल्या आठवड्यात अरूण आणि रमा मधल्या घटनेची माहीती रमाने दिली होती.

''आई ! मला अरुणला सॉरी म्हणायचे आहे! अरूण जाण्यापूर्वी आपल्याकडे त्या कुटुंबाला बोलवा. मला ही दरी मिटवायची आहे ! प्लीज बोलव ना!'' रमा.

''हो ! आजचा दिवस तो येथे आहे, उद्या सकाळी निघेल ! त्याच्या आईला बोलावते अरूणला घेऊन. मोठा हुशार मुलगा आहे ! तु घरीच थांब ! नाहीतर जाशील भटकायला !'' रमाची आई.

''नाही ! नाही जाणार !'' रमा.

आणि त्याच दिवशी संध्याकळी दोन्ही कुटुंबियांची भेट झाली. डॉ. भडकमकरांना व रमाच्या आईला अरुणने वाकून नमस्कार केला. येवढ्यात रमा हॉलमधे आली.

ताडकन अरूण उभा राहिला...

''मला माफ करा प्लीज, जे घडले ते विसरुन जा ! प्लीज!'' रमा.

अरूणच्या आई वडिलांना यातले काहीही माहिती नव्हते.

''ठीक! माफ केले ! पण माझा नाईलज होता. खाली खोल दरी होती म्हणून... ते घडले सॉरी! अरूण.

दोन मिनिटे मध्ये शांतता पसरली. पण मग वातावरण पूर्णपणे उसवले. मग संध्याकाळचे डीनर तेथेच झाले. निघताना त्या दोघानी एकमेकांकडे पहाण्याचे टाळले. तरीही काळजात कालवा कालव झालीच. आता कोणी प्रथम सुरुवात करावी ? पण मग रमानेच पूढाकार घेतला...

''हा माझा मोबाईल नंबर ! फोन कर ''! रमा.

'' हो ! फोन करीन !'' अरूण

तसे पाहिले तर दोघांच्या मनात आकस नव्हता. कुछ कुछ व्हायला लागले होते. पण लाजेस्तव खरे तर अरूणने ते टाळले. तो कोणा मुलीशी बोलण्याची त्याची पहिलीच वेळ होती म्हणून....

''पण घरी गेल्यावर अरूणने रमाला फोन केला. आणि तिला शुभेच्छा दिल्या तिच्या मेडिकलच्या ॲडमिशनसाठी आणि पुढील करीयरसाठी. त्याची यु.के.ला जाण्याची तारीख नक्की होत नव्हती विमानाची अडचण, भारत सरकारच्या रिस्ट्रक्शन कोरोनामुळे.

पण दोनच दिवसानी रमाच्या ॲडमिशनचा निकाल जाहीर झाला. तिला के.इ.एम.मध्ये ॲडमिशन मिळाले. मुंबईत अरूण नवा नव्हता. त्याने व्हि.जे.टी.आय.मध्ये ४ वर्षे काढली होती. पण रमा या मुंबापुरीच्या सागरात नवीन होती. तिने अरूणला फोन केला.

''अरूण ! मी उद्या मुंबईला येत आहे. दादर स्टेशनला मी उतरणार आहे. आजच ॲडमिशन घेतले पाहिजे. मी येथे नवीन आहे तेव्हा मदत करशील ना? रमा.

''हो ! मी दादर स्टेशनला येतो. आमचे घर हिंदु कॉलनीत आहे. तेथे आपण जाऊ. तू फ्रेश हो, मग कॉलेजला जाऊ!'' अरूण.

''हो ! मी गाडी आल्यावर फोन करीन !'' रमा.

सकाळी ६ वा. तुतारी एक्सप्रेस गाडी दादरला आली. अरूण १५ मिनिटे अगोदरच आला होता. तिला घेऊन तो हिंदु कॉलीनीत पहिल्या गल्लीतल्या घरी आला. घर किती नीटनेटके आहे हे पाहून रमाला ही अरूणच्या वागण्यातले अनेक पैलू समजून आले. त्याच्या वागण्यातले सौदर्य. त्याने तिच्यासाठी कॉफी आणि ब्रेड बटरची व्यवस्था केली. मग ब्रेकफास्ट घेऊन दोघेही के.इ.एम. मध्ये आले. सकाळीच ॲडमिशनचे काम झाले. कॉलेज सुरु व्हायला अजून आठवडा होता. तिला हॉस्टेलचे ॲडमिशन मिळायला आठवडा लागेल असे रेक्टरने सांगितले. तोवर तिची रहाण्याची व्यवस्था हॉटेल मध्येच हे जवळ जवळ ठरले होते. पण अरूणने त्याच्या फ्लॅटमध्येच तिने रहावे असा हट्ट धरला आणि तिलाही तो नाकारताच येईना. चवथ्या दिवशी तिला हॉस्टेल मिळाले आणि ती निघून गेली.

त्या ५/६ दिवसात खूप काही चांगली ओळख अरूणला झाली अगदी जवळून तिला पाहिले. आणि हीच आपली सखी, मैत्रीण, पत्नी या वेगवेगळ्या स्वरूपात तिची ओळख झाली. आणि जीवनभर आपली सहचारीणी व्हावी, हे त्याने आपल्या मनात कोरून ठेवले.

–०–०–०–

अरूण यू.के.ला गेला त्याच्या नोकरी शिवाय त्याचे संशोधन व अभ्यासात तो इतका रमला कि मागच्या साऱ्या गोष्टी तो विसरला. १८/१८ तास ऑफीस, कॉलेज आणि लॅब हेच त्याचे घर होते. ४ वा. सकाळी तो उठे. आणि रात्री ११/१२ पर्यंत त्याचे लिखाण चालू होते. सुरवातीला त्या दोघांची बोलणी होत, पण हळू हळू त्याला शिथीलता आली. रमाही आपल्या अभ्यासात गुंतली. हॉस्पिटल, अभ्यास त्यातही तिन्ही शिफ्टमध्ये काम करावे लागे. मग होणारे झोपेचे खोबरे, सारे करीत ती एम.बी.बी.एस. झाली. पण तिची अभ्यासाची क्रेज काही कमी होत नव्हती. त्यात एम.एस. करावे व यासाठी तिने केईएममध्येच ॲडमिशन घेतले.

अरूण यू.के.मधून त्याची एम.एस.ची परिक्षा एफ.आर.सी.एस. करून भारतात आला. आता आपण लग्न करू या यासाठी तो मुंबईला येताच रमाला भेटला. ती काहीच बोलायला तयार नव्हती.

''आताच मी एम.एस.ला ॲडमिशन घेतले आहे. अजून २।। वर्षे तरी लग्न करता येणार नाही. तु फक्त सेटल आहेस माझी परवड होईल. मला माझे करीयर लग्ना पेक्षा अधिक प्रिय आहे !'' रमा.

''ठीक ! मी थांबेन तो पर्यंत ! तू जेव्हा हो म्हणशील तो वर मी माझ्या लग्नाचा विचारापासून दूर राहिन!'' अरूण.

''तुला हवे तर लग्न कर ! मी तुला मोकळीक देते आहे ! पण राहिलास लग्नाशिवाय पूढची २।। वर्षे तर मी थांबेन तुझ्यासाठी !'' रमा.

''नाही ! मी पक्का आहे विचाराचा. मला लंडनमध्येच एक सॉफ्टवेअर कंपनी काढायची आहे तेव्हा २-२।। वर्षे यात जातीलच! चलो भेटूया !'' अरूण.

०-०-०-०

आणि तो चिपळूणला आपल्या घरी आला. चार वर्षे होऊन गेली होती. त्याचे वडील आता खूपच वयस्क झाले होते. त्यानी प्रॅक्टीसही बंद केले होते. अरूणने लवकर लग्न करावे आणि आम्हाला नातवंडे खेळायला मिळावी असे दोघांनाही वाटत होते. त्यासाठी अरूण येताच तिने लग्नासाठीचे अनेक प्रस्ताव त्याच्या समोर ठेवले. शेवटी त्याने रमाला भेटण्याचा आणि २-२।। वर्षे थांबून लग्न करण्याचे वडिलांना सांगितले. दोघेही नाराज झाले. आता अरूण २८ वर्षे पार करून गेला होता. अजून २।। वर्षे थांबणे त्याना योग्य वाटत नव्हते.

शिवाय मला पुनः यू.के.ला जायचे आहे व एक सॉफ्टवेअर कंपनी स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडल्यावर तर ते अधिकच नाराज झाले. महिनाभराने अरूणने पुनः यू. के. गाठले. अरूणच्या आई वडीलांच्या लग्नाबाबतच्या आशा मावळल्या. शिवाय आता हा पुन्हा परत येईल अशी आशा ही त्याना वाटत नव्हती. त्याच वेळी त्यानी रमाच्या आई वडिलांबरोबर या लग्नाबद्दल तोच प्रस्ताव मांडला. पण त्यांचीही इच्छा असून रमा लग्नाला तयार नाही हे ही त्यानी आई–बाबांना सांगून टाकले. आता काही काळ देखील या लग्न प्रकरणावर पडदा पडला होता.

अरूण लंडनला पोहोचताच त्याने कंपनी स्थापनेच्या प्रस्तावाला मुर्त स्वरूप देण्याचे ठरवले. तो ज्या कंपनीत काम करीत होता, त्या कंपनीने आणि भारतातल्या गोदरेज कंपनीने तिघांनी एक भव्य कंपनी उभारण्याचे ठरविले. ही कंपनी जागतिक स्तरावर पहिलीच कंपनी जी ईलेक्ट्रीकवर मोटार बनवणार होती. त्यासाठीच्या सगळ्या टेक्निकल बाबी अरुणवर पडल्या व त्या दोन्ही कंपनीने भांडवल देण्याचे कबूल केले. ह्या कंपनीत १२००० कामगारांना नोकऱ्या मिळणार होत्या. प्रकरण मार्गी लागले आणि अरुण त्यात पूरता अडकला होता. अरुण एक हुशार, हरहुन्नरी व मॅनेजमेंट मधला मुलगा एक्सपर्ट होता. १।। वर्षात प्रोडक्शन सुरु होणार होते. त्या पध्दतीने कारखान्याची उभारणी व मशिनरी सह इतर कुशल मनुष्यबळ त्याला तिथल्या गोदरेज कंपनीने पूरवले होते. खरेतर अरूण हिंदुस्थानचा आर.एस.एस.चा खरा सपोर्टर. पण अशी कंपनी येथे काढावी असे त्याला वाटले नाही. त्याला कारण इथली राजकीय डोके दुखी, उलट लंडनमध्ये सारी चक्रे वेगाने फिरली व पहिली फुले लि. कंपनी सुरू झाली, शेअर बाजारात प्रचंड मागणी झाली आणि अरुणने हुशारीने आपले भाग भांडवल वाढवून आपले वर्चस्व य कंपनीवर वाढवले. दुसऱ्याच वर्षी तो कंपनीचा चेअरमन झाला. प्रोडक्शन सुरू झाले आणि पर्यावरणाला धोका नाही म्हणून त्याच गाड्यांना प्रचंड मागणी आली. दोन वर्षानंतरची वेटींग लीस्ट लागली. त्या गाड्या सर्वोतोपरी लोकांच्या पसंतीला उतरल्या. जगात सगळ्या देशात सेल्स ॲन्ड सर्व्हिस कंपन्या सुरू झाल्या. पहिल्या तीन वर्षात खूपच नफा या कंपनीने कमावला.

अरूण हा एकमेव मुलगा होता डॉ.बापटांचा. त्याने आई वडिलाना लंडन येथे आणले. आता कंपनी सुरू झाली होती. आणि अरुणने लग्न करावे असे

त्यांना सहाजिकच वाटत होते.

डॉ. रमाही एम.डी. झाली आणि ती के.ई.एम. मध्येच प्राध्यापक म्हणून रुजू झाली. या काळात रमाचा अरूण जवळ संपर्क जवळ जवळ बंद झाला होता.

मुळात काय घडले, रमा एम. डी. झाली आणि आता एखाद्या एम.डी. मुलाबरोबरच लग्न करावे हा आई वडिलांचा सल्ला तिने मान्य केला. अरूण वेगळ्या क्षेत्रात, तिचे क्षेत्र वेगळे. तेव्हा कसे जमावे लग्नाचे मेतकुट. अरुण आता यू.के. मधून येण्याची शक्यता नाही. रमाला तिथे प्रॅक्टीस करणे वा नोकरी करणे कठीण होते. त्यासाठी तिची मानसिकता नव्हती. पण अरूणला हे कसे कळवावे ? तो आपल्यासाठी थांबला. त्यासाठी आपण त्याला वचन दिले आहे. आता प्रस्ताव नाकारणे म्हणजे अरूणच्या मनाला दु:ख देणे. काही अंशी रमाला आई वडिलांचे म्हणणे पटत होते, पण आता काय करावे ? त्यापेक्षा अरूणच्या प्रस्तावाचीच वाट पहावी असे रमाने ठरविले. त्यात तिचे प्राप्त परिस्थितीत चुकले असे म्हणता येईल कां ? नाही, पण हे त्रांगडे कसे सुटावे ?

बरे या दोघांमधले संबंध पूर्वीसारखे नव्हते. त्याना अनेक कंगोरे होते हे मात्र खरे. तुम्ही जर पहिल्या भेटी पासून विचार केलात तर कोठेही सरळ मार्ग नाही दिसत, प्रत्येकाचे व्यवसाय वेगळे, ध्येय वेगळी सारी काही सूत्रे न जुळणारी, मग हे संबंध जरी जुळले तरी टिकतील कां ? कि सुरुवातीपासून ही अडथळ्याची शर्यत होणार की काय ? अशी शंका येते आहे.

रमा मात्र द्विधा मनस्थितीत होती. To be or, not to be अशा अवस्थेत ती सापडली होती. प्रेम आणि वास्तव याचा हा झगडा होता. रमाचे अरूणवर निस्सीम प्रेम होते. दोघांना लग्न करायचे होते. आपण मेडिकलला गेलो ते चुकले तर नाही. नाही पण ते तर पूर्वीच ठरले होते. हा विषय अडचणीचा कसा ठरावा. पण आई बाबांच्या इच्छे पुढे आपण माघार घ्यावी कां ? आणि अरूणशी लग्न करावे कां ? मग पाहू पुढे काय होतेय ते. आपण आई बाबांच्या मताचे परिवर्तन करायला हवे. पण ते तर अशक्य दिसते आहे. पण प्रयत्न करून तर पाहू या. रमा सकाळच्या तुतारीने चिपळूणला आली. ती न सांगता आली याचेच आई-बाबाना आश्चर्य वाटले. नक्कीच काही तरी कारण असायला हवे. हे त्यानी ताडले.

''अग रमा ! तू न सांगता एकाएकी कशी आलीस ?

रमा काहीच बोलली नाही, तिने आपली बॅग घरात आपल्या बेडरूममध्ये

नेऊन ठेवली. रमाची आई तिच्या मागून आली पण रमाने दरवाजा लाऊन घेतला.

‘‘अग रमा ! दरवाजा उघड ! तू कां अशी तडकाफडकी आलीस. काय प्रॉब्लेम आहे का मुंबईला ! बोल !’’ आई.

पण रमाने चकार शब्दही उच्चारला नाही. तिचे वडिल काही आपतकालीन केससाठी अॅपेक्स हॉस्पिटलला गेले होते. ते ११ वा. परत आले. आईने वारंवार सांगूनही तिने दरवाजा उघडला नव्हता. ती बेडवर पडून होती. सकाळी ४ वा. उठल्यामुळे झोप मोड झाली होती. तेव्हा डोळा लागला. गाढ झोप लागली होती तिला. पुऱ्या चार तासाच्या प्रवासात ती अरूणचाच विचार करीत होती. वडिलांनीही तिला आवाज दिला, पण ती झोपेतच होती. १२ वाजता तिने दरवाजा उघडला. तर आई बाबा दरवाज्यासमोर उभे ते आत आले. तिच्या पलंगावर बसले. पण रमा बाथरुममधे फ्रेश व्हायला गेली आणि १५ मिनिटाने परत आली.

‘‘कशी आहेस ?’’ आई.

‘‘ठीक !’’ रमा.

‘‘तू एकाएकी न सांगता कशी आलीस ?’’ बाबा

‘‘तुम्ही माझ्यासाठी स्थळ शोधीत आहात हे मला समजले, आपल्या परिचयाच्या अनेक डॉक्टरांच्या मुलांची प्रपोझल आली आहेत. असे समजले. मी तुम्हाला अरुण बद्दल बोलले होते ! आम्ही लग्न करायचे ठरविले आहे ! आणि तुम्हाला माहिती असून तुम्ही स्थळांच्या शोधात कां ?’’ रमा.

‘‘बाळ ! तू काही गैरसमज करुन घेऊ नकोस ! आम्ही जे काही करीत आहोत ते तुझ्याच भल्यासाठी आहे. अरूण चांगला मुलगा आहे, हुशार आहे. पण तुझ्या आणि त्याच्या व्यवसायामुळे आम्हाला वाटते तू कोणा डॉक्टरशीच लग्न करावे, हे बरे !’’ बाबा.

‘‘पण त्याने काय फरक पडणार. मी जगाच्या पाठीवर कोठेही प्रॅक्टीस करू शकते यु.के.मध्येही ! ते माझे मी पाहून घेईन !’’ रमा.

‘‘अरे वां! येवढे प्रेम ऊतू जाते आहे कां? आमच्या बोलण्याला काडीची किम्मत नाही का?’’ बाबा.

‘‘अहो पण मी तुम्हाला या पूर्वी अनेक वेळा सांगितले होते !’’ रमा

‘‘अगं तसे नाही ! आम्ही अरूणच्या वडिलांना भेटलो पण...!’’ बाबा.

"पण काय ! त्यांनी नकार दिला कां ? की त्याच्या आई बाबानी!" रमा.

"तुमची पत्रिका जूळत नाही ! भवितव्य नाही ठीक होणार ! अनेक अडथळे येणार ! काडीचेही सुख मिळणार नाही !" बाबा.

"आमचा तुमच्या पत्रिकेवर विश्वास नाही ! रक्त गट जमला म्हणजे झाले! आणि तो जुळतो. आम्ही केव्हाच पडताळा केला आहे"! रमा

"त्याच्या आई वडिलानी त्यामुळे नकार नाही दिला पण शंका घेतली आहे! काय करावे ? त्याना समजवता आले तर पाहू ! अन्यथा आपल्याला मार्ग मोकळा आहे !" बाबा

"ठिक ! आपण उद्याच त्यांच्याकडे जाऊ ! पण मी रात्री अरूण जवळ बोलते !" रमा.

"ठिक !" बाबा.

आणि रमाचे कुटुंबीय अरूणच्या घरी गेले. कशासाठी आले आहेत याचा अंदाज अरुणच्या वडिलांना आला.

"आता काळ बदलला ! मुलाना काय तो निर्णय घेऊ दे ! असे मला वाटते !" अरूणचे वडील.

"याबाबत तुम्ही अरूणजवळ बोला आणि आम्हाला कळवा !" रमाचे वडील.

आणि ते कुटुंबीय घरी परतले. रात्री रमा अरूणजवळ बोलली. त्याने सारे काही वडिलांवर सोडले. त्यांचा निर्णय होईल त्याप्रमाणे मी लग्न करीन. रमापुढे मोठा प्रश्न पडला होता. काय करावे? अरूणनेही कच खाल्ली आहे. तेव्हा आपण आपला निर्णय घेऊ असे रमाने ठरवले आणि ती रात्रीच्या गाडीने मुंबईला आली. पुनः अरूणचा फोन रमाला आला नाही आणि रमानेही फोन करणे टाळले.

रमाची मनस्थिती दोलायमान झाली होती. म्हणजे अरूण तिकडे कोणा मुलीच्या प्रेमात अडकला तर नाही ना? वा त्याने गुपचूप आई बाबांना न सांगता लग्न केले. अनेक शंका तिच्या मनात येऊ लागल्या. ती खूपच अस्वस्थ झाली होती. दुसऱ्या दिवशी ती हॉस्पिटलला गेली तर तिची नेमणूक डीननी सर्जरीचे डॉ.नरीयांची रजिस्ट्रार म्हणून केली होती. तिला आनंद झाला. म्हणजे आता सर्जरीचा उत्तम अनुभव आपल्याला पुढच्या २ वर्षात मिळेल. शिवाय हॉस्पिटल मध्ये असि.प्रोफेसर म्हणून नेमणूक होईल. या सगळ्या घटना एका मागोमाग

घडत होत्या. हा शुभशकून तर नसावा ? अशीही शंका तिला आली. तिने सकाळी अरूणला मेल करून सारा वृतांत कळवला. पण तरीही त्या मेलला उत्तर नाही अनेक शंका कुशंकानी तिचे मन गांगरले होते. तिचा तर अरूणशी लग्न करण्याचा विचार पक्का होता, जोवर प्रत्यक्ष तो बोलत नाही. पण अरूण मात्र दूरदूर पळत होता. याचा अर्थ काय? सध्यातरी आहे त्या परिस्थितीत आपले काम करीत रहावे हे धोरण तिने स्वीकारले. आता रजिस्ट्रार झाल्यावर तिचे क्वार्टर ही खूप चांगले, सुसज्य मिळाले होते. कामही जबाबदारीचे होते, सतत ओटीमधे मग आय.सी.यू.मधून पेशंन्ट जोवर डीस्चार्ज होत नाही तोवर तिची जबाबदारी होती. शिवाय केव्हाही केसेस येत. आणि पळापळ करावी लागे. थोडक्यात २४ तास ऑन ड्युटी.

काळ पुढे पुढे जात होता. रमानेही फोन वा मेल पाठविणे बंद केले आणि अरूणने ही. या गडबडीत. दोन वर्षे निघून घेली केव्हा हेही समजले नाही, मग मात्र रमाचे वडील जराही तिचे ऐकायला तयार नव्हते, त्यानी पुन्हा वर संशोधनाला सुरुवात केली आता. रमाही ३० वर्षाची झाली होती. ती एक उत्तम डॉक्टर, एक सर्जन होती. केईएममध्ये तिच्या नावाचा बोलबाला होता. अनेक डॉक्टराना तिच्याशी लग्न करावे असे वाटत होते. पण रमा कोणलाही रीस्पॉन्स देत नव्हती. ती अक्कड बाज आहे, गर्विष्ठ आहे, अशा नाही नाही त्या कंड्या आता उठायला लागल्या होत्या. तिचे सहकारी डॉक्टरही तिला हवे तसे सहाय्य करीत नव्हते. त्यात डॉ.नरीयानी निवृत्त झाले. मग तिचीच नेमणूक सर्जन म्हणून झाली. आणि डॉ. शशांक सरपोतदार याची रजिस्ट्रार म्हणून नेमणूक झाली. शिवाय ती आता असि.प्रोफेसर म्हणूनही काम पहात होती. सकाळी लेक्चर दुपारी ऑपरेशन शिवाय केव्हा केव्हा ओ.पी.डी. यात तिचा प्रत्येक दिवस अगदी व्यस्त जात होता. आता दोन्ही आघाड्यांवर शांतता होती.

डॉ. शशांक एक निष्णात डॉक्टर होता. एका शेतकऱ्याचा मुलगा होता. त्याचा आदर्श होता. डॉ. मांडके, अँबीशीयस, खूप काही करावे जीवनात या धेयाने तो स्वत:ला तयार करीत होता. त्याचे सगळे शिक्षण त्याने स्कॉलरशिपवर केले होते. शिवाय तो दोन डॉक्टराकडे लोकम म्हणून काम करीत होता. तो अतिशय शांत होता. रमा आणि शशांक यांचे मेतकुट छान जमले होते. तोही एक चर्चेचा विषय होता. त्याला हार्ट सर्जन व्हायचे होते. त्यासाठी लंडनला जाऊन एफ.आर.सी.एस. करावे असा त्याचा इरादा होता. तोही स्कॉलरशिप

साठी प्रयत्न करीत  होता. त्याची एम.स.ची दोन वर्षे होत आली होती. त्याने लंडनला मेडीकल ॲकॅडमित ॲडमिशन घ्यायचे ठरवले सारी तयारी झाली. पण गाडी अडली होती पैशामुळे. टाटाने त्याला स्कॉलरशिप देण्याचे नक्की केले होते. पण अजून २० लाख रू. ची गरज होती. ती कशी होणार. घरची जमीन विकून पैसे उभे करावे लागणार होते, पण अजून वडील शेती करीत होते. तेव्हा तेही शक्य होईल असे वाटत नव्हते.

रमाने हा विषय तिच्या वडिलांकडे काढला. एका होतकरू डॉक्टरला मदत केली तर त्याच्या जीवनाचे कल्याण होईल. असे तिने वडिलांना सांगितले. रमा बरोबर तोही चिपळूणला आला. वडील आशावादी होते. रमाचे शशांकशी लग्न झाले तर छान होईल, नाहीतरी अरूणचा विषय आता मागे पडला होता. सगळा संपर्क तुटला होता. पण शशांकच्या मनात काय आहे हे अजून रमाला समजले नव्हते. तो नक्की आपल्या प्रेमात पडला आहे कां? कि त्याला एफ.आर.सी.एस.चीच नशा आहे.

एक दिवस रमाने शशांकला  डिनरला बोलावले. काही करून या विषयाची उकल करावी.

''शशांक ! तुझा लग्ना बाबत काय विचार आहे ?''

''माझी अँगेजमेंट झाली आहे ! एका वर्षा पूर्वी, ती मुलगी आय.ए.एस. आहे आणि बंगलोरला तिची पोस्टींग झाली आहे !'' शशांक.

''ठीक ! मग कधी लग्न करताय ?''

''अजून नक्की नाही ! तिला घाई नाही. तेव्हा  कदाचित एफ.आर.सी.एस. नंतर. मी लंडनला जाईन. पण तिच्या अडचणी खूप आहेत. तिला भारत सरकारची परवानगी लागेल. शिवाय तिला त्या सर्वीस मध्ये एकच वर्ष झाले आहे ! रजा मिळणे शक्य नाही ! पाहू या केव्हा योग येतो ते !'' शशांक.

पुढे रमा काहीच बोलली नाही. डीनर झाल्यावर शशांक गेला. आता पुनः तिच्या डोक्यात अरुणच्या विचारांनी उचल खाल्ली होती, त्याला आपण फोन केला तर तो प्रतिसाद देईल कां ?

रमाने एक मेल त्याला पठवला.

''कसा आहेस ? लग्नाचे काय ठरवलेस ?''

''मी तुला फोन करतो, आपण हा विषय गंभीरपणे सोडवू या!''आपण आता लहान नाही ! शिकलेले आहोत. तेव्हा एकत्र बसून निर्णय घेऊ''!

अरूण.

"ओके ! मी तुझ्या फोनची वाट पहाते आहे!" रमा

अरूणचीही यू.के. मध्येकोरोनामुळे पार पंचाईत झाली होती ७०% कंपनी बंदच होती. सेलही कमी झाला होता फक्त नोकरी चालू होती. गेल्या दोन वर्षाच्या पडझडीने तो ही लंडन सोडण्याच्या विचारात होता. कामगारांची कमी, प्रोडक्शन बंदच होते. तेथे राहून काहीच उपयोग नव्हता. तर आपण हिंदुस्थान गाठावे. सध्या स्टार्टअपचे वारे आहेत. तेव्हा भारतातच आपले नशीब आजमवावे. असे त्याने ठरवले होते. जागतिक स्तरावरही धंद्याची प्रगती थांबली होती. आता त्यानेही वयाची ३२ शी पार केली होती. तेव्हा भारतात जावे, लग्न करावे, तेथेच चांगली प्रॉडक्शन कंपनी काढावी असे त्याच्या मनात होते. आता रमाच्या मनानेही हा प्रश्न सामोपचाराने सोडवावा. असे वाटत होते. शिवाय दुसरा उपाय नव्हता. रमाला वाटले आता गाडी रुळावर आली आहे.

आणि अडथळ्याची शर्यंत जिंकल्याचा आनंद तिला झाला होता हे खरे!

०-०-०-०

# पाय गुण !

सुमाचे शशांकशी लग्न ठरले आणि आकाश ठेंगणे वाटले दोघांना. एकमेकांशी चांगली ओळख व्हावी, समजून घ्यावे त्यानी, म्हणून साखरपूडाही थोडा लांबवला. दोघांच्या घरातल्या बूजूर्गांनी. ती दोघेही फोर्टला कामाला. शशांक एच्.डी.एफ्.सी. बँकेत आणि सुमा ग्रिंडले बँकेत. संध्याकाळी ऑफिस नंतर गेटवेपासून व्हिटी पर्यंत चालत ते यायचे. गुंफलेले असायचे हातात हात त्यांचे. वाटेत सुजाता हॉटेलात गरम गरम भजी खाणे हा त्यांचा फिरण्यातला नित्याचा उपक्रम होता.

दोन महिन्यांनी साखरपूडा पार पडला, आणि लग्नाच्या तारखा ही ठरल्या. दोन्ही घरचे यजमान उच्चभ्रू, श्रीमंत. प्रत्येकजण आपआपल्या परिने खर्च करीत होते. कोठेही कसली ही न्यूनता नव्हती. लग्न समारंभ थाटात पार पडला. तत् पूर्वी शशांकने हनीमुनसाठी दोघांच्या पसंतीचे उटी ठिकाण निवडले व त्या प्रमाणे बुकींग केले. केसरी टूरच्या नवोदितांसाठीच्या वैवाहिक हनीमुनसाठी यावर्षी ही टुर खास अरेंज केली होती. स्वतः श्री केसरी या टुरवर त्यांच्या सोबत होते. सारी व्यवस्था इतकी चोख होती की, नांव ठेवायला जागा नव्हती. या सात दिवसांच्या टुरमधे कार्यक्रमांची खूप रेलचेल त्यांनी केली होती. जेणे करुन नव विवाहीत जोडप्यांमधला परकेपणा दूर व्हावा व प्रत्येकाच्या आवडी निवडी माहिती पडाव्या, हा त्यामागचा उद्देश. टुर पार पडली आणि ती दोघे मुंबईला परत आली. आनंद ओसंडत होता त्यांच्या तनात मनात. घरचे वातावरणही कमालीचे आनंद दायक, आल्हाददायक होते. पंधरा दिवस छान गेले.

एक दिवस तिने शशांकला तिच्या शरिरातील न्यूनता सांगण्याचा प्रयत्न केला. पण तिला धीर झाला नाही. मग मध्ये १५/२० दिवस गेले. ती तिची अडचण आपण सांगावी यासाठी तिने मन घट्ट केले. आणि शशांकला म्हणाली.

''शशांक ! मी तुम्हाला सांगेन सांगेन असा विचार लग्नापूर्वी आणि नंतरही प्रयत्न केला पण मला धीरच झाला नाही. पण केव्हातरी हे सांगावेच लागणार, मग आताच कां नाही ! असा विचार मी केला पण !'' सुमा.

''सांगना ! त्यात काय येवढे आढेवेढे घ्यायचे, जे सांगायचे ते स्पष्ट सांग, उगाच तुझ्या मनात ते रहायला नको! मन मोकळे कर एकदाचे !'' शशांक.

''तसे सांगणे अवघड आहे ! पण आज नाही तर उद्या हे कळेलच आणि

आपल्यातले गैरसमज अधिक घट्ट होतील म्हणून, म्हटले आताच मन मोकळे करावे !'' सुमा.

''अग मग सांग ना !'' शशांक.

शशांकने सुमाला जवळ घेतले, तिचे दिर्घ चुंबन घेतले, आणि तिला छातीशी घट्ट ओढीत...

''आता सांग !'' शशांक.

सुमाने त्याची मिठी सोडवून घेतली, नी ती सावरून बसली पलंगावर.

''शशांक ! दोन वर्षापर्यंत सारे काही ठीक होते. पण मी ऑफिसच्या ग्रुप बरोबर रायगडला गेले होते. माझे दोन्ही पाय घसरले. मी पडले. माझ्या ओटी पोटाला मार लागला आणि बराच रक्त स्त्राव झाला. पण तेव्हा पासून...'' सुमा.

''काय झाले! ते सांगना ! '' शशांक

''माझी पाळी बंद झाली !'' सुमा

आणि ती ओकसाबोकसी रडू लागली.

''सुमा ! आधी रडणे थांबव. यावर काहीतरी उपाय शोधू आपण. तू तूझ्या मनातला शंकासूर प्रथम झटकून टाक आधी ! तुला खूप टेंशन आहे हे मी जाणतो. प्रथम तू त्यातून बाहेर ये !'' शशांक.

''आम्ही ही डॉक्टरना दाखविले. ते म्हणाले लग्नानंतर सारे काही सुरळीत होईल ! काळजी नको ! पण जर तसे नाही झाले तर ?''

''तर काय ? तू चिंता सोड, शेकडो उपाय आहेत. आपण आता लग्न केले आहे. 'एक दुजेचे झालो आहोत'. तूझे सुख–दुःख ते माझे असे मी मानतो ! चिंता सोड, आणि आता झोप !'' शशांक.

आणि शशांकने सुमनला जवळ घेतले. तिचेही टेंशन कमी झाले. ती शशांकच्या कुशीत सामावली... नी तिला छान झोपही लागली. पण शशांक मात्र जागाच होता रात्रभर. सकाळी केव्हातरी त्याला झोप लागली. दुसरा दिवस रविवार होता. सुमन लवकर उठली आणि घरच्या कामाला लागली. आज अंगारकी होती. संध्याकाळच्या पुजेसाठी तिला मोदक करायचे होते. त्यासाठी ती तयारी करीत होती. काही वेळाने शशांकला जाग आली. तो पाहतो तर सुमा कामात गर्क, ''हिच कां ती कालची सुमा ?'' असा प्रश्न त्याला पडला. आणि उठून तोही आपली कामे आवरु लागला. पण अजून तो त्या विचारातून बाहेर आला नव्हता.

आज सगळ्यांचा उपवास, तेव्हा सुमाने सगळ्यांसाठी दुपारसाठी साजूक तुपात साबूदाण्याची खिचडी केली होती. आज तसे बाहेर कोठे जायचे नव्हते. पण पाच वाजता शशांकने सुमाला खरेदीसाठी तयार केले. सुमा नव्या घरी आल्यापासून शशांकने तिच्यासाठी स्वत: होऊन काहीही खरेदी केली नव्हती. तिची कालची नाराजी दूर करावी, बोलावे, हसावे थोडावेळ. मग थोडा विरंगुळा मिळेल तिला यासाठी.

त्याने तिच्यासाठी छानशी कांजीवरम साडी रुपसंगम मधून घेतली. मग कोहिनूर समोर लस्सी घेतली आणि ते परतले घरी. सुमाच्या मनातले वादळ शमले होते. येवढी बातमी दिली, जीने सारे आयुष्य ढवळून निघावे, अशी, पण आता ती स्थिर होती. आणि घरी येताच ती उकडीचे मोदक करायला लागली. चंद्रोदय रात्री नऊ पंचवीसचा होता.

सुमाच्या मनावरचे ओझे उतरले होते. पण शशांकच्या मनावर अजून दडपण होते. जर काही मार्ग निघाला तर ठीक, नाहीतर आई बाबांची अवस्था काय होईल. त्याना घाई होती ती नातवंड पाहण्याची. हे दडपण त्याला सतावीत होते. पण मग त्याने आपल्या मनाला समजावले, पण ते ऐकते थोडेच.

रात्री चंद्रोदयानंतर श्री गणेशाची पूजा आटोपली. मनोमन दोघांनीही या अडचणीतून बाहेर काढण्याची गणपती बाप्पाकडे प्रार्थना केली. त्या रात्री त्याना छान झोप लागली.

शशांकचे डॉ. नरीयानी हे मुंबई हॉस्पिटल मधले निष्णात डॉक्टर मित्र होते. त्याने त्यांना फोन केला व सुमाच्या केस बद्दल सविस्तर बोलणे झाले. त्यानी शुक्रवारची वेळ दिली होती. ते दोघेही त्यांच्या कंसल्टींगला आले. तपासाअंती आताच काही सांगता येणार नाही. पण तो मार्ग उघडेल व मुले होऊ शकतात असे सांगितले, पण किती काळाने हे त्यांनी त्याना सांगायचे टाळले. त्यांच्या अनुभवानुसार अशा केसेसमध्ये योनीचे मार्ग लग्नानंतर उघडतात. या केसमधेही ते तसे समाधानी होते. पण ही केस ॲक्सिडंटची होती. म्हणून थोडी शंका होती त्यांच्या मनात.

''तुम्ही ४/६ महिन्यांनी या ! मग बघू! पण तोवर सारे काही सुरळीत व्हावे ! मी आशावादी आहे !'' डॉ. नारीयानी.

'' ठीक! थँक्स सर !'' म्हणत ते कंसल्टींग बाहेर आले व फी देण्यासाठी शशांकने पाकीट बाहेर काढले.

''नो, सर, थॅक्स डॉ.म्हणाले यांच्याकडून कन्सल्टींग फी घेऊ नका ! ते माझे दोस्त आहेत !'' रीसीप्शनिस्ट.

''थॅंक्यू !"म्हणत ते घरी परतले.

सुमाची केस ही अपघाताची आहे. म्हणजे पोटातल्या युटॅरस वा इतर नाजूक भागाना इजा तर झाली नाहीना ? अशी शंका दोघांनाही आली.

त्यानंतर पाच महिने झाले पण काहीच प्रगती दिशेना अणि मग त्या दोघांना प्रचंड टेंशनने ग्रासले. त्यानंतरच्या आठवडाभर ती दोघे प्रचंड दडपणाखाली होती. काही सुचत नव्हते. शशांकची आई मधे मधे सुमाच्या पोटाला हात लावून विचारी ....

''बाय सुमा ! आहे कां ?'' आई

सुमा काहीच उत्तर देत नव्हती. पण याच गोष्टीने तिचे मानसिक संतुलन मात्र बिघडत होते. गेला आठवडाभर तिला धड झोपही आली नव्हती. काय करावे हे तिला कळेना. तिने ही गोष्ट शशांकला सांगीतली. त्यालाही आता प्रचंड दडपण आले होते. शशांकने डॉ. नरीयानी याना फोन केला व संध्याकाळी येत आहे असे सांगीतले. डॉक्टरांनी तिला तपासले त्याना तिच्या अवस्थेत काही अडचण असावी असे वाटले नाही. पण त्यानी सोनोग्राफी, एम.आर.आय.आणि इतर रिपोर्ट ही करुन घेण्यास सांगीतले. शशांकने सगळे रिपोर्ट केले व डॉ. ना ऑनलाईन पाठवून दिले.

दोन दिवसांनी डॉ. नरीयानी यांचा फोन आला. आणि त्यानी शशांक-सुमा यांना भेटायला बोलावले.

''मला सार काही नॉर्मल दिसते आहे तुम्हाला मुल होणार. पण कधी हे नक्की सांगता येणार नाही. पण होणार खात्रीने !'' डॉक्टर.

त्यानंतर ती दोघे घरी आले. दूसऱ्या दिवशी शशांकचे आईवडील गावाला म्हणजे कणकवलीला जाणार होते. सकाळी सहाची जनशताब्दी होती. शशांकने घरी पाच वाजता ओला मागवली व आईबाबा गावी गेले. त्यांच्या स्वतःच्या आंब्याच्या बागा होत्या. सहा-सात लाख रुपयाचे आंबे ते विकित असत. तो एप्रिल महिना होता. ते गावाला गेले. आणि वीस मेला कोरोनामुळे लॉकडाऊन झाला. खरे तर मे शेवटला ते परत येणार होते. पण अडकले. आता केव्हा हे काही सांगता येत नव्हते.

डॉ. नरियानी यानी त्याना सुचवले की तुम्ही एक लहान-तान्हे मुल दत्तक

घ्या. त्यामुळे सुमाचे 'मातृप्रेम' उचंबळून येईल, त्या मुलाचे करता करता आणि तिचे मातृत्व जागे होईल हे मी खात्रीने सांगतो.

शशांकला हा उपाय साधा व सोपा वाटला. पण येवढे महिन्याचे मुल कोठे मिळणार ? शशांकने नातेवाईकांना फोन करून चौकशी केले. पण कशासाठी हे अगदी सारे गुलदस्त्यात ठेवले. ते जेथे रहात होते तो एकता मेडोज् टॉवरमध्ये पाचशे फ्लॅट होते. बी विंग मधल्या ९ व्या मजल्यावर रहाणाऱ्या शहाणे या इंजीनियरची बायको आठ दिवसापूर्वी बाळंतपणात गेली. पण मुलगी मात्र वाचली. घरात इनमीन तिघेजण आई वडील वृद्ध आणि मि. शहाणे. शशांक आणि सुमा त्याना भेटायला गेले. सुमाने त्या मुलीला पाहिले, एक दिवस थांबून त्या मुलीचे सारे काही केले व त्यांच्या अनुमतीने ते बाळ तिने आपल्या घरी आणले. कारण शहाणेचे आईवडील वृद्ध ते कसे करु शकत होते त्या बाळाचे संगोपन. म्हणून शशांक आणि सुमा यांनी शहाणे यांना विनंती केली आम्ही या बाळाचे सारे काही करू. तूम्ही निश्चिंत रहा.

त्यानंतर मि.शहाणे अमेरिकेला गेले व जाताना त्यांच्या आई वडीलानाही घेऊन गेले. बाळ खूप गोरे, गोरे, नाकीडोळी छान होते. शशांक-सुमा यांना ते खूप आवडले. त्या मुलाचे करण्यात सुमाचा पुरा दिवस जात असे. तिने बँकेकडून एक वर्षाची रजा घेतली व पूर्ण वेळ त्या मुलीच्या सहवासात ती रहात होती. आपल्यालाही असे स्वत:चे मुल हवे असे राहून राहून वाटत होते. पण या बाळाचा पाय गुण चांगला असेल तर मलाही बाळ होईल. ती आशावादी होती आणि आईच्या मायेने त्या बाळाचे ती करीत होती.

सुमाने त्या मुलीचे नांव ''इंदिरा'' असे ठेवले. बारसेही केले आणि त्या बाळाचे फोटो आपल्या सासु-सासऱ्यानाही पाठविले. त्यानाही कमालीचा आनंद झाला.

तिकडे यु.एस.मधे मि. शहाणे याने दुसरे लग्न केले एका अमेरीकन मॅडम बरोबर आणि आता तर त्याने फोन करणेही बंद केले होते. आता ही मुलगी आपल्या गळ्यात पडली अशी भावना होणे सहाजिक होते. शशांकने मि. शहाणे याना फोन करुन 'हे मुल आम्ही दत्तक घेतले तर चालेल कां? असा मेसेज पाठवला. त्यानेही तात्काळ 'हो' म्हटले आणि शशांक-सुमाचा जीव भांड्यात पडला. आता ते बाळ आपले झाले या भावनेने सुमाला कमालीचा आनंद झाला.

शशांकने कायदेशीर साऱ्या बाबी पूऱ्या करुन ‘इंदिराला’ दत्तक घेतले व आता ती स्वत:ची मुलगी इंदिरा झाली होती आणि इंदिराचे नांव आपल्या नावाशी जोडले. त्यानी इंदिराचा व्हिडीओच आई बाबांना पाठवला.

दोन वर्ष झाली तरी कोरोनाचा लॉकडाऊन काही मुंबईहून उठेना. त्यात ती वयस्कर म्हणून कोणतीही रीस्क नको, या हिशेबाने शशांकने त्याना गावातच ठेवले. तेवढ्यात दुसरा आंब्याचा सिझनही आला. लॉकडाऊन जून मध्ये उठले आणि ती दोघे मुंबईला आली. आपल्या नातीला ‘इंदिराला’ पाहून त्यांना खूप खूप आनंद झाला. कुठे कुठे ठेऊ असे त्याना झाले होते...

आणि चमत्कार झाला सुमाला दिवस गेले. शशांक आणि सुमाला प्रचंड आनंद झाला हा पायगुण इंदिराचा यात शंका नव्हती. सुमाने तिच्या बँके कडून दोन वर्षाचे दुसरे एक्टेंशन घेतले. तिच्या पोटात बाळ वाढत होते.

डॉ. नरीयानी ही डिलीव्हरी करावी अशी इच्छा शशांक-सुमाने व्यक्त केली. सोनोग्राफीनंतर समजले ‘दोन’ मुले त्याना होणार आहेत. आणि इंदिराला आता खेळायला आणखी दोन भावंडे होणार आहेत. ती आता ३ वर्षाची होती. सारे काही तिला समजत होते. ती खूप हुज्जत घाली बाळे दाखवायला. कधी पोटाला कान लावून त्यांचा आवाज ऐके... आणि पूरे दिवस घेऊन प्रथम मुलगा व नंतर मुलगी याना सुमाने जन्म दिला. डिलीव्हरी नॉर्मल झाली.

आपण वांझ नाही हा कलंक आता पूर्णपणे पूसला गेला होता. पण सासू-सासऱ्यांपासून सारेच गुलदस्त्यात ठेवले होते त्यांनी.

आता तीन मुलांचे करता करता सुमन मेटाकुटीला आली होती. एकाला भूक लागली की दुसऱ्याला लागे. हा सगळा आनंददायक आनंद सुमा घेत होती तो तीचे मातृत्वाचे प्रेम उचंबळून आहे म्हणून असावे. तीन मुलांची आई म्हणजे धनाची पेटीच होती. त्यांच्या आनंदाला पारावार नव्हता. शेवटी हा इंदिराचाच पायगुण असावा हे ही त्यानी स्वीकारले. तिन्ही बाळे आता गुण्या- गोविंदाने वाढत होती आणि ताई इंदिरा तर हवेत होती.

०-०-०-०-०

# दिलवाले

सकाळचे साडे नऊ झाले होते. सोमवार होता तो. असिटंटने सांगितले सर तुम्हाला फोन आहे मी फोन घेण्यासाठी हॉलमध्ये आलो....

''हॅलो ! कोण बोलते आहे !''

''मी रुबेन गोदरेज ! माझे एक अत्यंत तातडीचे काम आहे 'धर्मादाय आयुक्तालयातील एका केससंबंधी. ते मॅटर माझ्या विरोधात गेले आहे. मला हायकोर्टात रिट कराव लागेल. अनेक वकीलांनी आपले नांव सुचवले...!'' गोदरेज.

''बर ! ठीक आहे. आपण मला चॅरीटीच्या बार रुम मधे भेटा. दुपारी अडीच वाजता ! आणि नाही जमले तर संध्याकाळी माझ्या ऑफिसमधे दादरला! येताना सगळे कागदपत्र घेऊन या ! '' मी.

दुपारी गोदरेज आले पण वेळ होऊन गेली होती. मला दुसरी मॅटर्स होती म्हणून अधिक बोलता आले नाही. पण हे समजले ते असे की, त्याना एक ट्रस्ट करायचा होता, खाजगी आणि आमच्या चॅरिटी कमिशनरानी तो रिजेक्ट केला होता. कारण... नियमात बसत नाही म्हणजे कायद्याच्या कक्षेत. ते गृहस्थ निघून गेले. ते म्हणजे प्रसिद्ध गोदरेज कंपनी ग्रुपचे अध्यक्ष रुबेन गोदरेज. छान पर्सनॅलीटी, रुबाबदार व्यक्तिमत्व जाताना त्यानी काही पेपर्स सोडले आणि संध्याकाळी सहा वाजता दादरच्या चेंबरमध्ये येतो असे सांगितले.

मला खूप उत्सुकता होती, की हे मॅटर काय असावे. धर्मादाय ऑफिसमधून निघताना गाडीतच मी ते पेपर्स चाळले. अर्ध्या तासात सारे वाचन संपले. वयाच्या ८५ वर्षाच्या रुबेनना हिंदुस्थानातून आपल्या मुलाकडे लंडनला कायमचे जायचे होते. सगळा धंदा त्यांच्या डायरेक्टर्स वर सोडून कारण आता त्याना वयाच्या मानाने धावपळ सहन होत नव्हती आणि हे काम दोन-तीन महिन्यात होणे गरजेचे होते. तो होता ऑक्टोबर महिना नी थंडीचा लंडन मधला सिझन संपताच म्हणजे एप्रिल, मे च्या आत त्याना लंडन गाठायचे होते. हा ट्रस्ट त्यांना त्यांच्या 'रॉडी' या त्यांच्या कुत्र्याच्या संगोपनासाठी करायचा होता. त्यासाठी माहीम मधला एक एकरचा प्लॉट त्यानी रिझर्व्ह ठेवला होता. आणि बँकेत पन्नास लाखांची रक्कम ठेवली होती त्याच्या व्याजातून नोकराचा पगार, बांधकाम, वॉचमन अशी सारी योजना होती. त्यासाठी त्यांच्या गोदरेज ट्रस्टची

व्यवस्थापक म्हणून नेमणूक केली होती, पण या ट्रस्टला मान्यता देणे धर्मादाय आयुक्तांनी नाकारले होते.

मी साडे पाच वाजता दादरच्या ऑफिसमधे आलो पुन्हा ते कागद पत्र नजरे खालून घातले आणि नकाराची दिलेली कारणे तपासली. माझ्यामते तसे अनेक ट्रस्ट झाले होते. पण शेवटी रॉडी आहे तोवर ठीक, पण तिच्या पश्चात? त्या स्थावर जंगम मालमत्तेचे काय? हा एकच मुद्दा वादाचा होता. तेवढा बदलला असता म्हणजे झाले असते काम. त्यात रुबेन गोदरेज पारशी, पैसे न देणारे कंजूस म्हणून, मामला माझ्या पर्यंत आला.

सह वाजता त्यांचे आगमन झाले. सोबत त्यांचा वकील व गोदरेज ग्रुपचे सी.ई.ओ. पार्डीवाला आले होते.

''वकील साहेब, वाटेल तेवढी फी घ्या, पण हे काम हाय कोर्टातून करून घ्या. दोन महिन्यात मला हिंदुस्थान सोडायचे आहे आणि परत केव्हा येईन का येणारही नाही याची खात्री नाही. दुसरे रॉडी ही अत्यंत दुर्मिळ अशी कुत्री म्हणजे चाणाक्ष, बुद्धीमान, दिसायला सुंदर (फोटोवरून) अशी होती अडीच-तीन वर्षाची. त्यांची लाडकी, जीवापाड प्रेम त्यांचे रॉडीवर. एअर इंडिया किंवा कोणतीही एअर लाईन ते पार्सल घेऊन जायला तयार नव्हते म्हणजे त्यांच्या नियमात बसत नव्हते. म्हणून तिच्या व्यवस्थेसाठी हा ट्रस्ट स्थापन करायचा होता, बस !'' गोदरेज.

दोन मिनिटे मी विचार केला आणि आपण या केस या डब्ल्यू.पी. करू असे मी त्याना सुचवले व ट्रस्टच्या घटने मधे जूजबी बादल करुन ते डब्ल्यू.पी. पाईप करायचे असे ठरले. त्यासाठीचे जविनिया प्लॉटचे सात-बारा, ना हरकतीचे पेपर्स, ट्रस्टींची समंती पत्रे व त्या रॉडीची टेस्ट, फोटो इ. मी त्यांना पुढच्या वेळी २/३ दिवसात देण्यात सांगीतले.व ते गृहस्थ आनंदाने निघून गेले जाताना एक कोरा चेक मला दिला.

''यावर तुमची फीची रक्कम लिहा आणि चेक बँकेत टाका !'' गोदरेज.

येवढे सांगून ते निघून गेले. त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसला मला, अगदी टेंशनलेस्, जशी आता रॉडीची व्यवस्था लाऊन लंडनला जाण्याच्या तयारीची.

दोन दिवसानी पुन: ते माझ्या दादरच्या चेंबरमधे आले.

''सर तुम्ही तो चेक नाही टाकला अजून ? मी बँकला फोन करुन सांगीतले होते.!'' गोदरेज.

''काय घाई आहे हो! माझ्यासाठी ते फार महत्वाचे नव्हते ! प्रथम तुमचे काम ! तुम्हाला या अडचणीतून बाहेर काढणे हे माझे प्रथम उद्दिष्ट, तुम्ही हा चेक परत घ्या !'' मी.

''नाही! नाही! यावर मी तारीख टाकली नाही ! कोणतीही टाका! कितीही रक्कम टाका !'' गोदरेज

''तसे नको ! माझी फी फारशी नसेल. आज माझे एकच उद्दिष्ट आहे तुम्हाला आनंदात लंडनला जाऊ द्यायचे ! की बस् ! की मला माझी फी मिळाली !'' मी.

''ओके ! ओके सर ! माझे काहीच म्हणणे नाही, पण तो चेक मात्र तुमच्या कडेच ठेवा !'' गोदरेज.

''ओके ! तुमची मर्जी !'' मी

आणि मी तो चेक आमच्या अकाऊंटंटच्या हातात दिला.

त्या डब्ल्यू.पी. वर त्यांच्या सह्या घेतल्या व सबमिशनसाठी डब्ल्यू.पी.तयार करून माझ्या कारकुनाच्या हातात दिले.

दुसऱ्या दिवशी ते डब्ल्यू.पी. माझ्या अकाऊंटटने एच.सी. मध्ये फाईल केले व तारीख दोन दिवसानंतर म्हणजे शुक्रवारची दिली. त्या दिवशीच्या लिस्टमध्ये हे मॅटर शेवटच्या नंबरवर होते. जनरली तो नंबर येई पर्यंत कोर्ट उठत असे. पण तरीपण आम्हाला बसणे भाग होते. मी माझा असिस्टंट, गोदरेज व सीईओ बसूनच होतो. एक वाजता आमचे नांव पुकारले आणि मी लगबगीने अर्ग्यूमेंट मेजवर गेलो.

''मि.एडव्होकेट, आता जरी हे मॅटर पूकारले आहे तरी वेळ संपत आली आहे तेव्हा आपण दिड वाजता माझ्या चेंबरमधे या . तेथेच यावर चर्चा करू !'' हाय कोर्ट जज सावंत.

''ओके मायलार्ड !''

म्हणत आम्ही बाहेर पडलो व जे सावंत यांच्या चेंबर समोर उभे होतो बरोबर एक पंचवीसला त्यांचा चोपदार बाहेर आला.

'' ॲड. कदम.''

''हो.'' मी.

''तुम्हाला जज साहेबांनी चेंबर मधे बोलावले आहे शिवाय अशीलालाही घेऊन चला ! '' शिपाई.

''हो ! म्हणत मी त्यांच्या टेबला समोर उभा राहिलो.

''बसा !''

आम्ही बसल्यावर आमच्या फाईलमधला तो रॉडीचा फोटो त्यांनी वर काढला हा डॉगी कोणाचा ?'' गोदरेज उभे राहिले.

''बसा ! छान आहे ! ''

हि फिमेल आहे का ?

'' हो सर ! '' मी.

''माझ्याकडेही याच (डॉबरमॅन) जातीचा कुत्रा आहे. साडेतीन वर्षाचा !'' जज सावंत.

''गुड!'' गोदरेज.

''मला कुत्र्यांची आवड आहे ! दिल्लीला मी असताना माझ्या एका मित्राने त्याचा हा डॉगी मला दिला आणि ते यू.एस.ला गेले. तेव्हा पासून हा गुणी प्राणी माझ्याकडे आहे!'' जज

'' सर मीही यू.के. ला जात आहे दोन महिन्यांनी तत्पूर्वी या रॉडीची व्यवस्था छान पैकी लावावी यासाठी मी हा ट्रस्ट बनवला आहे सर !'' गोदरेज.

''ॲड. कदममी तुमची केस वाचली यात काहीही ॲडव्हर्स असे मला वाटत नाही. उदया मी आपल्या फेवरमध्ये ऑर्डर देतो. आपण निश्चित असा ! हे पहा हा डॉगी सांभाळणे सोपे नाही. तुम्ही त्या डॉगीला जीवापाड सांभाळताय यातच सगळे आले. एका मुक्या जनावरासाठी तुमची ही योजना स्तुत्य आहे. शिवाय या उपक्रमाने मुंबईतील इतर डॉगींची मेडीकलची व्यवस्था आपण करीत आहात ही गोष्टच मला खूप आवडली!'' जज.

''थँक्यू सर!'' मी.

आणि आम्ही उठणार येवढ्यात......

''मि.गोदरेज माझ्याकडेही या जातीचा कुत्रा आहे. अगदी असाच पहाल तुम्ही. मी तुम्ही रहाता त्या इमारतीच्या मागील वॉर्डन रोडवरच्या बंगल्यात रहातो तेव्हा तुम्ही आणि ॲड.कदम रविवारी तुमच्या रॉडीला घेऊन माझ्या बंगल्यावर या ! यात काही वावगे नाही ना ?'' जज

''नाही सर ! आम्ही रविवारी सकाळी साडे नऊ वाजता येतो. आपल्या पाहुणचाराला !'' गोदरेज.

''ओके !'' जज.

येवढ्यात दुपारच्या जेवणाची वेळ झाली अणि आम्ही बाहेर पडताच जज ही कोर्टमध्ये त्यांच्या आतल्या दरवाजाने गेले. आम्ही सुखावलो.

''ॲड.कदम माझ्या रॉडीचे नशीबच मोठे आहे म्हणा ! तुम्ही भेटता काय ? जज कडेही असा कुत्रा आहे ! हा योगायोगच म्हणायचा !'' गोदरेज

''हो सर नक्की ! '' मी

त्या रिटपिटीशनची ऑर्डर शनिवारी इ-मेलने मिळाली. मी मि.गोदरेज यांना फोन केला आणि ही गोड बातमी दिली.

रविवारी सकाळी साडे आठ वाजताच माझ्या दादरच्या घरा समोर मि.गोदरेज हजर झाले. सोबत रॉडी होतीच. मग आम्ही सावंत यांच्या बंगल्यात पोहचलो बरोबर साडे नऊ वाजता ते आमची वाट पहात पोर्च मधे उभे होते.

''वेल कम मि.कदम, मि.गोदरेज वेलकम !'' जज.

''ओके सर! थॅंक्स !'' मी.

मग रॉडीला घेऊन गोदरेज गाडीतून उतरले. रॉडीला का कोण जाणे खूप आनंद झालेला दिसला.

''मि.गोदरेज तिला मोकळी सोडा !'' जज्ज.

''ओके सर ! बट ?'' गोदरेज.

''घाबरायचे कारण नाही. आमचा डॉगी-रॉकी मोकळाच असतो. त्याला कधीच आम्ही पट्टा लावीत नाही !'' जज.

''ओके सदर !'' गोदरेज, म्हणत त्यानी रॉडीचा पट्टा काढला.

काय आश्चर्य चुंबकाचे दोन ध्रुव एकमेकांना आकर्षित होतात तसे ते दोघे एकमेकांच्या गळ्यात पडले जसे पूर्व जन्मीचे जोडीदार. आणि त्यांच्या खेळाची, बागडण्याची मजा सारेजण पहात बसले दिड तास आम्ही त्यांच्या घरी होतो. पोर्च मध्येच चहा पाण्याचा कार्यक्रम पार पडला. त्यांच्या सौ ने नाष्टयाला घावणे व इ. पदार्थ केले होते. गोदरेज हे ते प्रथम खात होते. त्यांना ते खूप आवडले. आज गोदरेज खूप आनंदात होते. आज ते लंडनच्या विमानात बसले आहेत असा भास त्याना होत होता.

त्या दीड तासात रॉकी आणि रॉडीने खूप धमाल केली. खूप खेळले. एका भांड्यात त्यांच्यासाठी ठेवलेला फराळ केला.

''तुम्ही असे का करीत नाही ! तुमच्या ! रॉडीला येथे सोडून जा मी तिला आणून तुमच्या घरी सोडीन ! काळजी नको !'' जज.

''अहो पण आम्ही तिला अजून आमच्या नजरे आड केले नाही ! आता दिड तास झाला माझी पत्नी वाट पहात असेल !'' गोदरेज

''कम रॉडी !'' गोदरेज.

पण हुकमाची तामील करणारी रॉडी काही यायला तयार नव्हती ! त्यानी तीला पट्टा लावला तो हिसकावून ती रॉकी जवळ जाऊन उभी राहीली.

''आश्चर्य आहे !'' जज्ज.

''अहो मि.गोदरेज ! ते पूर्व जन्मीचे दोस्त वा जोडीदार असावेत ! बघा कसे गळ्यात गळे घालून खेळत आहेत. आहे ना आश्चर्य ! ठीक आहे मी संध्याकाळी तुमच्या घरी आणून सोडीन येताना रॉकीलाही घेऊन येईन. तेवढी त्याला रॉडीची कंपनी मिळेल !'' जज्ज.

संध्याकाळी ५ वाजता जज अरविंद सावंत दोघांना घेऊन मि. गोदरेज यांच्या गोदरेज हाऊस बंगल्यात आले, बंगला प्रशस्त होता. शिवाय भले मोठे गार्डन. मोठ मोठ्या झाडांची लागवड त्यानी २५ वर्षा पूर्वी केली होती जेव्हा हा बंगला त्यानी नानी पालखीवाला यांच्या कडून विकत घेतला होता. ते त्यांचे कायदेशीर सल्लागार होते.

गाडीतून उतरताच रॉकी-रॉडी यानी मैदानात धाव घेतली. आणि बागडायला लागले. ते दोघेही खूळे होते. मीही अर्धा तास अगोदर एच.सी.ऑर्डर घेऊन मि. गोदरेज यांच्याकडे आलो होतो. मी पण त्या दोन कुत्र्यांच्या बागडण्याने अगदी अचंबीत झालो .

तासाभरात कॉफी घेऊन जज आपल्या बंगल्यात गेले. जाताना रॉकीला बोलावले त्यानी पण तोही बेटा रॉडी पासून अलग व्हायला तयार नव्हता. शेवटी जज यांनी त्याचा पट्टा पकडला आणि जबरदस्तीने गाडीत ढकलला. तेव्हा त्यांची आणि ड्रायव्हरची फारच तारांबळ झाली. गाडीत येताच रॉकीने मान बाहेर काढली व तो रॉडीला पहात होता. रॉडीही त्याला सोडायला बंगल्याच्या दरवाज्या पर्यंत गेली. आणि गाडी दिसेनाशी होई पर्यंत ती त्याला पहात होती.

मग मायुस मनाने रॉडी घरात आली पण त्या दिवशी तिने जेवण घेलते नाही. गोदरेज यांनी खूप मस्का लावला पण उपयोग नव्हता. ती सारखी आत बाहेर करीत होती. याचे ही गोदरेज यांना आश्चर्य वाटले.

मी रात्री आठ वाजता घरी आलो. मीही चक्रावून गेलो होतो. एक दिवसापूर्वीच यांची भेट हाही एक योगा योग होता त्यांच्याकडे रॉकी, गोदरेज

यांच्याकडे रॉडी या एकाच उच्च जातीचे कुत्रे निघावेत आणि त्यांचे एकमेकांकडे आकर्षण हाही मोठा योगायोग होता.

दुसऱ्या दिवशी १ मे ची रजा होती महाराष्ट्र दिनाची आणि सकाळीच जज रॉकीला घेऊन हजर झाले तेव्हा नऊ वाजले होते, आणि रॉकीला पहाताच रॉडी आनंदीत झाली. आणि उड्या मारु लागली. तिचे बागडणे पाहून मि. गोदरेज यानाही परमानंद झाला.

महिना भरात बांद्राच्या त्या 'रॉडी डिसीस सेंटर' चे काम पूर्ण झाले सगळी व्यवस्था झाली. आणि मग रॉडीला सोडायला गोदरेज तेथे गेले. तिला दूर करताना त्या उभयताना कमालीची अस्वस्थता वाटली. पण नाईलाज म्हणून त्याना ही व्यवस्था करावी लागली. दररोज ते सकाळ संध्याकाळ जात होते पण रॉडी खूप नाराज दिसली. दोन दिवसाने शनिवारी त्याना जज सावंत यांचा फोन आला.

''सर मी जज सांवंत बोलतोय ! अहो आमच्या रॉकीने जेवण सोडले आहे रॉडी बांद्रयाला गेल्यापासून आणि माझीही आज सर. कोर्ट जज म्हणून बदली झाली आहे ! काय करावे कळत नाही. रॉकीला दिल्लीला नेणे शक्य नाही. बंगला मिळायला वेळ लागेल. मला महाराष्ट्र सदनमध्ये रहावे लागेल काय करावे ! मी तुमच्याकडे येतो !'' जज्ज.

आणि जज गोदरेज यांच्याकडे आले. तर रॉकी रॉडीला शोधीत होता सगळ्या बंगल्यात शेवटी तो नाराज होऊन पोर्चमधे येऊन बसला.

''मी काय करावे ? रॉकीच्या व्यवस्थे साठी ? '' जज.

''काही चिंता नको. तुम्ही संध्याकाळी माझ्या बरोबर रॉकीला घेऊन चला आपण रॉडी आहे तेथे यालाही सोडू. तेथे गेल्या पासून रॉडी ही अस्वस्थ झाली आहे ही दोघे एकत्र असतील तर आनंदात रहातील'' गोदरेज.

आणि त्याच दिवशी सावंत व गोदरेज रॉकीला घेऊन गेले. रॉकीने रॉडीला पाहिले आणि तो रॉडीच्या गळ्यातच पडला. मग तासभर थांबून ते दोघे घरी परतले. खरेतर दोघांनाही त्यांच्या शिवाय करमत नव्हते. सावंत हे दोन दिवसानी दिल्लीला गेले आणि गोदरेज त्यानंतर दोन दिवसानी लंडनला जाणार होते.

लंडनला जाण्यापूर्वी दोन्ही कुटुंबे बांद्रयाला आली दोन्ही कुत्रे आनंदात आहेत हे पाहून त्यांनाही आनंद झाला व त्या दोघांनी एकमेकांचे अभिनंदन केले व ती सर्व मंडळी निश्चिंत झाली.

दोन दिवसांच्या फरकाने आणि दिवसानी ते दोन्ही बंगले सुने सुने झाले. पण रॉडी–रॉकीच्या आठवणी दोन्ही कुटुंबे विसरू शकले नाहीत.

रॉडी, रॉकी हे दोन जीव एकत्र झाले हे ही एक अनोखी घटना होती. दोघेही त्यांच्या व्यवस्थेचे अपडेट घेत होते.

सहा महिन्यांनी गोदरेज यांचा फोन अरविंद सावंत यांना आला.

''सावंत साहेब ! ...तुमची सुन रॉडीने कॅरिंग ! गुड न्यूज फॉर यू अॅन्ड मिसेस सावंत!'' गोदरेज.

सावंताना ही आनंद झाला. दोन्ही जीव आनंदात एकत्र येऊन आज आनंदाची बातमी मिळाली त्यात 'सुन' या उल्लेखाने त्यांना खूपच अप्रुप वाटले. तेव्हा.....

जज सावंत म्हणाले ''सर अहो दिलवाले दुल्हनिया ले गये जी.''

गोदरेज यांनाही खूप आनंद झाला आणि आपण लंडन मधे निश्चित आहोत याचाही आनंद झाला. यथावकाश दोन पिल्लांना रॉडीने जन्म दिला.

गोदरेज यानी अॅड.कदम यांना फोन केला ''सर तुमची फी नाही घेतली व आपण''

''नाही मी घेणार नव्हतोच ! मला हे दोन जीव एकत्र आले. आणि तुमच्या सारखे मित्र भेटले यातच आनंद वाटला, मी तो चेक सर फाडून टाकला !'' मी.

''अहो ! अहो ! असे नका करू !'' गोदरेज.

''मग काय करु ?''

''या बदलात रॉकी–रॉडी चे एक पपी तुम्ही घेऊन जा ! सांभाळा त्याला निट. बाकी आमचे सर्वीस सेंटर काळजी घेईल !''गोदरेज.

''धिस इज गुड आयडिया सर' !''

आता अॅड.कदम यांच्याकडे त्या दोघांचा 'टग्या' वाढतो आहे ! आनंदात आणि आठवडा, आठवड्याला ही पील्ले दोन–तीन तास बरोबर खेळतात ! बागडतात आणि त्यांचे व्हिडीओ मी लंडन आणि दिल्लीला पाठवित होतो.

सगळाच आनंदी आनंद पण.... हा खेळ दिलवाल्यांचा हे मात्र खरे !!

०–०–०–०–०

# धूमशान !!

एकाएकी काय गावाचे डोके फिरले आहे काय? असा अनुभव आज आडगावात आला. कधी नाही ते कोरोनाची बंदी असूनही तूफान गर्दी झाली चैत्र पौणिमेला गावातल्या मंदिरात आणि तेथून निघालेला मोर्चा थेट भवानी पेठेत आला कां ? कशासाठी याचा मागमुस नव्हता. मोर्चातल्या लोकांना आणि एकदम हुल्लड झाली आणि.... अप्पा साहेबांचा पूर्णाकृती पुतळा निमीशात जमीन दोस्त झाला.

दोन दिवस अगोदर लॉकडाऊन होणार याचा सुगावा आप्पासाहेबांना लागला. त्यांचे संबंध राजकारण्यांजवळ असल्यामुळे. आठवडाभर अगोदर तुफान हालचाली सचिवालयात आणि दिल्लीतही सुरू होत्या. मुख्यमंत्री, पंतप्रधान, टीव्ही चॅनलवर मुलाखत देत होते. पण लोकांना जराही वास आला नाही लॉकडाऊन होणार याचा. त्या संधीचा फायदा आप्पासाहेबांनी घेतला नी स्वारी मुंबईला गेली.

त्या घटनेनंतर गावात पार सामसुम, पोलीसांची फलटन आली. पाच-पंचवीस लोकांच्या म्हणजे काही म्होरक्यांच्या मुसक्या बांधल्या नी चिपळूणला गेले पोलीस. आणि कधी नाही ते गाव पुन: जागे झाले. काय झाले? कसे झाले? येवढा इभ्रतदार माणूस. डोंगरा येवढे कर्तुत्व, आप्पासाहेबांचे. त्यांचा पुतळा गावाने हौसेने बसवला, ते नको नको म्हणत असताना आणि दोन वर्षात असा प्रकार घडावा ?

कारण तरी काय असावे? काहीच कळत नव्हते पण मोर्चा काढू. गावचेच म्हणजे नेहमीचे, ग्रामपंचायत, मंदिर येथे वावरणारे सगळे म्हणजे सगळेच टगेहो. नावे घेऊ नये असे लोक. ज्यांनी पूर्वी आप्पासाहेबांना डोक्यावर घेतले कारण त्यांचे कामच तसे होते. गेली वीस वर्षे ते गावाच्या मंदिरासाठी दिवस रात्र खपत होते. स्वत:चा पैसा खर्च करीत होते. स्वत:चे राजकारण, सोशलवर्क आणि मुंबई मधल्या सगळ्या कामाला त्यानी पूर्ण विराम दिला नी फक्त आणि फक्त मंदिर बस्! त्यांना ध्यास होता तो हे भवानीचे मंदिर 'न भुतो न भविष्यती' असे उभे करायचे. आणि झालेही तसेच. पैसा मुंबईत गावातले, मुंबईचे कार्यकर्ते गावातले काही सधन व्यक्ती अणि जीवाचे रान करून मुंबईतले कार्यकर्ते दहा वर्षे वणवण भटकत होते देणग्या जमा करायला, नी त्यांच्या कष्टातून दिड-

पावणे दोन कोटीचा निधी जमा झाला. आप्पासाहेबांनी ती नियोजीत पध्दतीने नीट वापरला. एक पैसाही कार्यकर्त्यानी त्यातला प्रवासाला वापरला नाही नी त्यातून हे प्रचंड काम उभे राहिले.

हे काम उभे रहात असताना गाव खरोखरच झोपलेला होता. म्हणजे त्यांना काय चालले आहे ? कसे मंदिर बांधत आहेत? कोण लोक त्यासाठी जीवाचे रान करीत आहेत याची खबर गावाला नव्हती असे नाही. पण कानाडोळा करीत होते लोक. ९५% रक्कम बाहेरुन जमा झाली. ५% गावातल्या लोकांकडून. अहो बडे बडे चोर राजकारणी होते ना, डोळे फाड फाडून बघणारे पण सगळेच षंढ. काडीचा उपयोग झाला नाही या मंदिर उभारणीत, पण याचे श्रेय घ्यायला सगळ्यांच्या माना वळल्या मंदिराकडे.

खरेतर आप्पासाहेब निस्वार्थी, स्वच्छ चारित्र्य नी स्वच्छ व्यवहाराची प्रतिभावंत व्यक्ती. त्यानी पूर्णपणे वाहून घेतले होते या कामासाठी. आणि त्यांच्या नेतृत्वाखाली घाम गाळत होते गावातले, मुंबईत रहाणारे चाकरमानी. इकडे मंदिर पूर्ण होण्याच्या मार्गावर होते आणि तत्पूर्वी सहा महिने अगोदर गावातील उत्साही टग्यानी उचल खाल्ली. आणि एक योजना आखली आप्पा साहेबांचा, या कर्तुत्ववान व्यक्तीमत्वाचा पूर्णाकृती पुतळा उभारायचा. लोकांनी सढळ हातांनी मदत केली नी मंदिराच्या कलश रोहणाबरोबर त्या पुतळ्याचेही अनावरण शंकराचार्याच्या हस्ते झाले आणि कोठे माशी शिंकली माहित नाही. पण आजवर झोपलेली टगे मंडळी जागी झाली. त्याना दिसला तो मंदिरात भाविकांकडून येणारा पैसा. त्यातून येणारा मान, मरातप, प्रत्येकाला आता वाटू लागले आपल्या ताब्यात हे मंदिर असावे. दूभती म्हैस कोणाला नको असणार? आणि सगळेच सरसावले. अहंमितीका सुरु झाली. टगे मंडळींचे राजकारण सुरु झाले.

आता गांव म्हटला म्हणजे शत प्रतिशत चांगले लोक असतील असेही नव्हते. दूधात मीठाचा खडा टाकून सगळे चांगले काम कसे नासेल हे पहाणारे राजकरणी यानी बाहेरून रसद पूरवायला सुरूवात केली. आणि हे कुरण नासवायला आपले वळू सोडले त्या कुरणात. वातावरण तापत गेले. गावातली शांतता पावला पावलावर भंग होत गेली नी येवढ्या चांगल्या गावाचे महाराष्ट्रात नांव झाले. त्यालाच किड लागली.

गावातली काही मंडळी राजकारणात जशी होती तशी सरकारी खात्यात

काम करणारी, मग ती पोलीस खात्यातली मुख्यत्वे त्यांनी रसद या टग्याना सुरु केली. औपचारिक सल्ले द्यायला सुरुवात केली. आणि आप्पा आणि त्यांच्या वाडीतल्या लोकांच्या विरुद्ध पोलीस स्टेशन, तहशिलदार ऑफिस कलेक्टर नव्हे अगदी मंत्र्या संत्र्या पुर्यंत तक्रारी दाखल झाल्या बोगस.

झाले आप्पांच्या मागे सरकारी लक्तर सुरु झाले. आप्पा खमके. ते या सगळ्या स्वार्थी उचापतीना बळी पडणारे नव्हते. त्यांचेही लागे बांधे अगदी वरपर्यंत. डाळ शिजेना उचापतीदारांची. आणि सगळे वातावरणच धुमसत राहिले बरेच दिवस हे सगळे 'धूमशान' चालू होते दोन वर्षे.

या सगळ्या टग्या लोकांत तालुक्याचा एक शहाणा माणूस सामील होता पूर्वी पासून, पण आता त्याने आपली नखे काढायला सुरुवात केली होती. थोडेफार कायद्यातले त्याला कळत होते असे म्हटले तरी चालेल. कामाच्या अनुभवातून. ती वासरात लंगडी गाय मग शेफारठी केलेले सल्ले आप्पा आणि सार्थींच्या विरोधात तो करु लागला. शहाणा माणूस पण डेंजर, म्हणजे दुखऱ्या आणि त्याने आपले जाळे गावावर पसरायला सुरुवात केली कां माहिती आहे. आप्पांचा तो दुश्वास करायचा म्हणून. कारण आप्पा अशा हलकट माणसाची पिसे मोजणारे. त्यानी त्यांच्या उचापतींकडे फारसे लक्ष दिले नाही. म्हणजे त्याला भाव दिला नाही. अगदी काडीचाही. त्यात आप्पांचे काय चुकले माहिती नाही. पण त्या कुडमुड्या शहाण्याने गावात आपले पंख पसरीत विरोधी माणसे शोधायला सुरुवात केली. काही लोक लागले गळाला. आणि त्याला मग भलतेच अवसान आले. हा सगळा प्रकार आप्पांच्या मागे अगदी जोर धरीत होता. पण आप्पासारखा शहाणा माणूस गाफील, कोण आपले वाकडे करणार ? आपण सत्याने चालतो ना, मग याना का डरावे ?

आणि तोच गाफीलपणा फणा काढून आप्पांच्या मागे शुक्लकाष्ठ म्हणून लागते तसा लागला . पण ते खमके त्यांनी त्याला दाद दिली नाही आणि मग नवे षंडयंत्र सुरु केले टग्यानी. त्यात एक वळू पुढे होता. नाही तरी इतरांना... म्हणजे अनपढ सामान्यांना हाताशी धरून तोच सारा काळाकांडीचा फार्स रचित होता, त्याच्या पोटात दुखत होता आप्पांचा तो पुतळा. खरेतर तोचं पुढे होता तो पुतळा उभारायला आणि बरीच माया त्याने त्या 'पुतळा' प्रकरणात हडप केली. काय करणार ? लोक मुर्ख, काय चांगले काय वाईट या वैचारीकते पासून कोसो दूर.

बघा तो वळू आता हुशार झाला होता. माजी आमदाराच्या दावणीला

बांधल्यावर. पोलीस स्टेशन, तहशिलदार ऑफिस, कलेक्टर ऑफिस यात त्याच्या ओळखीने त्याने पाय पसरले. लोकच हरामी ते त्याला पैशे देत, तो काम करून देई नी अव्वाच्या सव्वा मध्येच ढापीत त्या त्या कार्यालयातल्या भ्रष्ठ लोकांना सांभाळी. तोच त्याचा धंदा, पोटभरण्याचा आणि वर भाव सोशियल कार्याचा. पण लोकांच्या ध्यानात येत काही नव्हते.

खरेतर एक पैसाही त्याने मंदिर उभारणीत दिला नव्हता. देणार कोठून? तो हात मारायचा तो पोट भरण्यासाठी. तो माजी आमदार मात्र नामा निराळा. त्या टग्याने म्हणजे वळूने नवी टुम काढली. त्याला सल्लागार माजी आमदारच. कारण आप्पांनी त्यालाही कधी काळी दुखावला होता म्हणे. पण तो अजून त्या घटनेचे डूक धरून होता. आणि म्हणून या वळूला पुढे करून मागून सुत्रे हलवत होता. हे सारे आप्पांला माहित होते. पण त्या कडे त्यांनी दुर्लक्ष केले.

या नव्या टूम मधे न केलेल्या भ्रष्ठाचाराचे सातत्याने आरोप केले. गावाला न विचारता हे केले ते केले, गावाला जुमानीत नाही. अहंकार झाला आहे, ट्रस्ट रजिस्ट्रेशनमध्ये चुकीची माहिती दिली. तो हे मंदिर लाटायला निघाला आहे. उद्या तो मंदिरावर मालकी सांगेल आणि लोकही अनाडी. त्यांना ते पटत गेले. आणि एक विरोधी फळीच त्याने उभी केली. आणि त्यातून बिन डोक जमा झाले.

हा पुतळा व्हावा असे आप्पासाहेबांना वाटत नव्हते. त्यांना काय चालले आहे याची काहीच माहिती नव्हती आणि पुतळा उद्घाटनाच्या आदल्या दिवशी लोकानी उभारला तोही प्लॅस्टर ऑफ पॅरीसचा. आणि काल जमावाने नव्हे या टग्यानीच तो तोडला. या वळूच्या नेतृत्वाखाली दहशत निर्माण करण्यासाठी दुसरे काय?

त्याला कल्पना नव्हती म्हणजे त्या वळूला. आप्पासाहेबांना पुतळ्यात स्वारस्य नव्हते. तो तोडला हे बरेच झाले असे त्यांना वाटले पण आता हेच कारण या वळूच्या मुसक्या बांधण्यासाठी पुरे म्हणून त्यांनी गृहमंत्र्यांकडून चिपळून पोलीस स्टेशनला फोन केला नी याची कसून चौकशी करा. हयगय कराल तर ध्यानात ठेवा. असा सज्जड दम मारून...

पण हे धुमशान संपेल असे काही वाटत नव्हते. त्याला वेगळेच वळण लागले. १५० लोक जेलमधे तेव्हा आप्पासाहेब मुंबईला. ते ताबडतोब निघणार होते गावाला यायला पण कोरोना, कर्फ्यू आणि लॉकडाऊन, दोन

दिवसाने ते गावाला आले, ते प्रथम पोलीस स्टेशनला राव इनस्पेक्टर होते. खरेतर एफ.आय.आर. फाईल झाला होता त्यात १५० आरोपी. इतकी सोपी गोष्ट नव्हती. सगळ्यांना मोकळे करण्याची त्यात तो वळूही आत होता.

जेवढे अधिक गुन्हे एखाद्यावर तेवढी ती व्यक्ती महान असा वाईट पायंडा पोलीस खात्यात होता. कोणालाच जामीन मिळाला नाही. उलट १४ दिवसाचा रिमांड. या पाडणाऱ्यांत इतरच नावे. वळू मोकळा. हा सगळा फार्स पोलीस खात्याचा. त्यानी एफ.आय.आर. मधून गुन्हेगारातून वळूला वगळून इतराना फसवले होते.

आता हा प्रकार आप्पासाहेबांमुळे झाला अशी उलटी बोंब जेलमधून आल्यावर वळूने गावात पसरवली. पण तोंड कोणाचे धरणार ?

आप्पासाहेबांना हल्ली वाटे साला झक मारली आणि या मंदिरात पडलो. काय माहिती होते की असा काही प्रकार भविष्यात उद्‌भवेल. म्हणून, आप्पासाहेब या प्रकाराने पार खचून गेले होते. गावातल्या लोकांना काही काम नसते, शेतीचा काळ सोडला तर, ते सगळे रिकाम टेकडे. आणि आता तर एप्रिल महिना. भाजवणी झालेल्या होत्या. लोक रिकामे आणि आता पावसाळ्यापर्यंत दोन महिने आरामच आराम. गावात ज्याच्या तोंडी एकच विषय, पुतळा प्रकरण... त्या डेबरीज तेथेच पडल्या होत्या. तो रस्ता आप्पासाहेबांच्या दरवाज्यातून जाणारा. तो डेबरीज येता जाताना त्याना दिसायचा जेव्हा त्यांची गाडी तिथून जायची. एक दिवस रात्रीच त्यानी आपल्या दोन साथीदारांना बोलावून तासाभरात तो कचरा उचलून दूर अगदी नजरे आड टाकला.

आता ते सगळे जामीनावर सुटले होते. आणि नव्या धूमशानाची खलबते चालू होती. आप्पासाहेब कंटाळले होते गावाला आणि देवालाही. गाव सोडून दूर जावे असे अनेक वेळा त्यांच्या मनात आले. पण त्यांनी त्यांच्या त्या विचाराला मुरड घातली. हा गाव आमच्या पूर्वजांनी वसवला तो काय सोडायला ?

आता गावातला सगळा समाज विभागला होता गटा गटात. तेव्हा मराठा समाज अल्प मतात. उरलेला सगळा समाज रयतेचा स्थानिक. आता या सगळ्यांच्या डोक्यातून सारे किलमिश काढायला हवेच तर गाव एक होईल वजा हा वळू. म्हणून त्यानी सगळा गाव मंदिरात जमा केला. नी त्या सभेला १५०

लोक हजर होते.

आप्पा साहेबांनी सर्वांना हात जोडून नम्रपणे अभिवादन केले. लोकही उभे राहीले नी पुन्हा बसले त्या सभेला वळूही होता.

आप्पासाहेबांनी ही सभा बोलावली होती तेव्हा त्यानी सभेला ही सभा कशासाठी आहे हे सांगण्यासाठी ते उभे राहिले आणि वळूने हुल्लड करायचा प्रयत्न केला. पण ताठपणे उभ्या असलेल्या आप्पासाहेबां पुढे त्याने हात टेकले.

''मी काही प्रश्न विचारणार आहे ते श्री..... यानीच फक्त आणि त्यानी त्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. अशी अपेक्षा आणि आम्ही गेली ९ वर्षे हा संघर्ष कशासाठी चालवलाय हेही सांगावे.

''आपण कोणत्या समाजाचे ?''

''मराठा !''

''म्हणजे मराठा समाजाचा तुमच्या या प्रकाराला पाठींबा आहे ?''

''नाही ! सगळ्या नाही !''

''त्यात कोण कोण आहेत ?''

''ते सांगता येणार नाही ! पण जे मला आर्थिक बळ या कामात देतात ते ! तुमच्यातलेच !''

''ठीक आहे नका सांगू !''

''पण ते तुम्हाला आर्थिक पाठबळ कां देतात ?''

''तुमच्या विरोधात !''

''अरे वा ! माझ्या विरोधात ! समजलो मी ! मला सांगा दुसरा सगळा समाज तुमच्या मागे आहे काय ?''

''होय ! रयत !''

''या मंदिरा बद्दल तुला काय माहिती आहे ?''

''हे गावचे देऊळ आहे ! सर्वांचे आहे !''

''हो ते मलाही कळते ! पण हे मंदिर कोणी, कधी बांधले या बद्दल ?''

''नाही ! हे जाणून घेण्याची मला गरज नाही !''

''कां ?'' आप्पा.

''हे गावचे आहेना ! मग गावाच्या ताब्यात द्या !''

''कशाला ? तुम्ही याचे व्यवस्थापन करु शकणार काय ? आहे तुमच्यात ताकद !''

"मग बघता येईल !"

"हा काय खेळ आहे काय ?" आप्पा.

"ते मला माहिती नाही ! मी याना सांगीतले देऊळ तुमच्या ताब्यात देईन म्हणून ! तो "

" काय बापाची पेंड आहे ?"

त्यावेळी तो वळू गप्प बसला.

"तू एवढा नडतो आहेस गेली ९ वर्षे काय हेतू आहे तूझा त्यामागे ?"

"मी रयतेला शब्द दिलाय तूमच्या हातात देऊळ देईन म्हणून !"

"अरे पण या मंदिरासाठी तुझी देणगी काय ?"

"काही नाही ! पैसे नाहीत तर कशाच्या जोरावर आणि कशासाठी या उचापती!"

"राजकारणासाठी ! मलाही पोट आहे ना ! मी काय करावे ! यासाठी हा उद्योग आहे माझा ! लोकांना धरून ठेविन तर विचारतील मला, अन्यथा कोण विचारतो !"

" त्यासाठी या आईला, देवीला नडायचे कारण ?"

"नाही सांगता येत !"

"कोणाच्या सांगण्यावरुन तु हा सारा खेळ मांडला आहेस ?"

"नाही सांगता येत !"

"पण मला माहिती आहे या मागे कोण आहे ते ! तु सांगायची गरज नाही!"

आप्पासाहेबाना सारे उमगले होते आणि उपस्थितानाही समजले होते.

"मग बंधूहो ! सांगा, याचसाठी याची साथ देताय काय ?"

पुन्हा चिडीचूप. १० मिनिटे मध्ये अशीच गेली.

"चला उठा साडेसात झालेयत्, आरत्या आटोपून घेऊ !" आप्पा.

आणि सर्वांनी आरत्या आटोपल्या आणि चालु लागले. पण वळू अजून मागेच रेंगाळत होता.

"आप्पासाहेब ! क्षमा करा मला ! मी चूकलो ! चूकीच्या माणसांचा हात धरला नी स्वार्था पाई नडलो तुम्हा सर्वांना गेली ९ वर्षे. त्याला तुमचेच लोक जबाबदार आहेत तेच तुमच्या विरोधात रसद पूरवित होते ! आणि मला दुसरा काही मार्ग नव्हता!" वळू

"ठीक ! आता तरी सुधार !

''होय! आप्पासाहेब तुमच्या सारख्या देव माणसाला त्रास झाला माझ्यामुळे !'' वळू.

''आप्पासाहेब ! मला वाटते तुमच्या महान कर्तुत्वाचे प्रतिक म्हणून तुमचा पूतळा उभारावा मी म्हणतो !'' वळू

''नाही ! तेवढे मात्र करु नका कृपा करून !'' आप्पा.

''जशी आपली इच्छा ! आप्पासाहेब !'' वळू.

''जाऊदे! झाले गेले विसरून जा ! पण हे धूमशान थांबवा ! नाही तर गाठ माझ्याशी आहे! '' आप्पा.

''होय !'' वळू चरणस्पर्श करतो.

आणि देऊळ बंद करून सर्वजण बाहेर पडले नी घरच्या वाटेला लागले ! विचार करीत आप्पा साहेबांच्या शुद्ध विचारांचा आणि वळूच्या अगतिकतेचा.

आणि धूमशान थांबले कायमचे.

०-०-०-०

# प्रेम आणि भोग

पन्नास वर्षापूर्वीची आमची प्रेम प्रकरणे म्हणजे अजब प्रकार असायचा. दोन्ही बाजूला कुछ कुछ व्हायचे पण कोणी कोणाजवळ बोलणे हे एक दिव्यच असायचे. कोणातरी मित्र-मैत्रिणींच्या मार्फत त्याचा गौप्य स्फोट व्हायचा. सिमीत राहिला तर ठीक आणि घरच्यापर्यंत गेली तर पार वाटच लागायची. सांगता येत नव्हते म्हणून दोन जीव कुडत रहायचे. एकमेकांना नजरे समोर आठवून बाहेर फिरणे मुश्कील असायचे आणि जाणार तरी कुठे भेटीगाठीना लॉकडाऊन, खाणा खूणा व्हायच्या बस् तेवढाच विरंगुळा प्रेमिकांना. आतासारखे मोबाईल, नेट, फेसबुक प्रकार नव्हते. लँडलाईन होती पण भिती, कोणी दुसऱ्याने घरातल्यानी घेतला तर सगळाच बभ्रा राव तो काळच कठीन होता. प्रेम करत रहायचे. आवंढा गिळतात तसे काळजात साठवायचे आणि लग्न वगैरे होणे मुश्कील आणि मग शेवटच्या श्वासापर्यंत जीवापाड जपायचे आणि आठवायचे चेहरे डोळे बंद करून, पण त्यातही थ्रिल होते. ओढ होती, आणि प्रेम पारदर्शक होते. ना शारिरीक ओढ ना पाचकळ बोल. दोघांचेही सारे मर्यादित, नी वडीलधाऱ्यांच्या मर्जीतले आपल्या नाही हं.

त्यात शाळेतली, कॉलेजातली प्रेम प्रकरणे शाळेतच फुलत, तर कधी संपत शाळा संपल्यावर आणि उरायची आठवण करण्यापूरतीच बस आपण उगाच जीव लावून बसायचे आणि प्रतिसाद नसायचा. त्यात कधी धाडस केली तर प्रतिसाद मिळेल याची काही शाश्वती नसायची. आणि त्या प्रेमाची भावनाच जीरुन जायची. कायमची. नव्वद टक्के प्रकरणे एकतर्फीच असायची. त्यात व्हायचे त्रिकोण, चौकोन. साराच विचित्र प्रकार राव.

सिनेमात पहायला मिळायचे तो सगळा फार्सच असायचा, पण थोडा आधार मिळायचा त्यातून मनाला बाकी सगळे ते खोटेच असायचे असे थियेटर मधून बाहेर पडल्यावर पण मन हलके व्हायचे, कल्पनेला पंख फुटायचे आणि गळायचे ही तसेच नकळत. बरे सिनेमातल्या जोड्या त्याच त्याच. पण कधी बदलून, पण भास तोच काळजाला क्वचित भिडणारे. कारण आपल्या कल्पनेच्या चौकटीत न बसणारे पण तरीही पहावे पुन्हा पुन्हा असे. राव तो काळ गेला आणि प्रेमाची पाने सफेद कोरी होती ती गुलाबी होत गेली आणि उथळ पणाला ऊत आला. त्यात पावित्र्य, पारदर्शकता जराही उरली नव्हती. हा

काळाचा महिमा म्हणायचा.

आणि प्रेमाचा स्पर्श झालेल्यांचे स्वप्नातले बंगले बांधणे सुरू व्हायचे. फक्त स्वप्नातचं हं.. डोळ्यात डोळे घालून प्रेम पिण्याचे नशीबी यायचे हातावरल्या बोटांच्या येवढ्यानाच. बाकी उरलेले सगळे काळजात सलणारे, उरलेले आठवणीतच.

बरे प्रेम जपले आणि चार हात झाले तर, ते प्रेम प्रपंच्याच्या रगाडयात कुठल्या कुठे विरुन जायचे अनेक अडचनींना सामना करावा लागायचा. मी बोलतोय ते गरीबांनी, मध्यम वर्गाला स्पर्श केलेला प्रेमिकांचे हं. तो गुलाबी रंगावर थोडयाच काळात उडून जायचा आणि प्रेम विरून जाते. कल्पनेच्या डोंगरावर आणि मग पुढचे जगणे हे ठेचाळत, आसवे डोळ्यात आणून. त्यावेळी ती गुलाबी स्वप्नेही आपले पंख आवरून दूर-दूर निघून जात. नी वाऱ्यावरची वरात निघे प्रेमीकांच्या त्यांच्या वास्तवातील जगण्यात.

कधीकधी असे वाटत प्रेमिकांचे प्रेम हा स्वप्नांचा बुडबुडाच असावा. त्यातले रंगी बेरंगी छटांचे नी स्वप्नांसारखेच तकलादू असते, ते वास्तवापासून पार दूर कल्पनेतल्या स्वप्न रंजनातच. माणसाचे आपले जगणे हे त्याच आसा भोवती मग फिरत राहते आणि त्याचे जहाज बुडाले की ती प्रेमाची भावना घेऊनच तेही बुडूत जाते. पण त्याचे तरंग मात्र पाण्याच्या लाटांवर तरंगत पुढील जन्माची वाट पहात राहतात आणि मग पुन्हा आकार घेतात तसेच उरलेली स्वप्ने, पुढच्या जन्मात याला काही पूरावा नाही. पण आपल्या हिंदू धर्मानुसार पूर्नजन्माला स्थान आहे. पूण्य-पाप या आधारावर पुढे जन्म होते आणि आपले जीवन आनंद दु:ख या नुसार भोगते.

एक गोष्ट मात्र खरी की आपण ज्या पद्धतीने जगतो. पुण्य-पापाची शिदोरी जमा करतो. जीवनभर त्या साऱ्याचा हिशोब याच जन्मात आपल्याला पूरा करावा लागतो. हे सत्य आहे. पण माणसाला अहंकाराची बाधा झाल्यावर या सगळ्यावर पाणी पडते आणि भोगावे लागते सगळ्या गोष्टीची जळमटे.

आपण रामायण, महाभारत यापासून आजवरचा इतिहास अभ्यासला तर सारे ध्यानात येईल की सुख हे कणाऐवढे तर दु:ख डोंगरा ऐवढे मिळते अनुभवायला माणसाला. पण तो ते भोगत असताना वा आनंद उपभोगत असताना मायेच्या दडपणाखाली असतो त्याला कळत असते. पण वळत नसते. त्याच्या कर्मानुसार त्याला फळे मिळतात उपभोगायला एवढे मात्र खरे. पण

माणूस हे जाणेल तेव्हा ना! तो आपल्या नशेत असतो पैशाच्या, ज्ञानाच्या, शक्तिच्या या सर्व नश्वर गोष्टींच्या. या दिर्घकाळ टिकणाऱ्या नसतात. आणि जेव्हा या सगळ्या गोष्टींचा माज उतरतो माणसाचे पाय जाग्यावर येतात आणि मग त्याला कळायला लागते की सारे काय मी ही नश्वर आहे. आणि नशा उतरायला लागतो. मग तो माणूस बनतो.

पण तरीही त्याला भोग स्वस्थ बसून देत नाहीत. अनेक अंशानी त्या माणसाची ओढा–ताण होते. पण ते सगळे भोग जे कर्माच्या मुळे येतात ते भोगावेच लागतात. त्या शिवाय त्याची सुटका नसते. हे सगळे भोग मग तो आनंदाचे असतो. दू:खाचे असोत. अती आनंदातही माणूस आपल्या कर्मापासून दूर जातो म्हणजे दुर्लक्ष करतो. आणि त्याचेही रुपातंर पापात होते. म्हणून नेहमी सावधान म्हणजे स्थिर रहाणे जरूर असते माणसाला.

परमात्म्याच्या भक्तिने, नामस्मरणाने मन स्थिर होते माणसाचे. विस्मरणा पासून तो दूर होतो आणि येणारे भोग टाळू शकतो असे अनेक संतानी सांगीतले आहे. आपल्या अनुभवातून सिद्‌ध केले आहे. पण किती लोक भक्तिला आंगिकारातात? आणि म्हणूनच समाजातली अशांतता, प्रलय येऊन माणसाला नामोहरन करतात पण त्याची जाणिव किती लोकांना असते? हा भोग नव्हे काय?

शशांक माझा मित्र. अगदी जीवस्य कंठस्य. शाळेत आम्ही एकाच बाकावर बसत असू. आठवीपर्यंत त्याचे ठिक होते. अभ्यासात लक्ष होते. पण सारा मामला बिघडला तो नववीत. उल्का नावाची एक सुंदर मुलगी आमच्या वर्गात आली आणि बेटा फसला तिच्या प्रेमात. मलाही याचा मागमुस नव्हता. तो समजला अकरावीत आल्यावर. त्याची अभ्यासाची वेवलेन पार बदलली. अबोल झाला तो. भडाभडा बोलणारा तो पार ढेपाळून गेला. स्वप्नाळू झाला आणि पार बदलून गेला. दहावीला आमचे वर्ग बदलले. आणि त्याचा संपर्क संपला. तो भेटे शाळेत जाताना किंवा घरी परतताना. झटपट चालणारा तो रेंगाळत चालायचा तिचा पाठलाग करीत. मी त्याला अनेकदा विचारले पण उत्तर नाही. मी त्याच नाद सोडला. उल्का वडाळ्याला रहायची. शंशाकही तेथेच म्हणजे त्याच कॉलनीत. अकरावीत आम्ही एकाच वर्गात आलो. आम्ही एकाच बाकड्यावर. मी त्याला बोलते केले. वेडा भडाभडा बोलायला लागला. तो फसला होता तिच्या प्रेमात. अजाणते वय ते. पण आताशा तो सावरला होता.

उल्का दुसऱ्या वर्गात. तो इतका स्वप्नाळू झाला होता की हरवलेला असायचा बेटा. वर्ष संपले. सेंड ऑफ झाला. नी तो एक दिवस मला भेटला.

मग आम्ही भटकत भटकत फाईव्ह गार्डनमध्ये फिरायला गेलो. तेव्हा त्याने सारी कथा मला सांगितली.

''अरे ! नारायण. मी पुरता फसलोय रे त्या उल्केच्या प्रेमात. पण तिच्याशी गेल्या तीन वर्षात संपर्क नाही. आता शाळा संपली पुढे ती भेटेल की नाही भरोसा नाही. वेडा व्हायची वेळ आली आहे !'' तो.

''मग तू भेट की तिला, कशाला उगाच तळमळत रहायचे. 'एक घाव दोन तुकडे' ती नजरेला नजर देते ना तुझ्या. तुझ्या समोरच्या इमारतीत रहाते. भाऊ भेट तिला किंवा पत्र पाठव !'' मी.

''हो ! हे छान !'' तो.

आणि त्याने तिला पत्र पाठवले. ते पडले वडिलांच्या हातात. झाला ना घोटाळा. त्याच्या घरात, तिच्या घरात मग महाभारत.

मला नंतर समजले हे त्याच्याकडूनच. मधल्या काळात अनेक स्थित्यंतरे झाली. प्रत्येकाचे रस्ते वेगळे झाले. काही कॉलेजमध्ये गेले. काही नोकरीच्या शोधात नी संपर्क संपले.

एकदा तो मला ट्रेनमध्ये भेटला नी मला सोडायला तयार होईना. ता नेव्हीच्या ऑफीसला अन् सचिवालयात. दोघांच्याही ऑफीसच्या वेळा वेगळ्या. पण अधिवेशन होते म्हणून मी लवकर जायचो. अधिवेशन संपले. आणि शशांकने मला गाठले. एक दिवस सकाळी चर्चगेटला. मला तसा ऑफीसला जायला अवकाश होता. मग आम्ही चर्चगेटच्या समोरच्या वेलकममध्ये गेलो. तो म्हणाला, 'नारू, तू नेहमीच घाईत, आज कॉफी घेऊ या की !' मला नाही म्हणता येईना आणि मग हॉटेल गाठले.

त्यानेच कॉफीची ऑर्डर दिली. खूप गर्दी होती हॉटेलात. विरार पासून लोक यायचे या हॉटेलात. नाष्ठा करायचे आणि चहा कॉफी घेऊन कार्यालयात जायचे. जास्त वेळ लागला कॉफी यायला.

''अरे, तूला !'' तो.

''काय बोल !'' मी.

तूला खूप काही सांगायचे आहे रे. पण सुरुवात कोठून करावी समजत नाही?'' तो.

''बोल बिनधास्त !'' मी.

''अरे ते उल्का प्रकरण ! जीव लावला मी तेव्हा आणि आता माझा जीव जायची वेळ आली आहे !'' तो.

''काय झाले ते सांग ना !'' मी.

तो थोडा वेळ हरवून बसला आपल्या विचार चक्रात.

''काय रे ! ती आठवली काय ?'' मी.

''होय रे ! छळतेय मला रात्र दिवस. नजरेसमोरून हटत नाही ! ती आता आहे कुठे, काहीच पत्ता नाही ! एकदा या हॉटेलच्या इमारतीत जाताना दिसली. ..... चे ते ऑफीस ! पण डेरींग होईना रे तिला हाक मारायची, पाहतच राहिलो मी.'' तो.

''मग जायचे तिच्या मागे !'' मी.

''अरे काय ! एवढे गट्स असते ना तर गटवली असती रे !'' तो.

''तुझे वय काय रे आता ?'' मी.

''पन्नास.'' तो.

''म्हणजे मध्ये ३५ वर्षे गेली !'' मी.

''होय रे नाही विसरता येत तिला !'' तो.

''लग्न केलेस ना ?'' मी

''हो ! तीन मुले आहेत. मोठा मुलगा आता कॉलेजमध्ये जातोय!'' तो.

''मग एक काम कर ! सोड तिचा नाद आणि आपल्या प्रपंचात मन रमव !'' मी.

तो गप्पच राहिला. त्याच्या अंग विक्षेपावरून तो निघणार असे वाटले मला. कॉफी संपली होती. तो उठला. मी ही.

''नाही रे चैन पडत तिच्या शिवाय!'' तो.

एवढेच तो म्हणाला आणि काऊंटर वर पैसे देऊन मला न पहाता. तरातरा निघाला व मी त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पहातच राहिलो.

मी म्हटले काय वेडा माणूस आहे हा. पण एवढे मात्र खरे तो पूर्णपणे बूडाला होता तिच्या प्रेमात. एवढे मात्र जाणवले.

माणसाने अशी प्रकरणे घेऊन नसते नासवायचे आपले आयुष्य. विसरायला शिकले पाहिजे. मन हे चंचल भंग्यासारखे. काही भरोसा नसतो त्याचा, कोठे जीव लावील. तूम्ही सावध असून उपयोगाचे नसते हो. होणार ते होणार. कधी

त्या किनाऱ्यावर तर कधी त्या किनाऱ्यावर फसणार कोणी तरी. तसेच शशांकचे झाले.

मधल्या काळात म्हणजे १५ वर्षात त्याची गाठभेट नव्हती. तोही निवृत्त, मी ही निवृत्त झालो. पंचाहत्तरीला आला. पार सुकलेला, चिपाड झालेला. मी त्याला म्हटले, ''आता डिनर करूनच जायचे हं !''

''हो'' म्हणाला तो पण.... आवाजात काही दम नव्हता. थांबला तो आणि त्या हॉलमध्ये चेहरे न्याहाळत बसला... विचारात गुंग होता.

''नारू ! अरे आपण आपल्या बॅचच्या विद्यार्थ्यांचे गेट टूगेदर घेऊ या का?''

''का नाही, खरचं आयडीया चांगली आहे. सगळे जुने चेहरे भेटतील आपल्याला ?'' मी.

आणि त्याच्या चेहऱ्यावरची कळी खूलली. तो आशावादी झाला. ती येईल म्हणून पण महत् प्रयासाने ७-८ मुलांशीच संपर्क झाला. त्यात ती नव्हती.

''उल्काला नव्हता मॅसेज केलास ?'' तो.

''नाही. पत्ता वा फोन नाही मिळाला.'' मी.

याचा चेहरा पडला आणि न थांबलाच तो निघून गेला...

पाच वर्षे होऊन गेली. तो नाही दिसला, पण राहीला आठवणीत. जेव्हा जेव्हा मी आठवतो त्याला... कोठे असेल, की नसेल या जगात !

पण त्याची आठवण नाही विसरता आली आणि तिचीही.

कदाचित सगळ्या आठवणी. काळजातील प्रेमाची कुछ कुछ जाणीव शेवटी प्रयाण करील. पुढील जन्मी भेटण्यासाठी आणि ती छळीत राहिल त्याला... असाच ..... अगदी असाच !!

०-०-०-०

# विस्मृतीच्या वाटेवरुन

शंकराचा शंकरराव कधी झाला हे त्याला कधीच समजले नाही. साठी गेली, सत्तरी गेली आणि आता नऊ इंद्रियेही पार एकवटून आकसवली होती. डोळे अधू होत गेले. ऑपरेशन केली, चाळीशी नाकावर घट्ट बसली होती पण या वयाच्या उंबरठ्यावर आपल्यावर आता एका नव्याच समस्येने त्यांना ग्रासले होते. ती म्हणजे विस्मृती. कधी कधी आठवणींचा बोळ स्पष्ट प्रकाशमान जाणवतो, कधी कधी चार भिंतीत कोंडल्यासारखा. नाही आठवत काहीच अगदी कोऱ्या पाटी सारखा ...

''अगं ये सुमे ... मला औषधे सापडत नाहीत ! जरा काढून तरी दे. नाष्ट्याचीही वेळ झाली आहे. दहा वाजायला आले ! जरा लवकर दे हं !'' शंकरराव.

''जरा थांबा हं ! मी किचनमधून आल्यावर देते.'' सुमी.

''नाही अगं माझा बीपी वाढेल. मला डायबीटीज आहे याची तरी जरा जाणीव ठेवा. साला कोणी ढुंकूनही पहात नाही माझ्याकडे !'' मला काही होत नाही. आम्हालाही नाही, थोड्या वेळा पूर्वीची घटना ! मेहेरबानी कर माझ्यावर सुमी !'' शंकरराव.

सुमिता किचन मधले काम आटोपून तरातरा आली...

''हा काय? तुमच्या बाजूलाच आहे की, आणि मला चांगले आठवतयं तुम्ही गोळ्या घेतल्यात हो. सकाळी, नाही कसे आठवत तुम्हाला. हे पाणी प्या आणि देवाचे स्तोत्र म्हणा. वेळ टळून जायला नको.'' सुमी.

''अग पण मला काहीच कसे आठवत नाही हे!''

''देवाला माहीत. गेले दोन महिने तुम्ही असे सैर भैर झालाय, कसे होणार माझ्या मागे काहीच कळत नाही हो !'' सुमी.

शंकरराव गप्पच होते. काहीच बोलले नाहीत. पण हल्लीच हे सारखंच होऊ लागले होते. दोन तासापूर्वी काय केले त्याचेही त्यांना स्मरण होत नव्हते. घरात या गोष्टीचा सर्वांना त्रास होत होता. त्यांनी पाणी प्यायला मागितले तर ते कोणीतरी आणून देई पण ते प्यायचे टाकून पुन्हा पुन्हा पाण्यासाठी ओरडत बसत व आवाजही चढवत. ''कोणाला माझी पर्वा नाही. मी मेलो तर बरे ! तुम्हाला तेच हवे आहे. म्हातारा उलथला की तुम्ही मोकळे. माझे घर लाटायला !''

शंकरराव.

सकाळची वेळ होती. मे महिना होता. मुलांना सुट्टी असल्याने मुले व नातवंडे गावाला गेली होती. मुंबईच्या घरात फक्त शंकरराव आणि त्याची पत्नी सुमी, दोघांच्या संसाराचे सारे काही ठीक चालले होते. दररोज सुमी त्यांची त्या दिवसाची घ्यायची औषधे काढून ठेवी एका वाटीत व ते सगळी औषधे घेत.

त्या रविवारी मात्र मोठा घोळच झाला, शंकररावांनी वाटीत काढलेली औषधे घेतली. पुन्हा त्यांना शंका आली सुमीने बीपीची गोळी दिली का ? ते उठले बीपीची गोळी काढली आणि घेतली. झाले ! बीपी लो झाला आणि ते हातपाय झाडायला लागले सुमी घाबरली. डॉक्टरांना फोन केला. मुलांना फोन केला. हा गोंधळ गावाला कळवला. डॉक्टरांनी औषध दिले मग दोन तासाने शंकरराव ठीक होत गेले. पुन्हा त्यांना ग्लानी आली आणि सारेच चलन वलन थांबले. ह्यांना जाग येईपर्यंत मी जाणार नाही. त्याची अवस्था बिकट आहे. म्हणून त्यांना अजून एक इंजेक्शन दिले. मग मात्र तासाभराने त्यांना जाग आली.

''अग सुमे, जेवायला वाढ ! वेळ होऊन चाललाय ? कोठे आहे?'' शंकरराव.

''अहो मी इथेच आहे की. आता चार वाजले दुपारचे. तुम्हाला चक्कर आली होती. तुम्ही बीपीची गोळी पुन्हा घेतली होती असे डॉक्टर म्हणत होते'' सुमी.

''नाही गं कसे शक्य आहे? मी व्हिटामीनची गोळी घेतली होती!'' शंकरराव.

आता मात्र घरच्यांनी ठरवले की कोणतेही औषध त्यांच्या हाती लागणार नाही याची काळजी घ्यायची. आता सुमीच त्यांना औषधे स्वतः देत असे व ती घेईपर्यंत ती त्यांच्या बाजूला बसत असे.

या सगळ्या गदारोळात दोन तीन महिने गेले. पावसाळा सुरु झाला होता. आता बाहेर कमालीचा गारवा. शंकरराव अंगात स्वेटर घालून रहात असत. मात्र त्याचे दिवस भराचे सारे काही सुरळीत चालले होते. आता ते पाऊस थांबताच सकाळी त्यांच्या कॉम्प्लेक्समध्ये चक्कर मारीत असत.

त्यांच्या कॉम्प्लेक्समध्ये त्यांनी एक सिनीयर सिटीझन मंडळाचीही स्थापना केली होती. त्या सभेलाही ते आता हजर राहू लागले होते. इतर लोकांच्या सहवासात. सकाळच्या फिरण्याने शंकररावांचे मन उल्हसित होत होते. मित्र

मंडळीतील गप्पा टप्पात वेळ जाई आणि घरात आल्यावर झोपही छान लागत होती. दोघांचा वेळ एकमेकांच्या सहवासात छान जाई.

आता खरे तर शंकररावांना सावरल्या सारखे वाटत होते. पण वाढत्या वयाच्या उंबरठ्यावर आजूबाजूला घडणाऱ्या घटनांनी अस्वस्थ व्हायला होत होते. मुड जातो पार नि पुन्हा मुळ पदावर आल्याची जाणीव आपल्याला कमी पण इतरांना अधिक होते. हे टाळताही येत नाही. अशी त्यांची अवस्था झाली होती.

शंकररावांचे एक मित्र ९४ वर्षाच्या वर्षी गेले. खूप दुःख झाले त्यांना आणि त्या आठवणींच्या झटक्याने त्यांचे संतुलन बिघडले. त्या मित्रांची आठवण त्यांना येई आणि डोक्याला ताण येत राही. अनेक वेळा ते हरवून जात स्वतः त्यांच्या आठवणीत हे असे ३/४ महिने चालले होते. खूप समजावले मित्रांनी तेव्हा कोठे त्यांच्या डोक्यातून ते भूत उतरले.

आणि एक दिवस त्यांना त्यांच्या पुर्वायुष्याच्या अनेक घटना स्पष्ट दिसू लागल्या. ते पूर्वी सैनिक होते. दुसऱ्या महायुद्धात त्यांचा सहभाग होता आणि ते सारे त्यांना स्पष्ट आठवायला लागले. त्यातही मुलांना सांगितले आणि मुलांनी या परिस्थितीतून बाहेर काढले आणि ते बरे झाले. त्यासाठी त्यांना लिहिते केले.

शंकरराव झपाटल्यासारखे झाले, ते लिहू लागले. त्या युद्धाच्या घटनांची उत्तम नोंद करुन मुलांना दिली. खूप आनंद झाला मुलांना आणि शंकररावासही. आता सगळ्या डिप्रेशनमधून बाहेर आले होते. मुलाने त्या माहितीच्या अनुशंगाने अनेक प्रश्न विचारून त्या लिखाणाला छान लूक देऊन एक पुस्तकच काढले. शंकररावांना हे आपण कसे काय करू शकतो. मुलांना ही आश्चर्य वाटले. आणि विस्मृतीतून हे बाहेर आले हा धक्का त्यांना पुन्हा वाटेवर घेऊन आला उर्वरित आयुष्य सुखाने जगण्यासाठी.

०-०-०-०

# पूर्नर भेट

सकाळची वेळ होती. कासराभर सुर्य वर आला असेल, आगोटचे दिवस, माणसे कामा-धंद्याला सकाळीच निघून गेली होती. घरात होती ती एकटी गंगू. ती आता भाकरी तुकडा करणार नी जाणार शेतात. तिच्या मागे तिची जाऊ अगोदरच दिरा बरोबर पोहचली होती. शेतात पेरा झाला होता नी उकल चालू होती. तसे पाहिले तर आकाशात ढग जमा झाल्याने बाहेर फारसा उष्मा नव्हता. म्हणून बैला नाही आराम होता. नाही तर बिचाऱ्यांचे हाल पहायला नकोत. पाणी थपथप गळायचे पाठीवरुन त्यांच्या. येवढ्यात गावातलेच चारपाच लोक, मिलीट्रीचे दोन शिपाई महादेवची मिलीट्रीची बॅग घेऊन आले.

गंगुच्या ध्यानात काहीच आले नाही. ती मंडळी टेकली, मग गावातले पुढे आले आणि त्यानी गंगूच्या हातात एक लखोटा दिला.

''ही तूमच्या नवऱ्याची बॅग, आणि हे त्याच्या पेन्शनचे पेपर तूमच्यासाठी. यावर सही करा आणि या आलेल्या शिपायाकडे द्या.'' एक गाववाला.

''यह आपके हजबंडकी बॅग है ! वह वॉरपर थे ना, पता नही उनका ! शायद वह मर गये होंगे ! चार साल हुये ! कही भी पता नही! इसलीये यह उनकी संदूक और पेन्शन के पेपर ले के आये है हम ! कृपया इस पर दस्तखत दिजिये !'' सैनिक.

गंगू पुरती गोंधळली होती.

''आणि माझा नवरा कुठे आहे ?'' गंगू

तिला त्या सैनिकांनी हिंदीत काय सांतितले समजले नाही. मग गावालाच एक निवृत्त सैनिक पुढे आला.

''तो आता येणार नाही... कधीच!'' गाववाला.

''म्हणजे ?'' गंगू

''म्हणजे काय सांगणार ? तो वॉरमध्ये मयत झाला असावा ! म्हणून ही बॅग आणि तुला पेंशन साठीचे पेपर या शिपायानी आणले आहेत !'' गाववाला.

आणि गंगूने हंबरडा फोडला. त्यामुळे आजू बाजूच्या घरातले पूरूष, बाया जमा झाल्या. कोणी तिच्या दिराला बोलवायला शेतात गेले. गंगूने जमिनीवर लोळण घेतली. सारा गाव हादरला या घटनेने.

आलेले गावातले आणि सैनिकही बावरले. काहीही करुन गंगूची सही वा

अंगठा घेऊन या असे इथल्या कमांडींग ऑफीसरने सांगितले होते. प्रसंगच तसा बाका होता. कोणीही पुढे व्हायला तयार नव्हता. गंगू ओक्साबोक्सी रडत होती. तिने हात आपटून आपल्या बांगड्याही फोडल्या, त्या हाताला लागल्याही रक्त बंबाळ झाले होते तिचे हात. तिचा दिर व जाऊ आले नी त्यानीही हंबरडा फोडला. सारे वातावरण दु:खाच्या छायेने व्याकूळ झाले होते.

येवढ्या दोन-तीन गावातल्या बाया पुढे आल्या. सगळ्यांचेच डोळे पाणावले होते. त्या बायानी गंगुला, पडवीतून ओट्यावर आणून झोपवली. ती बेशुद्धच पडली होती. पाण्याचे चार सपकारे मारल्यावर तिने डोळे उघडले, पण पुन्हा गपकन मिटले. सगळेजण घाबरले. काय करावे कळेना. त्याकाळी गावात कोणी डॉक्टर नव्हता. होते ते तालुक्याला पण गावातल्या एका या वैद्याला बोलावले.

''हिची नाडी ठीक चाललेय, बेशुद्ध आहे. घटकाभराने दु:खाचा कड वसरला की ती येईल शुद्धीवर!'' वैद्य.

त्यांनी चाटण दिले ते तिच्या जीभेला लावताच गंगूने डोळे घडले आणि पुन्हा तिने हंबरडा फोडला. हा सगळा प्रकार तीन तास चालू होता. गाववाले आणि आलेले सैनिक अंगणात बसून होते. शेवटी एका माजी सैनिकाने त्या लखोट्यावर गंगुचा आंगठा उठवून घेतला आणि ते आलेले सैनिक निघून गेले.

हा घोळ संध्याकाळ पर्यंत चालू होता. गंगु ही आला शुद्धीवर आली होती. पण तिचे रडणे काही थांबत नव्हते. कोणी नवीन तिला भेटायला आले की तिला कढ येई, नी डोळ्यातून पाण्याच्या धारा लागत. त्या रात्री घरात सगळी माणसे उपाशीच झोपली. शेजाऱ्यानी काही आणून दिले पण कोणी तोंडही लावले नाही.

संध्याकाळी गंगुच्या जावेने एक समई लावली व तिचे तोंड दक्षिणेकडे करून ठेवले.

तशी प्रथा होती कोणी गेले घरातले तर एक समई लावीत असत. आजच ही बातमी समजली म्हणजे महादेवाचे म्हणजे तिच्या नवऱ्याचे दिवस आजपासून धरायचे अशी प्रथा होती. मग दहाव्या दिवशी व मग बारावे व तेरावे अशी प्रथा होती. आता ४ वर्षापासून महादेव बेपत्ता आहे. म्हणजे तो वॉरमधे मारला गेला असेल वा त्याला जर्मन-इटलीमध्ये बंदिवान केले असेल. म्हणून भारत सरकारने जे नुकतेच स्वतंत्र झाले होते. या सैनिकांच्या बॅगा घरोघर पाठविल्या

होत्या. त्यात महादेवाची बॅग घरी पोहोचती केली.

चार वर्षा पूर्वी महादेव रजेवर आला होता. एक महिन्याच्या आत लग्न ठरले, झाले नी आठच दिवसात त्याला पुनः हेडकॉर्टरला म्हणजे बेळगावला येण्याची तार आली. नवी नवेली गंगूचा प्रपंच सुरू होण्याआधी आलेल्या आफतीने सगळे घरच हादरले. पण नोकरी आणि तीही ब्रिटीश सरकारची. कडक आणि महादेव दोन दिवसानी बेळगावला निघून गेला. तो मराठा इनफ्रंट्रीच्या ५ व्या कमांडमध्ये सैनिक होता. आणि दोनच दिवसांनी त्याना मुंबईहून येडनला पाठविण्यात आले नी दूसरे महायुद्ध सुरु झाले. सूरुवातीला महादेवाची १/२ पत्रे आली पण मग संपर्क तुटला. मात्र दर महिन्याला गंगुला येणारी फॅमिलीची रक्कम मात्र घेऊन पोष्टमन घरी यायचा, पण पत्र वगैरे काही नसायचे.

त्या गावातले अनेक लोक मिलीट्रीत होते. वार सूरू झाल्याच्या बातम्या कानावर येत असत पत्र व्यवहार बंद होता. पण कोणी सैनिक रजेवर आला तर मात्र बातम्या कळत गावात. त्यावेळी वर्तमान पत्र नव्हते. रेडीओवरही काही सांगत नव्हते. सारेच गुलदस्त्यात. त्यात गंगु अशिक्षीत. शिक्षणाचा पत्ता नव्हता. म्हणजे तेव्हा शाळाच नव्हत्या लहान गावात. पंच क्रोशीत एखादी शाळा असे आणि मुलींना कोणी पाठवीत नसे. मग लग्नाला झाली की लग्न लावून देत आई बाप. तसे गंगुचे झाले होते.

गंगुचा नवरा नोकरीवर गेल्यावर ती दिर व जाऊ तसेच तिची दोन मुले येवढीच माणसे घरात होती. दिर शेती करी. आणि सगळे कुटुंबच मग शेतात राबायचे, लग्नानंतर दोन महिन्यानी गंगुला ही शेतात जावे लागले. कारण हे शेतकऱ्याचे घर होते. शेतात पिकेल त्याचाच सगळ्या कुटुंबाला आसरा होता. आणि गंगुला येणाऱ्या कमाईवर... इतर खर्च भागवायचा. जरी गंगुचा नवरा कमावत होता तरी कष्ट करण्याशिवाय पर्याय नव्हता.

महादेव युद्धावर गेल्यावर एक वर्ष होऊन गेले होते आता आपला नवरा कधी येणार याच विवंचनेत गंगु असे. रात्र दिवस त्याचाच ध्यास तिला लागला होता. नवे नवेलीचे नऊ दिवसही लग्नानंतर महादेव बरोबर संसार झाला नाही. आणि तेवढ्यात बुलावा आला. तिच्या दु:खाला पारावार नव्हता. आता केव्हातरी तो येईल दोन महिन्यांच्या रजेवर याच आशेवर ती एक एक दिवस महादेवच्या येण्याकडे नजर लावून बसली होती. तिचा दिवस घरकामात, शेतात

जाई पण रात्र मात्र काढणे तिला कठीण जात असे. महादेवाचा चेहरा आठवून ती भडाभडा रडे. आसवांचे डोह होत नी केव्हा तरी रात्री डोळा लागे तेवढाच.

गेल्या दहा दिवसात गंगुच्या पोटात अन्न गेले नाही. ती पुरती कृश झाली होती. डोळे खोलवर गेले होते. एखाद्या कट पुतळी सारखी गंगुची अवस्था झाली होती. आता तिच्या अश्रूंचे ओहळही पार आटून गेले होते. सारे आयुष्य महादेवाच्या सानिध्यात घालवण्याच्या शपथाही ती आता विसरुन गेली होती. आता सारे संपले होते. अशावेळी परमात्म्याने मरण द्यावे. कारण महादेवाच्या पश्चात वैधव्याचे सगळे आयुष्य जगणे तिला शक्य नव्हते. एक एक दिवस एका वर्षा सारखा वाटत होता तीला.

महादेवाचे दशपींड, सपेंडी व कार्य ही आटोपले त्यानंतर तिचा पदर उतरण्याचा कार्यक्रम नातेवाईकांनी आटोपला. आता ती घरातून बाहेर पडत नव्हती. नव्हे तिची इच्छाच होत नव्हती. दिवस आणि दिवस ती बसून राही. नजर आढ्याकडे लावून. आता पुढचे आयुष्य कसे जाईल या विवंचनेत. आता घरचे दिर, जाऊ तिला कशी वागणूक देतील. आता ती परावलंबी झाली होती. परित्यक्ता झाली होती. समाजाच्या दृष्टीने तिचे अस्तित्व शून्य झाले होते. आता या तरूण मुलीकडे बघण्याचा जगाचा दृष्टीकोनही बदलेल. एक भोग वस्तू म्हणून आणि कपाळ करंटी म्हणून तिची निर्भस्तना होईल. बाहेरच्यांची ही अवस्था तर  घरच्यांचे काय ?

महिना दोन महिने मध्ये गेले. तिच्या माहेरचे लोक तिला न्यायला आले. पण तिने साफ नकार दिला. ते निघून गेले. ती  निघून माहेरी जावी अशी दिराची इच्छा होती. कारण आता घरच्या जमिनीचे विभाजन होऊ शकते तेव्हा ही ब्याद गेलेली बरी असे दिराला नी जावेला वाटू लागले. पण खरेतर हा विचार गंगुच्या मनाला कधीही शिवला नाही, उलट हे घर माझे आहे आणि याच घरात उर्वरीत आयुष्य घालवावे असेच तिने ठरविले होते. एखादे मुल असते तर त्याच्या आधाराने तिला पुढचे आयुष्य जगणे ठीक झाले असते. पण ते भाग्यही तिच्या नशिबी नव्हते. आता दिराची मुले ही आपलीच आहेत असे मानून त्यांच्या सहवासात तिने उर्वरीत आयुष्य काढायचे हे तिने मनोमन ठरविले होते. तिचा सारा दिवस नवऱ्याच्या महादेवाच्या आठवणीत जात होता.

आता आपल्याला आपल्या पायावर उभे रहायला हवे. अशिक्षीत राहून चालणार नाही म्हणून तिने तिच्या मोठ्या दिराच्या मुलाकडून मुळाक्षरे शिकणे

सुरु केले होते. सहा महिन्यात ती वाचू लिहू लागली होती. स्वत:ची सही करुन पेंशन घेत होती. एका शहिद सैनिकाची पत्नी म्हणून नव्याने निर्माण झालेल्या माजी सैनिक संस्थेत ती सभासद झाली होती. तिला अनेक प्रस्ताव सरकार कडून आले. सरकारी खात्यात शहिद पत्नी म्हणून नोकरी वा सैन्यात नव्याने स्त्रियांच्या फलटणीत भरती होणे आणि गंगुने ते स्वीकारले व ती स्त्रियांच्या फलटणीत गेली. भारत सरकारने अशा अनेक विधवांना या नव्या फलटणीत सामावून घेतले होते. त्यांना रोजगार दिला होता व परित्यक्ता-परावलंबीच्या जीवनातून जगण्याचा सुकर मार्ग दाखविला होता.

त्या नोकरीतून वर्षाला मिळणाऱ्या दोन महिन्याच्या रजेवर ती आपल्या घरी येई. तिने तिच्या दिराच्या लहान मुलाला दत्तक देण्याची विनंती दिराला केली होती. पण सध्यातरी त्या गोष्टीला त्यांचा दुजोरा नव्हता. तरीही तिला आशा होती आज ना उद्या दिर तयार होईल. त्याला आपण चांगले शिक्षण देऊ. त्याच्यासाठी सारे काही मी करीन. पण दिराच्या डोक्यात वेगळेच काही शिजत होते. त्याला त्याच्या दोन्ही मुलांना तिच्याकडे पाठवायचे होते. येथे गावात सोई नाही पुढच्या शिक्षणाच्या म्हणून दोन्ही मुले गेली तर त्याला हवीच होती. पण ती एकाच मुला बद्दल आग्रही होती. शेवटी तो प्रस्ताव तसाच राहीला काही काळ. तिच्या दिराची दोन मुले अनिल मोठा आणि सुनील छोटा. अनिलचा ओढा पहिल्या पासून गंगुकडे होता. पण ७ वी होई पर्यंत त्यालाही त्याच गावात राहणे भाग होते. शेवटी हे दत्तक प्रकरण तसेच राहिले. आपले मुल वाढवण्याचे तिचे स्वप्न आज तरी धुसर झाले होते. गंगुनेही एक खेळी खेळली. तिने महादेवाच्या प्रापर्टीचा अर्धा हिस्सा दिराकडे मागीतला. तो त्याला द्यावाच लागला. आता तिची पोष्टींग बेळगावलाच होती. आणि कोकणात कणकवली येणे कोल्हापुर मार्गे खूपच सोईचे होते. गंगुने एक वर्षी आपल्या वाट्याची जमीन ओसाडच ठेवली. दिराला वाटले ही बया आता ती जमीन विकून टाकील आणि आपल्या हिश्यात आता दोन मुले काय करणार? दिराने अनिलला तू दत्तक घे असे पत्र पाठविले म्हणजे जमीन घरातच राहिल आणि आपल्या मुलाला मिळेल या आशेने हे प्रकरण निकालात काढले व गंगुने त्या मिळकतीला दुसरे नाव अनिलचे लावले. सध्यातरी वादळ शमले होते.

महादेवाची बातमी समजली त्याला आता चार वर्षे होऊन गेली होती. गंगु आपल्या नोकरीत, अनिलही आता बेळगावला, तिच्याकडे शिक्षणासाठी

आला होता. सारे काही सुरळीत झाले होते. गंगुला पुन: विवाह करण्याचे अनेक प्रस्ताव आले पण तिने ते धुडकावले. आणि महादेवाच्या स्मृतीतच रहायचे कबूल केले.

नुकतेच भारताला स्वातंत्र्य मिळाले हे एक प्रजासत्ताक स्वतंत्र राष्ट्र म्हणून यू.एन.ओ.ची मान्यता मिळाली होती. युद्धाचा शेवटही झाला होता नी कैद्यांची देवाण घेवाण सुरु झाली होती. प्रत्येक देशात अशा कैद्यांना सुपूर्द केले जात होते. त्यांच्या याद्या त्या त्या देशाच्या प्रमुखांकडे आल्या होत्या. त्यात भारताच्या अनेक देशात अडकून पडलेल्या सैनिकांची यादीही आली. पण जर्मनीने अजून आपली यादी दिली नव्हती. एक वर्षभरानंतर ती यादी आली व भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयाने ती यादी त्यांच्या हेडकॉर्टस्‌ला पाठविली.

अशी यादी येणार व जीवंत सैनिकांची सुटकाही होणार ही बातमी गंगुला बेळगावच्या कमांडींग ऑफिसरकडून समजली. तेव्हा तिची पोस्टींग कर्नल पालांडे या अधिकाऱ्याच्या ऑफिसमधे होती. चौकशी करता कोणीतरी महादेव कदम असे एक नांव त्या यादीत असल्याचे गंगुला कळले. हे सर्व सैनिक दोन तीन महिन्याने बेळगावच्या आपल्या हेड कॉर्टरमधे येणार अशी खात्रीलायक बातमी गंगुला मिळाली. त्या नावात वडीलांचे नांव नव्हते. त्यामुळे गंगु बुचकळ्यात पडली होती.

दोन महिन्याने ते सैनिक बेळगावला आले. तुरुंगात असल्याने त्यांचे चेहरे मोहरे बदलले होते. अमानुष वागणूक त्यांना दिली जात होती. महादेवचीही तिच अवस्था होती. भारतात आल्यावरच दोन घास सुखाचे त्यांना खाता आले. त्यात जर्मनीतून हरलेला त्यामुळे त्यांच्यावर अनेक बंधने. त्यामुळे या कैद्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले. पोट खपाटीला गेलेली, केस वाढलेले, दाढ्या वाढवलेले असे सैनिक बेळगावात दाखल झाले. हे सैनिक जीवंत असून येथे आले आहेत अशी तार गंगुच्या गावी गेली पण ती नसल्यामुळे ती परत गेली. तिच्या दिराला हा काही तरी फार्स असावा असे वाटले आणि या बातमीकडे त्याने दुर्लक्ष केले. एक दिवस या सर्व सैनिकांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना कमांडमध्ये पाठविण्यात आले. महादेवला त्याच्या नं.५ च्या कंपनीमध्ये पाठवण्यात आले. ज्या कंपनीमध्ये ते होते.

गंगुला या महादेव कदमचा शोध अजून लागला नव्हता. तो येथे आल्याला एक महिना होऊन गेला होता. आता महादेवला ओढ लागली होती ती त्याच्या

पत्नीला गंगुला भेटण्याची गावी जाऊन. भारत सरकारने या सर्व सैनिकांना त्यांचा युद्धाच्या काळातला पगार दिला व सर्वांना दोन महिन्यांची रजा जाहिर केली. एक एक करुन सर्व युद्धावर गेलेले व परत आलेले सैनिक कंमाडींग ऑफीसर ब्रिगेडीयर पालांडे यांना भेटण्यास येऊ लागले. त्यात महादेव कदमही होता. त्याच ऑफिसमधे गंगु होती शिपाई म्हणून. पहाऱ्यावर ती मिलीट्रीच्या ड्रेसमधे होती व डोक्यावर कॅप होती... तिने पाहिले महादेवसारखा एक हवालदार त्या लाईनमधे होता. एका एकाचे नाव पुकारत त्याना ती आत सोडीत होती. तिने महादेवचे संपूर्ण नाव पूकारले महादेव गणपतराव कदम आणि ती चरकली तो तिचाच नवरा होता. पण ओळखू येत नव्हता. तिने त्याला आत सोडले व मागून ती पालांडेच्या कॅबीनमधे गेली....

महादेवने खाली सॅल्यूट दिली व दोन पावले तो मागे सरकला....

"सर हेच माझे पती !" गंगु.

"काय ? महादेव..." नाही शक्यच नाही. ती अशिक्षीत गावाला असणार? तीही कशी होऊ शकले !" महादेव.

"सर ! मी येथे आल्याची काहीच माहिती याना नाही! ते गेले असेच आम्हाला वाटले ! आम्ही यांचे सगळे संस्कार केले...!" गंगु.

"आश्चर्य आहे !" कमांडर.

"ते हेच आहेत सर !" गंगु

"सर ! तुमची परवानगी असेल तर, मी माझी टोपी काढली तरच याना माझी ओळख पटेल !" गंगु.

"ओके !" कमांडर.

आणि तिने टोपी काढताच तिच गंगु आहे याची खात्री महादेवला पटली आणि अशी पुर्न भेट होईल असे त्याला वाटले नव्हते. मग त्या दोघांनी कमांडर पालांडे यांना नमस्कार केला व ती कॅबीन बाहेर आली.

गेली १०/१५ मिनिटे ती दोघे कमांडरच्या कॅबीन मधे होते. बाहेर बरेच सैनिक आत जाण्याची वाट पहात होते. गंगू बाहेत येताच तिने एका एकाला आत सोडले. तोवर महादेव बाहेर तिची वाट पहात उभा होता. ते काम संपताच कमांडरची परवानगी घेऊन गंगु बाहेर आली व महादेव सह निघणार येवढ्यात ब्रिगेडीयर पालांडे बाहेर आले.

"गंगु ! तु थांब मला तुम्हा दोघांशी बोलायचे आहे!" कमांडर.

'' येस सर!'' म्हणत तिने कमांडरना एक सॅल्युट ठोकला. आणि ती दोघे बाहेर ताटकळत बोलत उभे राहिले.

१५/२० मिनिटानी कमांडर बाहेर आले आणि त्यानी त्यांच्या ऑर्डर्लीला गाडी आणण्यास सांगितले....

''बसा ! या गाडीत बसा !'' कमांडर.

''कां सर ! कोठे जायचे !'' गंगु.

''माझ्या घरी !'' कमांडर.

आणि ते तिघे कमांडर पालंडे यांच्या घरी आले आणि त्यानी सगळी हकिगत त्यांच्या पत्नीला सांगितली आणि गंगुला कुंकवाचा मळवट भरण्यास सांतितला व तिची ओठी भरण्यास सांगीतले.

''आता तुमचे रितसर लग्न होणे जरुर आहे. तरच तुम्ही रितसर पती-पत्नी बनाल म्हणून तुम्ही जवळच्या शंकराच्या मंदिरात तयार होऊन जाऊ या. आणि आजचे दुपारचे जेवण आमच्या कडे ! महादेवराव तुम्ही खरे नशीबवान आणि गंगु तुही ! आता तुमच्या पुर्नभेटीचे सौख्य आम्हालाही लाभले ही परमात्म्याची इच्छा होती म्हणून तुमची पुर्न भेट झाली.!'' कंमाडर ऑफीसर.

आणि मग उभयता आणि ती दोघे सर्वजण शंकराच्या मंदिरात आले तेथे त्यांचे विधीवत लग्न पुन: लावण्यात आले. कारण महादेवचे पिंडदान व सारे विधी केले गेले होते म्हणून.

पुनः दुपारी कमांडरच्या घरी जेवण झाले. पालांडेच्या पत्नीने गंगुला साडी चोळीचा आहेर दिला व शूभार्शिवाद दिले व मग ती दोघे गंगुच्या रुमवर गेले. अनिल घरीच होता.

''अहो ! काका !'' अनिल.

महादेवने त्याला जवळ घेतले '' बेटा ! तुझा पायगुण म्हणून मी परत आलो. अन्यथा हे शक्य नव्हते !'' महादेव.

आणि मग घरातले वातावरण पूर्णपणे बदलून गेले. महादेवने आपली रजा रद्द केली. आणि येथेच रहाण्याचा निर्णय घेतला. गंगु आज सौभाग्य अलंकाराने अधिकच सुंदर दिसत होती.

या पुर्न भेटी नंतर त्यांचा सुखाचा संसार सुरु झाला. त्यानी अनिलला रितसर, विधीवत दत्तक घेतले व आता तो त्यांच्या बरोबरच रहाणार होता, तो हुशार होता. या वर्षी तो १० वीला होता. आणि त्याला एन.डी.ए.ला गंगु

पाठवणार होती.

अनिलची परिक्षा झाल्यावर ती मंडळी गावाला आली. सगळ्या गावाला त्यांनी जेवण घातले व आनंद सोहळा पुर्नभेटीचा साजरा केला.

परत जाताना त्यानी सुनिललाही बरोबर नेले. महादेवच्या भावाचा जीव भांड्यात पडला. आज घराचे गोकुळ झाले होते.

०-०-०-०-०

# आसवांचा डोंगर !

ज्यांच्यासाठी आपण आयुष्यभर जगलो, झिजलो, त्याची थोडीतरी जाणीव, ज्यांना हवी ती आपली मुले, आपल्या यशाच्या नशेत जेव्हा वावरताना पाहतो ना माणूस काय हवे असते त्याला, एक प्रेमाचा, आदराचा शब्द. आदरयुक्त बापाबद्दल... बस्. पण जेव्हा ज्याच्या कडून ही अपेक्षा करावी ती जेव्हा आपल्या नशेत यशाच्या. मश्गुल असतात. आणि बाप मात्र डोळ्यात आसवांचा डोंगर सांभाळीत वाट पाहत असतो, पण अपेक्षांचा भंग होतो आणि तो रिता करतो आसवांचा डोंगर, गळ्याखाली आवंढा गिळीत.

आज पद्मश्री पुरस्काराचे वितरण होणार यासाठी सगळ्या कुटुंबाला निमंत्रण होते दिल्लीतल्या सरकारकडून. तशी सगळी व्यवस्था झाल्याचे पत्र आले. चॅनेल वाल्यांची गर्दी झाली घरासमोर एका बाईटसाठी. पुष्पहार, पुष्पगुच्छ यांचा ढीग पडला होता घरभर, पण पत्नी खेरीज कोणाचाही चेहरा फुलला नाही. मुलांना या पुरस्काराचे काही कौतुक नव्हतेच. अभिनंदनाची अपेक्षा बाहेरच्याकडून पूरी झाली, पण घरच्या मुलांकडून? छे. जराही निदान आनंद तरी चेहऱ्यावर दिसायला हवा होता. पण, तोही शून्य. या पुरस्काराबरोबर मिळणाऱ्या दहा लाखांचे काय करायचे याच नशेत मुले होती. आणि तशी विचारणा मुलांनी बापाकडे केलीही. त्या साऱ्याकडे डोळेझाक करीत शामरावानी सगळे सत्कार स्वीकारले. डोळ्यात आसवे आणून, एका अभिनंदनाची वाट पाहत मुलांच्या.

आज राष्ट्रपतींकडून हा पुरस्कार स्वीकारताना पत्नी खेरीज कोणीही हजर नव्हते याचेच अधिक दु:ख शामरावांना होते. खरेतर आपल्या दोन्ही मुलानी यायला हवे होते दिल्लीला. आणि डोळे भरून पहायला हवे होते आपल्या जन्मदात्याचे समाजाकडून होणारे अभिनंदन, पण सर्वांनी नकार दिला. आणि भरल्या डोळ्यांनी त्यानी दिल्लीला प्रयाण केले होते. सांताक्रुझ विमान तळावर त्यांना निरोप देण्यासाठी ही कोणी फिरकले नाही. मात्र साहित्य क्षेत्रातली अनेक दिग्गज माणसे मात्र त्यांना निरोप देण्यासाठी हजर होती आणि आपली मुले कोठेतरी या गर्दीत उभी असतील, जरी येणार नसतील दिल्लीला तरी या साठी शामरावांचे डोळे त्या गर्दीतही त्याना शोधीत होते.

मराठी साहित्य सृष्टीतल्या सर्वोत्तम कार्याची दखल घेऊन शासनाने शामरावाना हा पुरस्कार बहाल केला होता. संपूर्ण मराठी सारस्वताना याचा

अभिमान होता. नव्हे शामरावानी हा पुरस्कार तमाम मराठी साहित्य सृष्टीलाच अर्पण करून टाकला. आणि ती सगळी रक्कमही विवीध साहित्य संस्थाना दान केली. असे काही आपले वडील करतील अशी सुतराम शक्यताही त्या दोन्ही मुलांना वाटली नव्हती पण हे आगळीक घडले त्याना जिव्हारी लागले. आणि घराबरोबर घराचे वासेही फिरले.

शामराव जसे साहित्य सृष्टीतले एक दिग्गज व्यक्तिमत्व, तसेच समाज, राजकीय क्षेत्रातही आदराने ओळखले जाणारे एक दिग्गज व्यक्तिमत्व. मोठा राबता होता त्यांच्या घरी अनेक मान्यवर लोकांचा. पण त्याचे अप्रूप मुलांना जराही नव्हते. जेव्हा त्यांनी आपले बस्तान बसवून वेगळ्या चुली केल्या. हे सारे जेव्हा घडले तेव्हा त्यांची धर्मपत्नी या जगात नव्हती.

शामरावांच्या वजनदार त्यांच्या मजबूत खांद्यांचा आधार घेत ही मुले आयुष्यात उभी राहीली. पण त्याचे कणभरही श्रेय त्यांनी कधी शामरावाना दिले नाही. पण तरीही शामराव निरपेक्ष बुद्धीने मुलांच्या प्रेमापोटी हे सारे करीत होते. पण मुले पंख फुटल्यागत बापाचे बाप झाले आणि बाप मात्र एकाकी पडला.

त्या पुरस्कारानंतर अनेक सत्काराचे योग शामरावांच्या जीवनात येतच राहीले आणि शामराव कामात गर्क झाले. अनेक संस्थांचे अध्यक्ष पदे. साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान यात शामरावांचा वेळ जात होता. लिखाणही होत होते. आणि शंभरी गाठली पुस्तकांनी. वाचकांच्या उड्या पडत होत्या त्यांच्या कादंबऱ्या, कथांच्या पुस्तकांवर आणि पैशांचा ओघही वाढला. पण तसेच त्या पैशाचा विनियोगह अनेक गोर गरीबांना, होतकरू विद्यार्थी, गरजूंना होत गेला नी त्यांची प्रतिष्ठा वाढतच गेली. सरकार दरबारी वजन वाढले. महिन्या दोन महिन्याने सरकार पुरस्काराचे योग येतच होते. पैसाही येत होता. आणि योग्य कामासाठी खर्चही होत होता.

आता शामरावांनी ८० व्या वर्षात प्रवेश केला होता. आणि वयाच्या मानाने येणारी प्राकृतिक शिथीलता सतावीत होती. आणि त्यात या वर्षी त्यांच्या 'चांदण्यातला पाऊस' या कादंबरीला साहित्य ॲकॅडमिचा पुरस्कार जाहीर झाला. शामरावाना आनंदाचे भरते आले. अभिनंदनाचा वर्षाव होत होता. हा ५० लाखाचा पुरस्कार आपल्याला मिळेल. असे कधीही वाटले नव्हते. पण त्या कादंबरीवर अनेक विद्यार्थ्यांनी पी.एच.डी. केली. चित्रपट निघाले. त्या कादंबरीची पोच म्हणून हा पूरस्कार होता.

हा ही पुरस्कार राष्ट्रपतींच्या शुभ हस्ते देण्याची तारीख ठरली. तशी पत्रे आली. पण त्याच वेळी शामरावांची तब्येत बिघडली. त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या चिफ सेक्रेटरीना तसे कळवले. हा पुरस्कार त्यांच्यावतीने घरच्या कोणीतरी स्वीकारावा असे त्यांनी सांगीतले. शामरावांनी मुलांना तसे सांगीतले, पण त्यानी त्याकडे दुर्लक्ष केले. शेवटी हा पुरस्कार दिल्लीतील म्हाडाचे अधिकारी अरुण वैद्य यांनी स्वीकारला आणि तो महाराष्ट्र सरकारच्या सांस्कृतिक सचिवांकडे सूपूर्द केला. मग महाराष्ट्राच्या सचिवांनी तो शामरावांना दिला. त्यावेळी शामराव घरात एकटेच होते. तो स्वीकारताना त्यांच्या डोळ्यात अश्रूंचा डोह उभा राहिला होता.

तो ५० लाखांचा चेक त्यानी नोकराला सांगून बँकेत टाकला. आणि त्याच दिवशी ती सगळी रक्कम महाराष्ट्रातील सर्व साहित्य संस्थांना दान केली व ते चेकही रवाना केले. अन् ते निश्चींत होते त्या रकमेबद्दल, पण प्रकृतीच्या वर खाली होण्याने ते अस्वस्थ होते. दोन मुलांपैकी एकही त्यांच्या निवास स्थानी फिरकला नाही.

आपण काय पाप केले होते की असे एकाकी अवस्थेत घरात दिवस काढतो आहे. खाणावळीतून डबा येई. कधी खात तर कधी तसाच परत जायचा. त्यांना भेटायला मित्र मंडळी, साहित्य क्षेत्रातली मंडळी येत. पण त्यांना उठून पाणी देण्याची ताकदही शामरावाच्या शरीरात नव्हती.

त्यानंतरचा एक महिना ठीक गेला, पण गेल्या आठवड्यात त्यांची तब्येत खालवली. डॉक्टरांनी त्यांना हॉस्पिटलला जाण्याचे सांतितले. पण शामरावांनी त्याला साफ नकार दिला. आणि आपल्या घरातच पुस्तकांच्या, पुरस्कारांच्या सहवासात रहाण्याचा निर्णय घेतला. त्यानी आपले मृत्यूपत्रही लिहून ठेवले. आणि त्यांचे मित्र देवगुणकर यांच्याकडे सुपूर्द केले.

सध्या त्यांचे लिखाण चालू होते. पत्रांना उत्तरे ते देत असत. पण घरातून बाहेर जाणे त्यांनी थांबवले होते. त्यांनी थोडक्यात स्वत:ला आपल्या घराच्या चार भिंतीत बांधून घेतले होते. खरेतर माणसांची रिघ सतत असे पण मतलबी, चमकीश लोकांची, कोणीही जीवा भावाचे म्हणावे असे त्यात कोणी नसे. त्याना ध्यास लागला होता तो त्यांच्या नातवंडांचा, गोड मुले पण मुलांच्या हेकेखोर पणाने तीही आता तुटली होती. शामरावांना तोच दूवा सारखा आठवावासा वाटे. बस मुलगा त्यांचा होता तो नसल्या सारखा. आपल्या नशेत पैशाच्या.

आता तर लिखाणही थांबले होते. सतत माणसांचा राबता असणारे घर आता ओके बोके वाटत होते. आता जेवणही करणे थांबले होते. त्यांचे एक मित्र आनंदराव कदम त्या इमारतीत रहात होते ते त्यांना काही गोष्टी आणून देत तोच एक आधार होता बस्.

गेले तीन–चार दिवस शामरावांची तब्येत बिघडली होती. त्यांनी अपल्याला मिळालेले पुरस्कार, मान पत्रे आपल्या बेडच्या एका बाजूला लावली. शेजारी आपल्या पुरस्कारांचा ढीग घातला आणि त्यातच त्यांचा जीव घुटमळत होता. तिच त्यांची सोबती होते. अन् जीवापाड त्यांच्यावर प्रेम करणारे मित्र, नातेवाईक अन् सगळे तेच होते. त्यांना आठवण येई ती त्यांच्या दिवंगत पत्नीची. ती गेली आणि सारे जीवन सुने सुने झाले. मुले निघून गेली, नातवंडे परकी झाली. आणि जगणे ओसाड वाळवंटाचे झाले. हे सारे आठवून ते आपल्या डोळयातल्या आसवांना जवळ करीत. तिच आता त्यांची सोबती होती. आयुष्य फार मजेत गेले, अनेक दिग्गज साहित्यीकांच्या सहवासात. तिच आता परकी झाली. सगळे आपल्या मार्गाने गेले नी ते एकटेच उरले होते जुन्या पिढीतले.

नाही म्हणायला त्यांचा प्रकाशक महिन्याच्या एक तारखेला रॉयलटीची रक्कम येऊन देऊन जाई. त्यात त्यांचे कसे बसे भागे. बस तिच कमाई. आतातर तीही रक्कम येईना. अन्न तुटले होते. कधीतरी कदम येऊन भात घालीत व डाळ घरून घेऊन येत. भाजीला तर पापड बस. पण तेही घशाखाली उतरत नव्हते.

त्यांना मृत्युची चाहूल लागली होती. त्याच्या काही कविता त्यानी लिहील्या होत्या. बस त्या व्यतिरीक्त साऱ्या आठवणीच, आठवणी आणि एक दिवस त्यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यांनी पलंगावरच्या साऱ्या पुरस्कारांना डोळे भरुन पाहिले. काही दिग्गजांबरोबरच्या तसबीरींना न्याहाळले. मानपत्र पाहिली आणि त्यांचे डोळे भरुन आले. अश्रू थांबता थांबेनात आणि मग त्यांचा डोह होऊन डोळ्यांच्या बंद पापण्या आड थांबून अस्वस्थ करीत राहीला. शेवटी एक आवंढा गिळीत श्वास मंद होत गेले नी 'आसवांच्या डोंगर' पापण्याआड शांत होत गेला.

०–०–०–०–०

# सगुण–निर्गुण

निवृत्ती नंतर माधवरावांनी त्यांच्या कोकणातल्या टेरव गावातच स्थाईक होण्याचा निर्णय घेतला आणि पती पत्नी दोघेही गावास येऊन स्थाईक झाले.

गावातले वातावरण तसे छान, भक्तिमय. या गावातली परंपरा वारकरी संप्रदायाची गेल्या चार पिढ्यांची. गावात तीन विठ्ठलाची मंदिरे त्यात दररोज होणाऱ्या काकड आरत्या, हरिपाठ आणि भजने त्यामुळे माधवरावांना ते भक्तिमय वातावरण खूपच भावले आणि कधी नाही ते त्यांची पाऊले विठ्ठलाच्या दर्शनाला सकाळ, संध्याकाळ वळू लागली. महिन्यातून एकदा तरी किर्तनाचा कार्यक्रम व्हायचा. हरिनामाचा महिमा, नामस्मरण या मुळे माधवराव कमालीचे प्रभावित झाले. आणि त्यांच्या नजरे समोर विठ्ठलाची मुर्ती सतत तरळत राही.

त्या गावातले बहुतांश लोक आळंदिच्या ह.भ.प भागवत भारती महाराजांचे शिष्य. कोकणात या महाराजांचे प्रस्थ मोठे. गावोगाव विठ्ठल मंदिरे त्यांच्या मुळेच बांधली जात होती. सातत्याने किर्तने होत आणि उत्तम असे प्रबोधन शिष्यांना त्यांचे होत होते. हरिनामाचा महिमा, नामस्मरणाचे महत्त्व ऐकून माधवराव कमालीचे प्रभावित झाले आणि आपणही या वारकरी मंडळीत सामील व्हावे असे त्याना वाटू लागले. त्यानी ध्यास घेतला विठ्ठलाच्या भेटीचा. सातत्याने त्याना वाटे पंढरपुरला जावे. विठ्ठलाची भेट घ्यावी. पण योग काही येत नव्हता. आणि माधवरावांचा जीव मात्र घुटमळत होता.

गावात आल्यापासून ते सातत्याने गावातील इतर मंदिरात जात होते. गावदेवी, हनुमंत, भगवान शंकर इ. च्या मंदिरात सातत्याने जात होते. पण त्याना जराही समाधान मिळत नव्हते. तसे पाहिले तर त्यांच्या मनात देवतां बद्दल प्रेम, आस्था आणि भक्ति होतीच. पण तरीही एकही दैवत मनात ठसत नव्हते. पण गेल्या महिन्यात त्यांच्यात झालेला फरक त्यांनाच जाणवत होता. भारती महाराजांच्या किर्तनातून होणाऱ्या प्रबोधनाने तो इतका प्रभावित झाला की सदगुरु शिवाय कोण दाखविणार तुम्हाला भक्तिचा योग्य मार्ग. या त्यांच्या प्रबोधनाने आपणही सद्गुरुंचे शिष्यत्व स्वीकारावे आणि हरिनामाच्या डोहात येथेच्छ डुंबावे. आता तर त्यांचे मन भारती महाराजांकडे ओढ घेत होते.

आषाढीवारीचे दिवस जवळ येत होते. भारती महाराजांची प्रतिष्ठेची ३६ नंबरची दिंडी ही तशी प्रसिद्ध. हजारोंच्या वर वारकरी या दिंडीत सामील होत. आणि आषाढीवारीच्या निमित्ताने दररोज भारती महाराजांच्या होणाऱ्या

किर्तनाच्या प्रबोधनाचे अमृत प्राशन. करीत यावर्षी गावातून निघणाऱ्या वारकऱ्यांमधून माधवरावांनीही आळंदीला जाऊन तेथून पंढरपूराकडे प्रयाण केले. आणि हा वारीचा वेगळाच अनुभव गाठीला बांधला. भागवत भारती महाराजांचे सान्निध्य लाभले. किर्तनाचे बोधामृत उदंड लाभले. आणि आता तर अनुग्रह घ्यावाच यासाठी त्यांचे मन ओढ घेऊ लागले. तशी इच्छाही त्यानी सद्गुरूकडे व्यक्त केलीही. आणि त्यांचा होकार मिळविला. ते म्हणाले यथा योग्य वेळी त्याना अनुग्रह ते देतील या होकारानंतर त्याना आता चैन पडत नव्हते. शिवाय पांडुरंगाच्या दर्शनाने तर त्याना आता आपण पुन्हा पुन्हा पंढरीत यावे असे वाटू लागले होते.

आषाढी यात्रेचा अनुभव हा माधवरावांसाठी अनोखा होता. ते अंतर बाह्य पांडुरंगमय झाले होते. आता आपणास अनुग्रह व्हावा यासाठी त्यानी सद्गुरू भारती महाराज याना आळंदीला यात्रेत केला. त्यानी होकारही दिला. म्हणाले येत्या गुरुपौणिमेला तुम्ही आळंदीला या उभयता. म्हणजे तुम्हाला अनुग्रह देतो. माधवरावाना अत्यानंद झाला.

गुरु पौणिमेच्या दिवशी महाराजांच्या मठात गुरुपौणिमा साजरी झाली आणि माधवराव नाम धारक झाले. आता तर त्यांच्या मुखात रामकृष्ण हरी चा जप सातत्याने होत होता. त्यांना ग्रंथ वाचनाची प्रचंड आवड होती. आळंदीहून येताना त्यानी अनेक ग्रंथ आणले होते व त्यांची पारायणे करण्याचा सपाटा लावला. ज्ञानेश्वरीचे वाचन दररोज होत असे. ज्ञानेश्वतीतील अवघड प्रमेये फटा फट सुटत होती नी अध्यात्मिकतेचे गुह्य स्वरुपही उकलू लागले होते. पुरा दिवस आता ते घरीच असत. फक्त सकाळ संध्याकाळ गावातील त्यांच्या घरा शेजारच्या विठ्ठल मंदिरात जात असत. हाच त्यांचा विरंगुळा होता. काही अडले की ते सद्गुरुना फोन करीत आणि शंकांचे निरसन करुन घेत असत. त्यांना आता ओढ लागली होती ती परमात्म्याच्या निर्गुण स्वरुपाची. ते कसे असते हे पाहण्यासाठी माधवराव अधिक उत्सुक होते. ज्ञान देवानी सांगितलेल्या हरिपाठातील चार मुक्ती म्हणजे काय? आपली तयारी कुठवर आहे? याचाही विचार ते सातत्याने करीत असत. थोडक्यात आता माधवराव पूर्वीचे राहिले नव्हते ते मुमुक्षु झाले होते. परमात्म्याच्या दर्शनाची ओढ त्यांना लागली होती. आपला शिष्य अल्पावधीत इतका तयारीचा झाला आहे याचाही अभिमान सद्गुरूना वाटत होता आणि माधवरावांवर सद्गुरुंचे प्रेमही बसले.

ज्ञानेश्वरी, हरिपाठ, अमृतानुभव हे चांगलेच पासष्ठी हे ग्रंथ माधवरावांनी वाचून आत्मसात केले तसेच भक्ती बद्दलचे अनेक ग्रंथही अभ्यासले. या सगळ्या ग्रंथात ईश्वराची म्हणजे परमेश्वर, परमात्मा भेटीची त्याना ओढ लागली होती. पण त्यांच्या मनात मोठा भ्रम निर्माण झाला तो म्हणजे सगुण-निर्गुण स्वरुपाच्या बाबात. गावातल्या मंदिरा मधल्या मुर्ती त्यांना आवडेनाशा झाल्या. मंदिरात जाणे आटले. सदानकदा ते हरिनामाच्या स्मरणात गुंतले होते. आणि त्यांचे मन निर्गुण रुपाच्या शोधाकडे झुकले होते. ते कसे असेल. त्याचा शोध त्यांनी सर्व ग्रंथात केला पण काही बोध होईना.

आता शेवटचा उपाय म्हणजे सद्‌गुरुना शरण जावे. तरच हा सगुण निर्गुणाचा भ्रम दूर होईल. सगुण म्हणजे जे आपल्या डोळ्यांना दिसते ते पण निर्गुण म्हणजे नक्की काय? ते पाहता येते कां? मला दिसेल कां? या विचारानी त्याचे चित्त भारावून गेले होते, या जन्मातच हे साध्य झाले पाहिजे याचा ध्यास त्यांच्या मनाने घेतला होता आणि याची पुर्ण उकल करुन घ्यायची याच विचाराने झपाटलेले माधवराव सपत्नीक आळंदीला डेरे दाखल झाले. पण भारती महाराज कोकणात गेले होते. आपण त्याना भेटल्या शिवाय परतायचे नाही. म्हणून त्यानी संप्रदायाच्या भक्त निवासात थांबायचे ठरवले. आता ते दिवसभर मठातच असत. जी काही सेवा करता येईल ती ते करीत असत. वेळ छान जात होता. पूजा अर्चा, आरत्या या पवित्र वातावरणात त्यांची ऐहिक ओढ पार विरघळून गेली होती. ते तनामनाने शुद्ध झाले होते. पंधरा दिवसानी स्वामींचे आगमन आळंदीत झाले. ते चकीत झाले की माधवरावांच्या गेल्या पंधरा दिवसात तनामनाची निवृत्ती झाली आहे आणि खऱ्या अर्थाने परमात्म्याच्या दर्शनासाठी आतुर झाले आहेत. याची सगळी कल्पना माऊलीना आली.

शिष्याचा हट्ट सद्‌गुरुनी पुरवावा असा संकेत भक्तिमार्गात असतो. सद्‌गुरुनी माधवरावांची सर्व मार्गानी परिक्षा घेतली. आणि ठरविले की याना आपण पुर्णत्वाची दिक्षा द्यायची.

''माधवराव! पहा परमात्मा या विश्वाच्या चराचरात भरलेला आहे. तो या विश्वाचा नियंता आहे. सारे काही त्यांच्या कृपेमुळे घडत असते. आपला जन्म, मृत्यू, स्वर्ग प्राप्ती व नरक प्राप्ती ही त्याच्याच कृपा प्रसादाचे फळ आहे. या विश्वाच्या चराचरात तो पूर्णपणे व्यापून आहे ! असा तो परमात्मा परमेश्वर कृपावंत आहे, भक्तांच्या मनातले तो जाणतो, तोच त्याला अंतर बाह्य व्यापून घेतो. त्याची कृपा झाली की तोच आपले प्रकाशमान स्वरुप त्या भक्ताला

दाखवतो. तुम्ही सातत्याने त्यांचे नाम घेत रहा. आणि त्या परमात्माचे ध्यान करीत रहा !'' महाराज.

''महाराज खरे ! पण त्याने ध्यान कसे करावे, त्या परमात्माचे स्वरुप कसे आहे हे जर माहिती नाही तर त्याचे ध्यान कसे होणार?'' माधवराव.

''पहा माधवराव! हे सारे प्रत्येक भक्ताने स्वबळाने मिळवायचे असते. मी तुम्हाला मार्ग दाखवला त्या मार्गाने जायचे, म्हणजे सारे काही साद्य होईल व याचा अनुभव तुम्हाला येईल!'' सद्‌गुरु.

''पण कधी ?'' माधवराव.

''थोडा धीर धरा !'' सद्‌गुरु.

''मला सगुण-निर्गुण यातला फरक समजावून सांगा. ज्या मुर्ती मंदिरात आहेत त्या सगुण आहेत! दिसतात ! मग त्यात निर्गुण रुप असते कां?'' माधवराव.

''हो! असते नां, तुमच्यात जसा परमात्मा जिवात्म्याच्या रुपात वावरतो आहे ! तसा चराचरामधे अंश रुपाने परमात्मा आहेच!''

''मग महाराज सगुणाची पूजा तरी लोक कां करतात?'' माधवराव.

''त्याचे असे आहे'' सगुणाची भक्ती करता करता तुम्हाला निर्गुणाचा मार्ग सापडतो, असे संत महात्मानीच सांगीतले आहे !'' महारज.

काही वेळ माधवराव चक्रावून गेले त्यांचा सगुण निर्गुणाचा भ्रम काही ओसरायला तयार नव्हता. प्रश्नांकीत मुद्रेत हरवलेल्या माधवरावांना पाहून महाराज म्हणाले....

''माधवराव तुमच्या डोक्यातून **सगुण-निर्गुणाचे** भूत काढून टाका. आता तुम्ही निर्गुणाचाच फक्त विचार कारा ! तुम्हाला तो परमात्मा नक्की भेटेल, तो कृपावंत आहे, दयाळु आहे. त्याला रुप, रंग, आकार नाही, तो निराकार आहे. पण आहे येवढे मात्र खरे! हे ध्यानात ठेवा ! डोक्यातून हा भ्रम काढून टाका आणि नामस्मरण  करा ! बस् तो तुम्हाला भेटेलच ! शंकाकुशंका नकोत ! या आपल्या भक्तिच्या मार्गात अडथळे निर्माण करतात. तुम्ही ज्ञानेश्वरीची पारायणे करा. तुमच्या प्रश्नाची उत्तरे सापडतील आणि निश्चितच तो परमात्मा तुम्हाला भेटेल ! '' महाराज.

माधवरावांच्या चेहऱ्यावर चे सर्व वैचारीक जळमट नाहीशे झाले होते त्यांचा चेहरा निर्वीकार झाला होता.. त्याना तंद्री लागली होती... आणि...

०-०-०-०-०

# बेवारस

रात्रीच्या एस.टी. ने मी मुंबईला निघालो. बऱ्याच दिवसांनी मला जायचे होते बोरिवलीला. गाडी स्पेशल स्टील जवळ चार वाजता पोहोचली आणि मी रिक्षा पकडून घरी निघालो. घर काही फारसे लांब नव्हते. पाचच मिनिटात मी आमच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पोहोचलो.

रोड बंद होता. वॉचमनने गेट उघडला. माझी रिक्षा आत गेली. मी उजव्या बाजूला पाहिले तर एक जातीवंत अल्सेशियन कुत्रा डोळे झाकून झोपला होता. थंडीचे दिवस होते ते. आणि मी अधिक वेळ तेथे थांबू शकत नव्हतो. कारण रिक्षावाल्यांना घाई सकाळी गिऱ्हाईक पकडण्याची. पण त्या कुत्र्याला पाहिल्यापासून माझी विचार चक्रे चालू झाली. हा जातीवंत कुत्रा येथे कसा काय? कोणाचा असेल बरे ? अशा किमती कुत्र्याला 'बेवारस' सारखा मालकाने सोडला तरी कसा ? तशा प्रकारचे अनेक कुत्रे आमच्या कॉलनीतल्या श्रीमंताकडे होते. शौक म्हणून.

मी रिक्षा सोडली आणि लिफ्टने घरी गेलो. दरवाज्याची बेल मारली. कोणी उघडला दरवाजा आठवत नाही... पण विचार चक्रात मी मात्र मनाने गुंतलो होतो त्या अल्सेशियन कुत्र्यातच.

मग साडे सहा वाजता मी माझ्या नातवाला त्याच्या शाळेच्या गाडीपर्यन्त पोहोचवायला गेलो. म्हणजे जेव्हा जेव्हा मुंबईला असे तेव्हा त्याची इच्छा असे की आजोबा सोबत यावेत, शिवाय माझे मन ओढ घेत होते ते त्या कुत्र्याच्या साठी.

भराभर पाऊले उचलीत मी लिफ्टच्या दरवाजापर्यंत पोहोचलो. पण तो कुत्रा अजूनही तेथेच झोपलेला होता शेकोटी जवळ. आज तशी थंडी खूप होती. पण मला तेथे रेंगाळणे शक्य नव्हते. कारण बस येईल या भितीने मी गेटच्या बाहेर गेलो माझ्या नातवाबरोबर.

शाळेची गाडी आली आणि निघून गेली. मी नेहमीप्रमाणे थोडे फिरून यायचे ठरवले. पण मग फार दूर न जाता पुन्हा कॉम्प्लेक्सच्या गेटवर आलो.

''राम राम साहेब !'' राणे.

''राम राम !'' मी.

''बऱ्याच दिवसांनी गावाकडून येणे झाले ?''

"हो, घराचे काम चालू आहे. तेव्हा मुक्काम तिकडेच होता ४ महिने.

"बसा की जरा ! मी शेकोटी पेटवली आहे. छान थंडी पडलीय ... मग घरी जा." राणे.

मला त्यांनी दिलेल्या खुर्चीत मी बसलो. "अहो राणे ! हा कुत्रा कुणाचा? आणि इथे कसा काय ?" मी.

"बी विंग १२०४ च्या शर्मांचा. गेली चार महिने इथेच असतो आपल्याजवळ दिवसभर. आम्ही त्याला खायला घालतो. पडून असतो इथे. आम्हालाही आधार वाटतो, आमचा कधी डोळा लागला तर !" राणे.

"पण तो इथे कसा काय ?" मी.

काय सांगू साहेब. ते शर्मा कायमचे गेले कॅनडाला पुन्हा न परतण्यासाठी... आणि या डॉगीला येथे सोडून दिला. वेड्यासारखा झाला होता. कॉलनीत त्याने खूप हंगामा केला. पण मग आम्हीच त्याला आधार दिला... आज तो जरी आपल्या जवळ असला तरी सुरुवातीला पाळलेला तुपाशी खाणारा हा कुत्रा ४-५ दिवस उपाशीच होता आम्ही आणला तेव्हा." राणे.

तो कुत्रा तसा सगळ्यांना प्रिय होता. मुलांचा तो आवडता होता. लहान मुले त्याची लुसलुशीत आयाळ कुरवाळत असत. त्याचा मालक पट्टा लावी गळ्याला त्याला सकाळी बाहेर घेऊन जाताना. कारण इतर कुत्रे त्याला सतावीत असत म्हणून... पण आज त्याला पट्टा नव्हता. शेकोटीच्या बाजूला तो मान टाकून बसला होता... साहेब हे सुखात वाढलेले कुत्रे येथे बेवारशा सारखे आहे. म्हणजे जरी आमच्या येथे असला तर तो 'मजबूरीने, आम्ही त्याची काय काळजी घेणार ? परवा रस्त्यावरच्या कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला केला. पायाला जखम झाली आहे. खरेतर त्याला कुणीतरी दवाखान्यात न्यायला हवे. पण आम्हाला खर्च कसा परवडणार ? सोसायटीतले कोणीही लोक त्याच्याकडे ढुंकूनही बघत नाहीत. आम्ही गरीब माणसे, आम्ही काय करू शकतो? आम्ही त्याला चपाती भात देतो. पूर्वी ४-५ दिवस त्याने काहीच खाल्ले नाही. तेव्हा कुठे त्याने तोंड लावले.

जवळ जवळ अर्धा तास मी तेथे बसून मग उठलो. त्या कुत्र्याने वर मान करून माझ्याकडे पाहिले. मी थोडावेळ तेथे उभा राहिलो. मला तेथून पाय काढणेही कठीण झाले होते. मी पुनः त्या खुर्चीत बसलो. मी ४ महिन्यांनी आलो. आमचे फिरायला गेलेले वयस्क मित्रमंडळीही त्या गेटवर जमा झाले.

आम्ही सर्वजण त्या सिक्युरिटी ऑफीसमध्ये बसलो. आणि चर्चा सुरू झाली. या कुत्र्याचे भवितव्य काय? हा सुखवस्तू प्राणी या उघड्या थंडीत मरेल. त्याला सवय नाही या वातावरणाची. पण त्याच्यासाठी कुणीही तयार होईना. शेवटी त्याला डॉक्टरकडे नेऊन आणायचे ठरले. व डॉक्टरकडे नेऊन आणला. त्याच्या पायाची जखम भरली होती. औषधे चालू झाली होती. पण जखम बरी व्हायला वेळ लागणार होता. प्रश्न अजून अधांतरीच होता. या कुत्र्याचे काय करायचे?

८-१० दिवस असेच गेले. तो कुत्रा तसाच तेथे 'बेवारस' अवस्थेतच पडून होता. त्यानंतरही आता जवळजवळ चार-पाच वेळा त्या कुत्र्याला हॉस्पिटलला नेऊन आणला.

त्यानंतर शनिवार व मग रविवार मी खाली गेलो नव्हतो. सोमवारी मी माझ्या नातवाला शाळेत सोडायला गेलो तर तो कुत्रा मला तेथे दिसला नाही. आणि राणेही ड्युटीवर नव्हते.

''अहो दादा ! तो कुत्रा दिसत नाही तो ?''

''तो कालच मेला! आम्ही पुरला बाजूच्या गार्डनमध्ये. कालचीच गोष्ट. सगळी मुले होती त्यांच्या लाडक्याच्या अंत्यविधीला. सगळ्यांनी मुठमाती टाकली त्याच्यावर आणि साश्रु नयनांनी त्याला निरोप दिला साहेब!'' तुमच्याशी संपर्क झाला नाही सर !''

मी अगदी सदगदीत झालो. डोळ्यात पाणी उभे राहिले आणि त्या शर्माला चांगली एक शिवी हासडून मी माझे डोळे पुसले. आणि तसाच परतलो. पण डोळ्यातल्या धारा काही थांबयला तयार नव्हत्या... सारखी त्याची छबी डोळ्यासमोर तरळत होती... बेवारशी रुपात !!

०-०-०-०

# 'त्याग'

अमेरीकेतला स्वर्ग बघणे कोणाच्या कधी नशीबी येईल, काही सांगता येणार नाही. पण आम्हा उभयतांच्या नशिबी हा योग आला, आमची मुलगी शलाका हिच्यामुळे. आमचा जावई अभियंता, संगणक क्षेत्रातला तज्ञ आणि हेक्झावेअर या कंपनीत नोकरीला. कंपनीची अमेरिकेतले सर्व प्रकल्प एकटा सांभाळायचा. कंपनी त्याच्यावर खुश होती.

माझी मुलगी शलाका हिच्यासाठी हे लग्नाचे स्थळ आले आणि मोठ्या थाटामाटात लग्न झाले. ती अमेरिकेला गेली. मुलगी झाली. तिच्या पहिल्या वाढदिवसाला आम्हाला बोलावले. आम्ही उभयता आणि जावई (आशीश) याचे वडील अमेरिकेला गेलो. त्या वेळी त्यांचे वय ७९ वर्षे होते. आम्ही तेथे दोन महिने होतो व मग पून्हा परत भारतात आलो. आशीशचे वडील हे एल.आय.सी.चे निवृत्त डि.जी.एम. येथे एकटेच रहात होते. वयोमानाप्रमाणे अनेक अडचणी येऊ लागल्या. त्यांनी, ८० वर्षे पार करुन ८१ व्या वर्षात पदार्पण केले होते. येथे नोकर चाकर त्यांची काळजी घेत असत.

त्यांचा मित्र परिवार मोठा. आम्ही त्यांचा ८१ वा वाढदिवस थाटामाटात पार्ल्यात साजरा केला. पण त्यानंतर तब्येतीत अनेक अडचणी निर्माण झाल्या. औषध पाणी चालू होते. येथे त्यांची मुलगी काळजी घेत होती. पण तरीही ते एकटेच रहात होते, आपल्या पार्ल्यातल्या घरी एकाकी पणे.

मुलाने विचार केला आपले वडील आता वयस्कर झाले आहेत अशा वेळी आपण अमेरिकेत, हे काही ठीक नाही, परकी माणसे किती काळजी घेणार ? त्यांना डायबेटीस होते, आणि त्यांची काळजी घेणे गरजेचे होते. शेवटी आशीशने अमेरिका सोडून भारतात येण्याचा निर्णय घेतला. व आपल्या नोकरीचा राजीनामा दिला.

त्याने कंपनीतील नोकरीचा राजीनामा देऊ नये या साठी हेक्झावेअर कंपनीचे चेअरमन अमेरिकेला गेले. त्याची मन धरणी केली. आशीशने कारण सांतितले माझे वडील आता ८४ वर्षाचे आहेत त्याना माझी गरज आहे. तेव्हा मला भारतात येणे अगत्याचे आहे असे सांगीतले.

चेअरमनने त्यांचा राजीनामा स्वीकारला नाही. पण मुंबईत येऊन याच कंपनीत राहून अमेरिकेतले सगळे प्रकल्प पहावे यासाठी त्याचे आर्थिक नुकसान

होणार नाही व कंपनीचा हा सक्षम अधिकारी कंपनीतच राहील असे पाहिले.

आशीश, शलाका व त्यांची छोटी कन्या प्रियांका सह भारतात आले. व आपली नोकरी सांभाळीत वडीलांची सेवा ही चालू ठेवली. तरीही दर १५ दिवसानी त्याला अमेरिका व युकेत आठ-दहा दिवसांसाठी जावे लागत होते. पण त्याकाळात माझी मुलगी आशीशच्या वडिलांची काळजी घेत होती.

त्यासाठी अमेरिकेत मिळत असलेले नागरीकत्वही आशीशने नाकारले व भारतात राहणे पसंत केले. फक्त आपल्या वडिलांसाठी एवढा मोठा त्याग त्याने केला. आणि त्याच कंपनीत नोकरी करीत राहिला. आता तो याच कंपनीत संचालक म्हणून काम करीत आहे. आता आशीशच्या वडिलानी नव्वदी पार केली आहे. सुखी व सुरक्षित आहेत. आणि आपल्या कुटुंबात आनंदाने रहात आहेत.

आज आपण पहातो आईबाप भारतात, मुलं अमेरिकेत. बेवारस अवस्थेतल्या आईवडिलांना वयोपरत्वे अनेक अडचणीना तोंड देत एकाकी जीवन जगावे लागते आहे. ती स्वर्गवासी झाले की मुलेही येथे येत नाहीत. त्यांना अमेरिकेतून आईवडिलांसाठी येणेही अवघड वाटते आहे. जन्मदात्यानी विकलांग अवस्थेत येथे दिवस काढावे आणि मुलानी स्वर्गसुख घ्यावे हे पटत नाही.

मग आशीशने एवढा मोठा त्याग करुन भारतात येणे व आपल्या वडीलांची काळजी घेणे हे खरोखरच अभिमानास्पद वाटते. हा त्याचा त्याग कंपनीने त्याचे आर्थिक नुकसान न करता त्याला डायरेक्टर केले हे ही भूषणावहच, आणि त्या त्यागाचे फळ नाही का? शिवाय वडिलांना होणारा आनंद व सुरक्षितता यांचे मूल्य करता येणार नाही.

अशीशचा हा 'त्याग' खरोखरच अभिमानास्पद आहे नाही का ?

०-०-०-०

# ईमान

आज त्याचा पहिला वाढदिवस. गेल्या वर्षभरातल्या आठवणी, मनाच्या कोपऱ्यात आपण जपत आलो. त्याचे पडसाद पापण्या आडून डोकावत रहातात, त्याच्या सहवासाचे पापुद्रे, जेव्हा काढीत रहातो आपण.

चाळीस दिवसाचे ते इवलेसे बाळ, पिंजऱ्यातून कोल्हापूर-मुंबई प्रवास करून ट्रकमधून आले आणि त्याच्या आशाळभूत नजरेतून शोधत होते आपल्या आईला, पण पुढे बिलगले आम्हाला, आणि झाले आमचे, मायेची उब त्याला मिळाली, सुखावले ते आणि पहिला आवाज त्याचा मनाला, काळजाला आरपार भेदून गेला. गाईच्या दुधावर आपली तहान, भूक भागवीत.

अजुनही आठवते त्याची टकमक नजर न्याहाळीत होती, घर आमचे, माणसे मुले आणि ओळख करून घेत चाटीत हाताचे तळवे, निरागस पणे, प्रेमाच्या शोधात. आम्हीही अनभिज्ञ, त्याची आई व्हायची म्हणजे काय करायचे आपण, तो सांगत होता त्याच्या नजरेच्या आशाळभूत कंगोऱ्यातून, अंगा खांद्यावर खेळत आमचा होत, आम्हाला अडकवीत, त्याच्या माया जालात, खेळत, बागडत, लोभस पणे.

तो पहिलाच अनुभव आमचा आणि त्याचाही माणसाळलेला, लिओ त्याचे नाव ठेवले, त्याला नव्हते ते कळत. पण ते नावच विरत होते आमच्या तनात, मनात सामाऊन घेत त्याला, आमचा काळजाचा तुकडा होत. त्याच्या आवाजाचा अर्थ नव्हता कळत आम्हाला. याला काय सांगायचे आहे? काय हवे आहे, हा आमचा पहिलाच अनुभव होता, काहीतरी काय बरेच त्याला सांगायचे असे आम्हाला. पण काय? याचे गणित नव्हते सुटत. 'जर्मन शेफर्ड' जातीचा तो प्रेमळ प्राणी, पूर्व जन्मीचे काहीतरी सुकृत घेऊन आमच्या आसऱ्याला आला आणि आमचा केव्हा झाला, आम्हालाच नाही समजले. सारे घरंच त्याच्या मागून फिरे भिंगरी सारखे.

एक दिवस एक बाड येऊन ठेपले आमच्या घरी, त्याच्या जन्माची तारीख, आई, वडील आणि अख्या पाच पिढ्यांची वंशावळ. हे सारे नव्हते आम्हाला माहित. पण आता त्याचे सारे पत्ते उघड झाले. त्याचे रजिस्ट्रेशन झाले. नाव आम्ही एकमताने 'लिओ' ठेवले. आणि सरकार दरबारी तो नोंदणी कृत झाला. काय बडे जाव त्याचा सांगू, त्याला पंधरा दिवसानी डॉक्टर येऊन चेक करीत,

त्याचे खाणे, पिणे, औषधे, इंजेक्शन, याच्या बरोबर त्याची शी, शू ची व्यवस्था, त्याचे ट्रेनींग सुरु झाले. आणि ते लाजरे बुजरे बाळ आता शहाणा व्हायला लागले. आणि तना मनाने आमचे झाले. कुटुंबातला एक सदस्य म्हणून. आता या पाच जणांच्या कुटुंबातले ते सोनुला बाळ, पूऱ्या घरभर हुंदडू लागले, आणि पूऱ्या घराला शिस्त ही लावली त्याने, त्याचे शेड्युल्ड, सगळ्याना पाठ झाले.

पहिले तीन महिने ते वेडे बाळ सारे काही बाहेरच करी, पण सारेजण ते प्रेमाने करीत, अगदी आपले बाळ असे. जसाजशी त्याची ट्रेनिंग होत गेली, तो शहाणा होत गेला. आमुलाग्र बदलला तो, बाळशे घेतले. गुटगुटीत होत गेले, मस्ती वाढली, त्याला सतत खेळायला हवेसे वाटे कोणीतरी अगदी दमेपर्यंत, आणि मग त्याचे निवांत पणे झोपणे.

आता त्याचा आवाजही फुटला होता. भुंकण्याच्या त्याच्या लकीबी, माणसाची ओळखण्याची त्याची शोधक बुद्धी, शार्पनेस होती त्या त्याच्या वागण्यात. वाढत गेला... आपला कोण, परका कोण? याची जाण त्याला चांगली आली. आता तर ते शहाणे बाळ झाले होते. वर्षभरा नंतर मी गावावरून आलो तर, त्याने मला ओळखले. पापी घ्यायला आला आणि मग माझे पाय चाटत पायाशी बसला. ना भुंकणे, ना अंगावर येणे. पण माझी पत्नी दोन वर्षांनी गावावरून आली तर ती त्याच्या ओळखीची नव्हती. पण जेव्हा 'लिओ' ला घेऊन मुले गावाला आली होती तेव्हा. त्या कोकणातल्या खुल्या वातावरणात खूश होता, ऐसपैस जागा हुंदडायला, खेळायला मग काय टूर ला गेल्या सारखा तो खूश होता. माझ्या मुलाची मर्सीडीज आली गावाला त्याला घेऊन, दरवाजा उघडला की टूणकन मधल्या सीटवर तो बसे. त्या जागेवर त्याच्यासाठी एक जाजम अंथरले होते. बेटा खूश. तो त्याचा मुंबई-चिपळूनचा तीनशे किलोमीटरचा प्रवास त्याला उलटी सारखे वाटले. एक गोळी दिली मग तो ताणून झोपला मुलांच्या मांडीवर. प्रवास संपे पावत. मुंबईतल्या घरापेक्षा त्याला गावचा बंगला आणि परिसर आवडला होता. त्याच्या सहवासात चार दिवस मजेत गेले.

कधीकधी कुटुंबियाना काही कार्यक्रमाला, वा पिकनीकला, गावाला जायचे असते तेव्हा आमचे कुटुंबिय त्याला डे केअर मध्ये ठेवतात. एकदा दोन महिन्यासाठी ठेवण्याची वेळ आली कारण घराचे इंटेरियर चालू होते. आणि

दुसरा प्लाट त्याच्यासाठी सुटेबल नव्हता. तर बेट्याला दर रविवारी सगळे कुटुंब भेटायला जाई. अर्धा तास भेटीच्या कार्यक्रमात खेळ होत. त्याना आलेले पहाताच प्रचंड वेगाने येऊन सगळ्यांना बिलगे. आणि जेव्हा निघण्याची वेळ येई आमच्यासह त्याचाही डोळ्यात करूणा पहायला मिळायची.

आणखी एक ठिकाणी १ दिवसासाठी ठेवण्याची वेळ आली. जेव्हा भाऊबीजेला वीस-वीस लोक आले होते. खूप वाईट वागणूक दिली त्यानी. घरी निघताना प्रचंड दंगा केला त्याने आणि त्या डे केअरकडे न बघताच निघून आला. प्रचंड रागावला होता, अहो त्या लोकांनी त्याला पिंजऱ्यात बंद करून ठेवला होता. आता बोला हे काय वेडे प्राणी आहेत ? जगात कुत्रा आणि घोडा याना सातवा सेंन्स असतो असे म्हणतात त्याची प्रचिती राव मिनिटा मिनिटाला येते आम्हाला. खाली माझ्या मुलाची गाडी आली रे आली की तो दरवाज्यात जाऊन बसतो त्याची वाट पहात. आणि तो आला की भेटण्याचा कार्यक्रम. मग १० मिनिटे खेळाचा कार्यक्रम. मग बेटा दमतो आणि शांतपणे पडून रहातो.

आमच्या 'लिओ'ला ४ वेळा दिवसातून खाली शी-शूला न्यावे लागते. सकाळी ६ वा. दुपारी, संध्याकाळी, आणि रात्री. सगळेच जण जपतात जीवा पाड त्या छकुल्याला.

एक गोष्ट सांगाविशी वाटते, हे बाळ खूप हुशार नी शहाणे असते, माणसाच्या मनातले अंतरंग येणारी व्यक्ती पारदर्शक मनाची, की काही स्वार्थ, कलुशीत विचार धारेचे, हे कळते त्याला. जगात दोनच प्राण्यांना 'सातवा सेन्स' असतो. एक कुत्र्याला आणि दुसरा घोड्याला. येवढे मात्र खरे. आपल्या मालकाला, घरातल्या मुलांना, म्हाताऱ्यांना, आणि इतर सगळ्यांच्या सुरक्षेचा राखणदार असतो तो. हे सांगायला नको.

मी असे वाचले आहे की, आणि अनुभवलेय ज्याचा स्पर्शवास त्याने घेतला, त्याला तो कधीच नाही विसरत. त्याच्या मेमरीची मर्यादा अमर्याद असते. एक K.M. वरून जाणाऱ्या व्यक्तिचा माग तो घेऊ शकतो, म्हणूनच युद्धात सैनिकांना, पोलीसांना गुन्हेगार शोधण्यात त्याची मदत होते. कोसळलेल्या इमारतीच्या ढीगाऱ्या खाली कोणी गाडला गेला माणूस तर त्याला कळतो आधी.

एक आठवण सांगतो. माझे एक मित्र आमच्या कार्यालयात आमच्या सोबत अधिकारी होते. त्यांच्या घरी असाच एक कुत्रा होता. त्यांची बदली

झाली जयपुरला. त्याला तेथे नेणे शक्य नव्हते. घरी आई वडील वृद्ध, त्याची कोण नीगा राखणार, शेवटी आम्ही मुंबईला संजय गांधी उद्यानातील आमच्या एक मित्राकडे त्याला सोपवले. त्यावेळी तो ४ वर्षाचा होता. आणि वर्षभरात ते आमचे मित्रही निवृत्त झाले. याचे काय करावे हे त्याना कळेना, आमच्याशी संपर्क होईना. म्हणून नाइलाजाने त्यानी तो रॉकी (त्याचे नाव) एका पारशी बाईला विकला ३ वर्षाने. ३ वर्षाने आमचे मित्रही निवृत्त झाले. त्याना रॉकीची आठवण झाली, कारण त्यांना तो त्यांच्या पनवेलच्या फार्म हाऊस वर हवा होता. राखणदार म्हणून. आम्ही त्या पारशी बाईंच्या पत्त्यावर गेलो. आम्ही आलो आहोत व दरवाज्या बाहेर उभे आहोत ते रॉकीला समजले तो घरात बेचैन झाला. त्या बाईना हे समजेना कां तो असा वागतो आहे. आम्ही दरवाज्याची बेल वाजविली. त्यानी दरवाजा उघडला तेव्हा त्याला बांधून ठेवला होता. आणि रॉकी साखळीला हचके देत होता. आणि आम्ही कशासाठी आलो आहे ते त्या बाईना सांगितले. आणि रॉकीला सोडायला सांगितले.

सुटताच तो आमच्या मित्राच्या गळ्यात पडला. पाय चाटले. आणि त्याच्या दोन पायाच्या मध्ये बसला.

''साहेब ! तुमचे येण्याचे कारण ?'' बाई.

''मी रॉकीला न्यायला आलो आहे !'' साहेब.

''अहो मी विकत घेतला आहे, गेली ३ वर्षे तो आमच्याकडे आहे ! आमचा झाला आहे !'' बाई.

''बरोबर ! मला मान्य आहे. तो तुमचाच आहे! हेही समजतो आम्ही. पण त्याचा मालक कोणीही नसतो, तो आझाद पंछी असतो, ज्याच्यावर त्याचे प्रेम आहे त्याचा तो मालक '' साहेब.

''मग ?'' बाई.

''मी त्याला न्यायाला आलो आहे !'' साहेब.

''पण तो माझा आहे ! '' ती.

''मान्य आहे ! मी त्याला लहानाचा मोठा केला. हे ही खरे ना ?'' साहेब.

''असेल ! मग ?'' बाई.

''तुम्ही असे करा ! जर रॉकी आमच्या बरोबर नाही आला तर तुमचा. पण जर तो आमच्या बरोबर निघाला तर, आम्ही घेऊन जाऊ ! '' साहेब.

''ठीक आहे !''

आम्ही उठलो, तर तो बेटा उघड्या दरवाज्यातून जीन्याने आमच्या पुढे उतरला. आमच्या गाडीत टूणकन बसला. आम्हीही गाडीत बसलो. त्या बाई गाडी पर्यंत आल्या होत्या. का कोण जाणे रॉकी गाडीतून उतरला, त्या बाईना भेटला आणि त्यांचा निरोप घेऊन पुन्हा गाडीत येऊन बसला. त्या पारशी बाईचे डोळेही पाणावले होते, आणि रॉकी चेही. आणि त्याने माझ्या मित्राला आवाज दिला. आम्ही निघालो. तो राजासारखा पुढच्या सिटवर बसला होता. पार्ल्याला आल्यावर सरळ त्यांच्या घरात घुसला. भेटला सगळ्यांना आणि विसावला.

तर हे सांगायचे कारण, त्यांची मानसिकता. प्रेम, आठवण, ओळख सारे काही. पुर्वी 'लिओ'च्या गळ्यात साखळी असायची.

तर परवा त्याचा पहिला वाढदिवस साजरा झाला. केक आणले. त्याला नवे कपडे आणले. टोपी घातली. बेटा खूश. हुरळून गेला होता या नव्या अनुभवाने आणि आम्हीही. आता अनेक वर्षे तो आम्हाला साथ देणार आहे. गाडीत त्याला अक्खी एक सीट लागते म्हणून नवी गाडीही बुक केली या लाडक्या बाळासाठी !!

आता तर तो घरात मोकळाच असतो. दोन्ही बेड रूम, हॉल आता त्याच्या नावावर केले आहे. त्याच्या भुंकण्यातून त्याला काय म्हणायचे आहे हेही समजते आम्हाला, आणि नखरेही वाढत चालले आहेत वाढत्या वया बरोबर, येवढे मात्र खरे.

०-०-०-०-०

# खळ्खट्याक् !

संध्याकाळचे सहा वाजले असावेत, मी माझ्या ऑफीसमधून आज जरा लवकर निघालो, बी के सीचा सगळा रस्ता सामसुम होता. तसा रविवारच होता तो. बस स्टॉपवर आलो. अर्धातास झाला तरी बस नव्हती. येवढ्यात एक गृहस्थ चालत जाताना दिसले. मी त्यांना बस बद्दल विचारले, ते म्हणाले बसेस बंद केल्यायत दादरला जाणाऱ्या ! मी विच्यारले कां? ते म्हणाले, ''मोठ्या पक्षाची सभा आहे साहेबांनी मेळावा घेतला आहे.''

म्हणजे आता बस येणार नव्हती तर टॅक्सी शिवाय पर्याय नव्हता. धारावीकडून उलट मार्गाने येणारी एक टॅक्सी दिसली. मी आवाज दिला. त्याने परत फिरून गाडी उभी केली.

''दादर !'' मी.

तो विचारात पडला.

''ठिक आहे ! बसा! वेळ लागेल, ट्राफीक खूप आहे. आताच सभा सुरू झाली आहे, हा बघा मी रिकामाच तिकडूनच येतोय ! तुम्हाला घाई नाही ना ''

''नाही ''!

''मग चला, आपण माहिम चर्चच्या शॉर्टकटने निघू!''

''ठीक आहे ''!

ब्रिजवर आलो तर भली मोठी वहानांची लाईन लागलेली. आता गाडीत तर बसलोच ! चालत जाणे शक्य नव्हते आणि दादर स्टेशनला तर जायचे होते एका खास मिटींग साठी. गाडी मुंगीच्या पावलांनी चालत होती. पोलीसवाले शिव्या घालीत होते. आडवे तिडवे जाणाऱ्यांना पण आम्ही मात्र सरळ रेषेत जात होतो.

''ओ ! ाऊ जरा ओव्हरटेक करून चलाना खूप वेळ झाला आहे. अजून किती वेळ लागेल !''

''सांगता येत नाही !''

आता बसून राहण्याशिवाय पर्याय नव्हता. पोहोचू तेव्हा पोहचू, म्हणत डोळे मिटून घेतले. अजून माहीम चर्चही आले नव्हते, बांद्राच्या ब्रिजवर पण रांगा लागल्या होत्या. मी माहीमच्या ब्रिज वरुन पाहिले म्हणजे हाच रस्ता योग्य होता.

माझ्या शोधक स्वभावानुसार माझ्यातला माणूस झाला.

''दादा ! तुम्ही किती वर्षे टॅक्सी चालवीत आहात ?''

"गेली १२ वर्षे !"

"ही गाडी तुमची कां ?"

" नाही ! ही भाड्याची आहे. रोजचे तीनशे रुपये गाडीवाल्याला द्यावे लागतात. कधी धंदा होतो कधी नाही ! आजच बघाना गेला अर्धा तास आपण येथेच आहोत, पुढे सरकायचे नांव नाही ! तुम्हाला उतरायचे असेल तर उतरा ! माझे नशीबच आज साथ देत नाही, या पुढाऱ्यांना त्याचे काही पडले नाही. यांचे राजकारण आणि गरीबांचे मरण !".

त्यांच्या चेहऱ्या वरच्या त्रासिक आठ्यातून मला वेगळाच वास येत होता. आज यांचा धंदा झाला नाही. धंदा होओ वा नको तीनशे रूपये संध्याकाळी देणे आहे.

"तुमच्या वया वरून तुम्ही ४०/४५ चे असाल !"

" हो बेचाळीस ! साहेब काय सांगू चांगली नोकरी होती, एक्ट्रेला बॅटरीत, कामगार सेनेची युनियन होती. मी तिचा कार्यकर्ता, कंपनी लॉसमध्ये म्हणून मालकाने ती बंद करण्याचा प्रस्ताव युनीयन समोर ठेवला. तेव्हा आमच्या युनियनचे अध्यक्ष होते साळवी साहेब. मोठा खमक्या माणूस, दोन महिने आम्ही संप लढवला. माझ्याकडे युनियनची सगळी सुत्रे आली. पण तेवढ्यात युनियन मध्ये फूट पडली. १५० कामगार कंपनीत गेले. आम्ही २०० मात्र गेटवर लढत राहिलो !"

सांगताना तो एकाएकी सद्गदीत झाला. डोळ्यात आसवे आली. मी त्याच्या पाठीवर हात ठेवला. अस्वस्थ झाला तो आणि पुन्हा काही तरी आठवून बोलू लागला त्याने माझ्याकडे बघण्याचे टाळले.

दोन महिन्यांनी कंपनीने एक मिटींग घेतली. युनियनचे इतर सदस्य या मिटींगला होते आम्ही बाहेर, दोन तासाने मिटींग संपली आणि आमचे नेते बाहेर आले.

"मालक ऐकायला तयार नाही ! त्याला कंपनी बंद करायची आहे !"

म्हणजे आता रोजी रोटी संपली, असे आम्ही तापलेले कामगार दंगा करण्याच्या विच्यारात होतो. कंपनीचा जी.एम. महाडिक बाहेर आला आणि आम्ही त्याला धरला. मीही गेले दोन महिने धरणे धरून कंटाळलो होतो. म्हणजे आता सगळे संपले. दोनशे कामगारांनी माझ्यावर विश्वास ठेवून लढा दिला होता. त्यांचे श्रम, पैसा वाया गेला. येवढ्याच आमच्या युनियनचे मोठे नेतेही

सटकले होते. आता उद्यापासून कंपनीला टाळे लागणार हे नक्की झाले. गेले दोन महिने पगार नाही. आता नोकरीही जाणार आणि... माझ्या नजरे समोर दोन मुलांचे, बायकोचे चेहरे आले. आता उद्याचे काय? या दोनशे कामगारांचे काय?

आमच्या काही कामगारांनी गेट तोडून आत प्रवेश केला. पोलिसांची कुमक आली. आम्हाला पाहून मॅनेजर महाडीक आत पळाला. काही कामगारांनी त्याला धरून चौकात आणल. त्याची बोलती बंद झाली होती. मी पिछाडी वरून पूढे आलो, तसे इतर कामगार दूर झाले. आणि तापलेल्या माझ्या मनातला अंगार अधिक तापला.

नी मी 'खळखट्याक'चा आवाज काढला. त्याच्या कानशीलातून रक्ताची धार लागली. बेशुध्द झाला तो. मग कामगारांनीही हात धूतले, तुडवला त्याला.

''पोलिस आले त्यांनी मला अणि आणखी पाच लोकांना पकडले. चौकशी झाली. एफ आय आर फाईल झाला. आणि साहेब पूढे तीन वर्षे केस चालली. आम्हाला जामीन मिळाला. बेकार झालेले आम्ही खेपा मारीत होते. युनियन ऑफीसमध्ये लिडर लोक भेट देईनात. पहिले ६ महिन्याचे रेशन दिले पण पैसे बंद केले. आता मुलांना दुधही मिळणे कठीण झाले. सोन्यासारख्या माहिमच्या खोलीचे भाडे तुंबले म्हणून मालकाने बाहेर काढले. आमचे चौघांचे कुटुंब रस्त्यावर आले. जागेचे ३० हजार दिले मालकाने त्यात धारावी झोपडपट्टीत एक १० X १० ची जागा घेतली अजूनही तिथेच आहे. साहेब ! केस चालली आम्हाला ३-३ वर्षाची सजा झाली. गुन्हेगारांच्या रांगेत उभा राहिलो कोणी नोकरी देईना. पण शेजारचा भय्या मदतीला आला. त्याने आपली टॅक्सी मला चालवायला दिली, बॅच काढून दिला ! साहेब तेव्हा पासून हाच पोटा पाण्याचा आधार आहे ! नाहीतर भिक मागायची वेळ आली असती. मी टॅक्सी चालवू लागलो दोन पैसे येत होते, घराला घरपण आले. आज मुले शिकत आहेत. त्यांना राजकारणापासून दूर ठेवलेय, आम्ही भोगले बस् !''

''तुम्ही स्वतःची टॅक्सी का नाही घेतलीत ?''

''कशी घेणार ? कशाने ? जागेचे आलेले पैशे खोलीला खर्च झाले! मग स्वतःची गाडी हे स्वप्नच राहिलेय साहेब ! आता मुले मोठी होतील नोकरीला लागतील तेव्हाच आशेचा किरण !'' तो.

''तुमच्या युनियनने केसला खर्च नाही केला ?''

"नाही! त्यांनी हात वर केले ! आणि आम्हीच बेवारश्यासारखे लढत राहिलो! आज आहे हे उपकार त्या भैय्याचे ! नाहीतर.....

म्हणत त्याचे डोळे पाणावले, त्याला मी पुनः थोपाटले. आता आमची टॅक्सी सेनाभवनापर्यंत आली होती. प्रचंड गर्दी, सभा संपली. वाट काढायलाही मुश्कील झाले होते.

"साहेब ! तुम्ही आता उतरा ! मी समोर निघून जातो. आता तिसऱ्या शिफ्ट वाल्याला गाडी देण्याची वेळ झाली आहे !" तो.

"असे करा ! मला सुषृशा हॉस्पिटलकडे सोडा म्हणजे मधल्या रस्त्याने मी दादर स्टेशनला जाईन !" मी.

अजून ट्रॅफीक होतीच. आणि तो बोलू लागला. "साहेब मी रहातो तेथे सगळ्या पार्टीचे लोक आहेत, पण माझे हात पोळलेयत. तेव्हा घरावर कोणत्याच पार्टीचा झेंडा लावला नाही. मला घृणा आली आहे. या स्वार्थी राजकारण्यांची आणखी एक तुम्हाला सांगतो ! आम्ही जेलमध्ये असताना कंपनी बंद झाली. रग्गड पैसा आला मालकाकडे. युनियन लिडरला, कामगार सेनेला रग्गड पैसे वाटले मालकाने, पण आम्ही कामगार रस्त्यावरच राहिलो. कोणी टॅक्सी, रिक्षा चालवतो, कोणी हमाली करून आपल्या चिल्या-पिल्यांना घासभर खायला घालतो! बस् हा कष्ठाचा पैसा आहे साहेब !" तो.

येवढ्यात सुश्रृशा हॉस्पिटलचा सिग्नल आला. गाडी सिग्नलच्या पुढे उभी राहिली.

"किती झाले भाडे ?" मी.

"साहेब ! सत्तर रुपये !".

मी ५०० ची नोट त्याच्या हातात ठेवली.

"सुट्टे नाहीत ! साहेब आज धंदा झाला नाही. आता गाडी फूल करून द्यावी लागेल !" तो.

एक काम करा! हे तुमच्या जवळ ठेवा ! मी निघतो म्हणत मी टॅक्सी सोडली आणि झपाझपा पाऊले टाकीत गोल देवळाकडे आलो. मी मागे पाहिले तर तो माझ्या मागे येत होता. मी झटकन रस्ता बदलला आणि फुल बाजारात घुसलो त्याला टाळण्यासाठी तो कबुतरखान्याच्या जाळीला धरून उभा होता. मग परतला.

आजही तो प्रसंग आठवला कि काळजात कालवा होते. आणि उभा रहातो त्या टॅक्सी ड्रायव्हरचा चेहरा .... आणि येतो आवाज 'खळ्खटयाकचा' !!

०-०-०

# हुरहुर

साठ वर्षे कशी भुर्रकन निघून गेली आणि भूतकाळाच्या अंधार काळोखात बंद झाले आणि उदयला मात्र तो अंधार खायला उठला आहे, उतारावर लागल्यावर काळाचा वेग किती वेगवान असतो हे समजलेच नाही प्रपंच्याच्या दडपणाखाली वावरताना, ते जोखड आता सैल होताना मात्र जीवघेण्या विचारांच्या चक्रव्युहात मला लोटून पसार झाली. आता जगणे असह्य होत आहे, स्वप्नांच्या रांगोळीतून चालताना. सारे काही भकास वाटते आहे.

कसली रंगीबेरंगी स्वप्ने होती ती नुकत्याच उमलणाऱ्या फुलांची, त्यांच्या रंगात आजही शिरून मन मुरादपणे, खेळावे त्या आठवणींशी. बालीश वाटते. अनाडी म्हणा हवे तर पण प्रेमाच्या लहरीत स्वतःला लपेटून घेणारे दिवस, रात्र रंगवीत स्वप्नांच्या पताका, पण सांधे जुळण्याआधीच निखळले आणि वाऱ्याच्या झूळकेने दुरावला तो स्वप्नांचा डोलारा, आणि एकाकीपणा आला नशीबी.

आयुष्याचे हे चक्र आपल्या कला लागले दाखवू आणि नाईलाज म्हणून गाडला गेलो त्या ओझ्याखाली, आठवणी कवटाळून अशी. ते टाळता येईना ! व्यवहारच होता हो. खोटा खोटा, पण खरा म्हणून जगाच्या बाजारात जीवंत केलेल्या मढ्यासारखा. जेथे जाणीवांना, विचाराना जराही थारा नव्हता. बिचारा होऊन वावरत होतो, श्वासांची नाळ पकडून.

आता या उतरावर लागताना त्या जीवंत होऊ लागल्या आहेत. आणि... काळजाचा भूगा होतो आहे. पण बोलती बंद आहे. घुसमट होते आहे. सांगता नाही येत जगाला हे सत्य. खूप भिती वाटते इभ्रतीची, या मायावी खोट्या जगाची हे सत्य सांगताना. खिल्ली उडेल निर्मळ प्रेमाची म्हणून.

खरे तर दुसऱ्या बाजूला याची कल्पनाही नसेल कारण प्रेम व्यक्त होण्या पूर्वीच वाऱ्याच्या जोरकस  झटक्याने, अंतर वाढत गेले. ते सांधे कधीच जुळले नाहीत. सारी हयात गेली त्या ओझ्याला पेलण्यात. पण आता कठीण वाटत आहे एक एक पायरी उतरताना.

आपले आयुष्य या विश्वातले म्हणजे या भूमितले. पूर्वीच रेखाटलेले असते असे विचारवंत सांगतात. खरे खोटे देवाला माहिती, हि मागच्या जन्माची शिल्लक पुन्हा आताच्या जगण्याला जोडलेली आहे. त्यात तिची आठवण म्हणजे

पूर्वाश्रमीचे अधूरे स्वप्न वा वास्तव हे जाणवते, पण मग त्याची पुन्हा पुन्हा पूनरावृत्ती का व्हावी असाही प्रश्न पडतो. एकदाचे ते अपूरे स्वप्न वास्तवात का नाही येत, आणि वाटते ते आता पूढील जन्माच्या गाठोड्यात बांधून आपल्याला ते ओझे वहायला लागते. हा लपंडाव याच जन्मी संपवा. असे राहून राहून वाटते आपल्याला. त्याला वसंत ऋतु सारखी नवी पालवी बहरावी या प्रेम वृक्षावर चांगली, मधुर फळे यावीत या आम्र वृक्षाला. पण त्या वाटण्याला आणि साकारण्याला खिळ कां पडावी, याच्या विवंचना लागतात. त्याला भोग म्हणतो आपण. मग संपत जावेत हे भोग आणि सफल व्हावी या स्वप्नांची वाट.

मनतल्या मनात डोळ्याच्या पापण्याआड या भेटी होतात. अगदी जीवंत होतात त्या नी जीवघेणा प्रवास पुन्हा पुन्हा सुरू होतो. कधी कधी अडचणींची भिंत उभी रहाते, क्षणभर विसर पडतो, पण क्षणभरच हं, जसे आकाशातल्या सावल्या पूढे पूढे सरकत जाव्या तशा. आणि वेदनेने रक्तबंबाळ होते काळीज. पण हुरहुर मात्र सतावीत रहाते. श्वासांच्या पूढे पूढे जाण्याने, नाईलाज असतो आपला. तसेच त्या बाजूलाही होत असावे कारण त्याच्या आठवणींची स्पंदने पोहोचतात आपल्या पर्यंत. भरारून जाते मन, शरीर आणि पापण्या मागचा सगळा खेळ हळू हळू थंड होत जातो. लाव्हा रसासारखा, सदृश्यपणाची चादर अंगावर पांघरून. हे सगळ्यांच्या बाबतीत घडत असेल असे नाही. पण दोन काळजांतल्या स्पंदनाना ते जाणवत रहाते पावला पावलावर. त्या दोन जीवाना, पण फारकत तशीच रहाते अधांतरी संपल्याशिवाय.

आपण असतो आपल्या स्वप्नांच्या सावलीला सावरत येते. एखादी झुळुक मंद आणि निघून जाते स्वप्नाला सोबत घेऊन, सोडून आपल्याला वादळात. पूढे येणाऱ्या हिरमोड होतो. मनातला हिरवा रंग फिका पडत जातो आणि आपण त्याच्या निखाऱ्यांना साक्षी ठेऊन चालत रहातो. आसवांच्या नद्या जवळ करून आणि आठवत रहातो करपून गेलेल्या प्रेमाच्या आठवणी.

आता पहा, उगवत्या सुर्याचे प्रतिबिंब किती आल्हादकारक वाटते. पण मग आग ओकणारे, शेवटी मावळतीच्या किरणांशी खेळावे वाटते. पण ते क्षितीजा पलीकडे जायच्या घाईत असते. तसेच होते प्रेमाच्या स्वप्नांचे. मलुल होऊन जाते मावळतीकडे प्रवास होऊ लागला की आणि भूतकाळाच्या काळ्या कुट्ट अंधार कोठडीत.

कालचा मावळलेला सुर्य येतो नवे रूप घेऊन दुसऱ्या सकाळी. पुन्हा जाग्या

होतात आठवणी नी काळजात हुरहुर वाटते. पण अनेकदा ती वांझोटी ठरते कां? कां होत नाहीत भेटी, कां फूलत नाही वसंत जीवनाच्या अंगणात ? मनात येतो कळ्यांना बहर, पण नाही फुलत फूले कधीच. जाते करपून फांदीवरच काळजाला चटके देत.

बिचाररी हुरहुर मनात वादळे निर्माण करते, आशेची किरणे दाखवते कधी, कधी, मृगजळासारखी निपचीत पडलेल्या स्वप्नांना जागे करीत हि अधुरी कहाणीच खरे तर मनाला सलत रहाते. आयुष्यभर घेऊन मनात रंगवलेल्या स्वप्नांना मिठीत घेऊन गोंजारत.

हा प्रेमाचा उगम त्या बालवयात होणे तसे नवे नाही. तारूण्याची जाणीव या वयात म्हणजे १२/१४ व्या वर्षी होणे हा निसर्गाचा नियम असतो आणि त्यात आपल्या आवडी निवडी वेध घेत घूमत रहातात. आवडत्या पाखरांच्या भोवऱ्यात. वेडे असते मन हो त्या वयात. काही फारसे समजत नसते पण निसर्ग आपले काम बरोबर बजावतो, आकर्षण निर्माण होते, रुप, बोलणे, स्वभाव, निटनिटकेपणा याच्या जाणिवेने आणि फसते बिचारे त्या पिंजऱ्यात पोपटासारखे. ते असते पहिले प्रेम. एकदा का त्या जाणीवेचा उगम झाला की भिरभिरती नजर शोधक बनते आणि स्थिरावते एका बिंदुवर. या उगमाचा कधी संगम होतो. तर कधी एकला चलो रे असे ते जळत रहाते काळजात. आणि त्या धगीत स्वत:च जाळून खाक होते. वा झुरत रहाते आयुष्यभर. अगदी उतारावर लागल्या वरही ती हुर हुर छळीत रहाते, पण सोबत करते त्या वयातल्या एकटेपणाचा आधार होत.

अनिलचे तसेच काहीसे झाले होते. चुकून नजर पडावी टपोऱ्या रंगीत गुलाबावर आणि ते त्याचेच होऊन बसावे आयुष्यभरासाठी सोबत करीत. पण ते सारे भासच असतात. हो, वास्तवाला तेथे नसतो थारा. पण मग कल्पनेच्या जाळ्यात तो अडकत जातो. कायमचा, नसते सुटका त्यातून जोवर पिंजऱ्याचा दरवाज्याआड, बंद आहे तोवर.

अनिल आणि रजनी एकाच शाळेत. बालमोहनमध्ये. पण अधिवेशने वेगवेगळी. अनिलचे सकाळी व रजनीचे दुपारचे सेशन पण जाण्या येण्याचा मार्ग एकच. तसा अनिलच्या घराकडून थोडा दूरचा मार्ग, पण स्वच्छ आणि निटनेटक्या रस्त्याचा. रहदारी चांगली आणि त्यांच्या वर्गातली बरीचसी मुले त्याच रस्त्याने जात असत. याच रस्त्याने अनिल गेले दोन वर्षे जात येत होता.

तशी रजनीही. आणि नववी संपता संपता एक दिवस स्पोर्टच्या मैदानावर अनिलच्या नजरेत ती पडली. अनिल उत्तम ॲथलेट होता. आणि मुलींच्या सेशनमध्ये रजनी. स्पोर्टस्ट संपले आणि पारितोषिक वितरणाच्यावेळी ती पुन्हा भेटली त्यांनी एकमेकांचे अभिनंदन केले. ती त्यांची पहिली भेट. बस तेवढीच. पण ती भेटच मग स्वप्नांच्या रांगोळ्या काढीत राहिली रोज रोज. ती जेव्हा शाळेत जाई तेव्हा अनिल घरी निघालेला असे. आणि तेवढीच भेट म्हणजे एकमेकांना पाहणे, दुरुनच. गेले वर्षभर हा खेळ चालू होता. कोणाला सांगता येत नाही. आपल्या प्रेमाच्या सुखावणाऱ्या भावना आता काळजात जडजड होत गेल्या. तोवर ना तिची भेट, ना बोलणे, ना कसलाही संवाद. हीच गोष्ट मनात घर करून बसली आणि छळीत राहिली रोज रोज. अकरावीचे वर्ष संपले आणि प्रेमाला ग्रहण लागले ते कायमचे, ना भेटी, ना दर्शन उरल्या फक्त आठवणीत. आणि छळत राहिल्या आजवर.

पुढच्या शिक्षणासाठी अनिल सांगलीला आणि मेडीकलला. आणि रजनी नाशिकला आर्किटेकच्या अभ्यासाला, तिच्या वडीलांची फिरती नोकरी. बदली झाली आणि हि फारकत. आज उतारवयात अनिलला जीवघेणी होत होती. मधले सगळे आयुष्य मेडीकलच्या व्यवसायात, वयाची चाळीशी कधी आली ही अनिलला समजलेच नाही आणि लग्नाचे वयही निघून गेले. पण एकही दिवस रजनीच्या आठवणी शिवाय जात नव्हता. कधी कधी ही हुरहुर इतकी उचंबळून येई की अन्न पाणीही गोड लागत नव्हते. आपल्याकडे रग्गड माया आहे, हे व्यवसाय आता बंद करावा आणि दूर कोठेतरी निवांत ठिकाणी जावे असे सारखे अनिलला वाटे तसा प्रयत्न एक दोन वेळा त्याने केला, पण रंजनाचे भूत काही त्याचा पाठलाग सोडायला तयार नव्हते. आता वयाची साठी ओलांडताना या वेडाने अधिकच छळायला सुरूवात केली होती.

शेवटी कंटाळून त्याने आपल्या दवाखान्यात एक नोकर ठेवला व ेक्लिनिकची जबाबदारी एका विश्वासू डॉक्टरवर सोपवून नाशिकला जाण्याचा निर्णय घेतला, की वेगळ्या वातावरणात मनाला शांती मिळेल आणि मनातली हुरहुर थोडी कमी होईल. त्यांचे गाव नाशिक. पण सध्या तेथे कोणीही कुटुंबीय नव्हते म्हणून 'एकांत' या उच्चभ्रु कॉम्पेक्समध्ये एक प्लॅट पूर्वीच घेऊन ठेवला होता. तसे त्याचे तेथे जाणे होत नव्हते. गेल्या पंचवीस वर्षात दोन-तीन वेळा ते येथे आले असतील. पण साफसफाईची व्यवस्था केल्याने फ्लॅट स्वच्छ व

वापरण्या जोगा होता. यासाठी तिथल्या वॉचमनला वर्षा काठी त्यानी पंचवीस हजार देऊ केले होते.

काही जुजबी सामान घेईन. त्यांनी नाशिक गाठले. एका खानावळीतून दोन वेळचा डब्बा चालू केला. नाशिकला जाताना शेकडाभर पुस्तके सोबत घेऊन जायला ते विसरले नाही. विरंगुळा हवा म्हणून. त्या कॉप्लेक्समध्ये बरेचसे जूने भाडेकरू निघून गेले फ्लॅट विकून आणि त्यांची जागा नव्यानी घेतली. आठवडा ठिक गेला. आणि प्रेमाचे भूत पुन्हा मानेवर स्वार झाले. ते काही त्यांचा पिच्छा पुरवायला सुरूवात करू लागले. पुन्हा तिच तगमग, ओढ, हुरहुर सोडायला तयार नव्हते. गेल्या आठवडाभर त्यांची पाठ दुखी अधिकच वाढत गेली. अनिलरावाना खूप त्रास व्हायला लागला. टाळायचे म्हणून त्याला टाळता येईना.

नुकताच हिवाळा सुरू झाला होता. वातावरण आल्हादकारक होते. वातावरणात धुके पसरले होते. अनिलरावांनी सकाळी बाहेर फिरायला जाण्याचा बेत केला, नी सकाळी सहा वाजता स्वारी घरातून निघाली. त्या आल्हादकारक वातावरणात मनातली रजनीची आठवण ते विसरले, तासभरासाठी, ते कॉम्पेक्समध्ये आले नी गेटमधेच रजनी सारखा चेहरा असलेली एक बाई बाहेर जाताना त्यांनी पाहिली नी त्याच क्षणी त्यांच्या हृदयाची धडधड सुरू झाली. तिच असेल कां ती. तसाच पण सुकलेला चेहरा, केसाची तीच ठेवण, चालण्याचा ढंग सारे तसेच. ती रजनीच असावी, नक्की आणि घरी आल्यावर मनातली हुर हुर कमालीची वाढली. सतत त्यांची भिरभिरती नजर तीच्या येण्याची वाट पहात ते गॅलरीत येऊन बसले. बराच वेळ झाला तरी तो चेहरा परतला नाही. मग कंटाळून ते घरात आले. आज त्यांनी केलेला चहाही त्यांना चवदार वाटला नाही.

आता सतत संध्याकाळ पर्यंत सात वेळा ते गॅलरीत आले, ती दिसेल म्हणून. पण हिरमुसल्या मनाने सतत आत बाहेर चालले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर ते येऊन गॅलरीत येऊन बसले. आणि तिला बाहेर जाताना पाहून झटक्यासरशी बाहेर निघाले. ती पूढे चालत होती, आणि अनिल मागून. शेवटी त्यानी तिला हाक मारली.

''रजनी !''

ती थांबली. तिने अनिलचा आवाज ओळखला, पण मागे फिरून नाही

पाहिले त्याला. पण ती थांबली. हा इथे कसा ? असा विचार तिच्या मनाला चाटून गेला. अनिल झपा झप पाऊले टाकीत तिच्या पुढे येऊन उभा राहिला.

"तू इकडे कसा ?" रजनी.

बराच वेळ तो तिच्याकडे पहात राहिला. अनिलच्या काळजाची धडधड वाढली होती. शब्द फुटेना.

"मी येथे एका पेशंटच्या फिजीओथेरपीला येते!" रजनी. येथे आर्किटेक्टचे कॉलेज नव्हते म्हणून मीही 'फिजीओ' झाले. मी दोन हॉस्पिटलना अटॅच आहे. मीही जीवन एकाकी जगत आहे. सारे कुटूंब मला सोडून गेले. तुझ्याबद्दलचे माझे वेड वाढले म्हणून वेड्याच्या हॉस्पीटलमध्ये अॅडमिट केले. मी आता एकाकी जीवन जगते आहे. शेवटच्या श्वासाची वाट पहात !" रजनी.

"तू येथे कसा ?"

"मी प्रॅक्टीस बंद केली, तुझ्या वेडामुळे, नी विरंगुळा मिळावा म्हणून येथे आलो ! पण तू काही माझा पिछा सोडायला तयार नाहीस !" अनिल.

"तुझ्या घरचे लोक ?"

"कोणी नाही, मी लग्न नाही केले. तुझ्या प्रेमापायी ! आणि एकाकी जीवन जगत आहे. विरंगुळा म्हणून येथे आलो तर तू !" अनिल

"तू माझ्या घरी चल !" अनिल

"नाही आज नाही मला अजून दोन पेशंटना ट्रीटमेंट द्यायची आहे ! आपण शनिवारी भेटू !" रजनी.

"ठीक ! पण विसरू नको !" अनिल.

आता तिला भेटण्यासाठी शनिवारपर्यंत वाट पहाणे आले. पण आशावादात फार मोठी तफावत असते. भर्रकन दिवस गेले आणि शनिवार आला.

तिने दरवाज्यावरची बेल वाजवली. दरवाजा उघडताच ती आत आली. अनिलने तिला घट्ट मिठी मारली, ती ही त्याला बिलगली. बराच वेळ ते त्या अवस्थेत होते.

आणि हुर हुर थांबली होती.

० – ० – ०

# पोस्त

माझ्या आजोळी म्हणजे राजापुरला पोस्त हा प्रकार दर तीन वर्षांनी व्हायचा. आमच्या लहानपणी ती तर खाण्या-पिण्याची एक चंगळच म्हणाना. त्या काळी घरात पोरा टोरांची मोठी फलटण. कमीत कमी ३/४ ते ६/७ पर्यंत मुलांची रांग असे. अगदी लहान मोठी. आम्ही जरा समंजस म्हणजे ७/८ वीतली मुले जरा शहाणी. म्हणजे खादाड आणि पचवण्याची ताकद ही जबरदस्त. एकदा घरातून भाकरी खाऊन बाहेर पडलो की संध्याकाळी सुर्य मावळायला आमचा दिवस संपायचा. ना घरचे आठवण काढीत, ना कोण. शिवाय उन्हात करवंदे, चिकू, आंबे, जांभळे, पेरू शिवाय आवळे यांनीच पोटे भरायची मग घरची आठवण तरी कशी असणार सांगा. दिवसभर हुंदडणे आणि तेही मनसोक्त असा दिवस जायचा.

पण पोस्ताचे दिवस आले की उत्साह वेगळाच असायचा. हा पोस्ताचा दिवस गावकरी शक्यतो रविवारी असायचा. शिमग्याच्या आजू बाजूला. अहो ७/८ बकरे उटायचे. एक देविचा आणि उरलेले वाडी वाडीचे. हा सगळा प्रकार वाडीची वार्षिक राखण देण्यासाठी असायचा.

बर हे बकरे एकाच ठिकाणी तुटायचे. सगळी पुरुष मंडळी जमा व्हायची मानकऱ्याच्या अंगणात. गावात मानकरी दोन. त्यातला आमच्या घराण्याचा पहिला व निमे घराण्याचा दुसरा. त्या दोन मानकऱ्यांचा एक अख्खा बसरा असायचा, तो पहिला बकरा तुटायचा त्याचे दोन भाग होत व त्या बकऱ्याची दोन फरी प्रथम त्या दोन मानकऱ्यांच्या घरी जात. उरलेले मटन सगळ्या वाड्यातील घराघरात फोड फोड वाटली जायची. चांगली चंगळ व्हायची गावात, पण तीन वर्षातून एकदाच.

त्या पोस्तासाठी घराघरात मुंबईकर, पुणेकर, अगदी मिलीटरीत काम करणारे ही हक्काने हजर रहायचे. ही तीन वर्षांनी येणारी राखण म्हणजे पोस्तच होते. गावात असा समज होता ते पोस्त वा राखण दिली की गाव सुरक्षीत, म्हणजे गावात रोगराई येणार नाही. कोणी अपघाताने मरणार नाही. गावात शेतीला पाऊस चांगला पडणार. पीक पाणी नीट पिकणार. या समजा पोटी अहो आजही ही परंपरा चालु आहे. गम्मत अशी की त्या चार पायाच्या बकऱ्याची राखण-पोस्त आता परंपरा बंद झाली ती आली दोन पायाच्या कोंबड्यांवर

म्हणजे दोन कोंबड्यांचे चार पाय म्हणजे एक बकरा. त्याचे दुसरे कारण खाणारी तोंडे कमी झाली. आता एका एका घरात एक-दोन मुले. ठीक, पण पोस्ताची लज्जत काही कमी झाली नाही.

त्या काळी आम्हा मुलांची संख्या खूप म्हणजे आमच्या वाडीतच आम्ही ३०/३५ मुले होतो. त्यात गावाचा हिशेब वेगळा.

त्या पोस्ताच्या दिवशी खटा खट बकरे तुटत. त्यांची रक्ती खायला आम्ही मुले जमायची सकाळी ८ वाजता ही गर्दी रक्ती खाणाऱ्यांची आणि बघ्यांचीही. बकरे तुटत आणि त्यांची रक्ती मोठ्या परातीत जमा होई. मग ती शिजवली जायची. त्यात तिखट-मीठ घातले की ती बारीक करून राण कुड्याच्या पानात भर भरुन आम्हा पोरांना लाईनीने द्यायचे. लहान मुले घेऊन आपआपली घरे गाठीत. पण आमची पोटे मोठी ना मग आम्हा उरलेल्या मुलांना पुन्हा पुन्हा देत. आणि पोटे भरली की घरची वाट. पुरचुंडीत थोडी घरी घेऊन. पण आता तो प्रकार बंदच झालाय. बकरे कमी त्यात खाणारी तोंडेही कमी. पण त्या काळातली मजा ती औरच होती.

त्या निमित्ताच्या काही ठळक आठवणी सांगतो. सगळ्या घराघरात माणसे किती याची मोजदात व्हायची आणि प्रत्येकाचा वाटा काढला जायचा. माहेरवाशीनींच्या नावाचा वाटा काढला जायचा. हि राखण किंवा पोस्त हे त्यांच्या साठीही असायचे. त्यांच्या सुरक्षतेसाठी. आणि या निमीत्ताने लेकी सुना नी नातवंडाची चंगळ होते. घर भरल्यासारखे होते पोस्ताच्या निमित्ताने.

आता वजरी म्हणजे ही काही मटन नव्हे. खरे तर गरीबांचे खाणे. खाटीक पण अशीच देतात गोर गरीबांना खायला. ना मटनाची चव ना कशाची. पण आमचा हा दरवर्षाचा शिरस्था होता. चव पण काय लाजबाब. आत फक्त तिखट-मीठ बस ती धुवायला लागते खूप, तेव्हाच खाण्यासारखी. बकरे कापणारे या भानगडीत नाही पडत. म्हणून आम्ही मुले जायचो नदीवर आणि धुवायची मग शिजवायची आणि चोपायची. आणि बेत ठरवून आमची पलटण नदीवर आली आम्ही नाऱ्यावर ती जबाबदारी टाकली.

एके वर्षी या पोस्ताचा आम्हा बाल गोपालांचा कसा बोज-बारा वाजला तेही सांगतो. आम्ही मुले ११/१२ वर्षाची पण आमच्या बरोबर काही १६/१७ वर्षाचीही मुले असायची, टारगट गावातली काही बिघडलेली म्हणजे घोट घेणारी. आमच्या वाट्याचे मटण आम्ही नदीच्या किनाऱ्यावर शिजवून

वनभोजन करायचे ठरवले. आम्ही पुढे गेलो. सोबत तांदुळ, मसाला घेऊन आणि एका मुलाला मटणाचा वाटा आणायला सांगितला. पण तो निघाला बेईमान त्याने तो वाटा एका बाईला विकला. दोन रू. घेऊन पिऊन आला नी झोकांड्या देत पोहोचला नदीवर हात हलवित.

'अरे नाऱ्या वजरी कुठे हाय?''

एक नाही नी दोन नाही, बेटा पार तर झालेला. आणि नुसता भात खाऊन आमच्या पोस्ताची पार्टी पार पडली. नि नाऱ्याला शिव्या शाप देत आम्ही घरी आलो.

अगदी पडलेल्या चेहऱ्याने आम्ही घरी आलो. वेळ पण बराच झाला होता. आम्ही जेवून घेतले असेल म्हणून सगळ्यानी जेवन केले होते.

''अरे! जेवला असाल ना पोटभर !'' आई.

काय सांगणार होतो. निमुटपणे जेवायला बसलो. चार फोडे पोटात पडली नी पोस्ताची पार्टी आम्हा सगळ्यांची आमच्या आपापल्या घरीच झाली. ती मजा मात्र फारच कमी काळ टिकली. जूनी जाणती मंडळी गेली. नव्या पिढीला तेवढा उत्साह नव्हता. पण परंपरा ? ती तर चालु ठेवायलाच हवी होती. मग बकऱ्या वरची संक्रात टळली नी आता कोंबड्यांवर आली.

पण पोस्ताच्या आठवणी अजूनही मनात घोळत रहातात. जेव्हा होळी येते. आता आम्ही सगळे वयस्कर पण गप्पांच्या फडात पोस्त आले नाही असे होत नाही. इतिहास जमा झालेल्या!

o–o–o–o–o



लेखक

**ॲड. यशवंत बाबुराव कदम**

(नमनेकर)

जगण्याच्या प्रवासात ॲड. यशवंत कदम यांनी जे अनुभवले, त्यांना जे भावले, जाणवले ते त्यांनी कथारूपात मांडले त्यात सुप्त आत्मसमाधानही असावे. लेखकाची भाषाशैली सोपी आहे. आपल्या कथांमधून वाचकास खिळवून ठेवण्याचे, अंतर्मुख करण्याचे सामर्थ्य ॲड. यशवंत कदम यांच्या लेखणीत निश्चित आहे. एकाग्रता आणि उत्कटता हा त्यांच्या कथेचा खास गुणधर्म ! बदलत्या परिस्थितीत वाचकांची अभिरूची व अपेक्षा लक्षात घेऊन त्याप्रमाणे 'कथा' लिहिण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

– नमिता कीर